2337

ॐ नमः शिवाय

बारा ज्योतिर्लिंग महात्म्य

व

श्रीरुद्र

(मराठी भाषांतरासह)

दिव्य दर्शन दीप

923:2291
155NA

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

Q23:2291 3481
155NA
Chapne, Chandrakant
Sadashivappa.
Barajyotirlinga va
Rudra.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

Q23:2291
155NA
3481

SHRI JAGADGURU VISHWARADHYA JNANAMANDIR
(LIBRARY)
JANGAMAWADIMATH, VARANASI

Please return this volume on or before the date last stamped
Overdue volume will be charged 1/- per day.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

Q23:2291 3481
155NA
Chapne, Chandrakant
Sadashivappa.
Barajyotirlinga va
Rudra.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

समाजसेवाचंद्र

चंद्रकांत सदाशिवप्पा चपने

प्रतिष्ठांन

तर्फे

द्वितीय पुष्प

(उस्मानाबाद, दूरध्वनी :– २५७, ४२६.)

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

Q23:2291
155NA

संग्राहक, अनुवादक, लेखक, प्रकाशक.
धर्मालंकार गुरुभक्तशिरोमणि, महाचार्यसेवाचंद्र,
रुद्रकौस्तुभमणि, शिवतत्वविशारद, कवीभूषण,
धर्मरत्न, समाजकार्यधुरंधर.

बसप्पा वीरभद्रप्पा वारद
सोलापूर.

दूरध्वनी :– ३६७२, ७२३६, ६०७९.

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY.
Jangamwadi Math, VARANASI,
Acc. No. ....
3481

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

– प्रस्तावना –

राष्ट्रसेवादलात बौद्धिके,श्रमदान,गड भ्रमंती, क्रांतीं गीते, पोवाडे लाठी–काठी–बोथाटी यातच स्वातंत्र्यपूर्व ४ वर्षाच्या काळात आम्ही मशगूल असू. त्यावेळी एक गीत गायलें जायचे–

मानदंड जो वदति पृथ्वीचा ।
भव्य हिमालय धवल यशाचा ।
वाटे घडुनि वास तेथला ।

रोज चढावे गिरिचे दुर्गम बर्फाच्छादित कडे–कडे हो परि केव्हां घडे?

लक्ष लागले सांप्रत माझे सतत उत्तरेकडे ।। जन्म महाराष्ट्रात लाभला । इथे स्फुर्तिचा प्यालो प्याला ।। म्हणुनि मायभू प्रिय अति मजला । परि उत्सुक मी उल्लंघाया सातपुड्याचे कडे ।।

ही बालपणचीं उत्सुकता धर्मरत्न श्री.बरूप्पा अण्णा वारद यांचा बारा ज्योतिर्लिंगावरील सविस्तर ग्रंथ वाचत असतांना उत्तरेकडील नव्हे तर हिमालयापासून कन्याकुमारी पर्यंत आणि अरबी समुद्रापासून बंगालच्या उपसागरापर्यंत देशभर विखुरलेला बारा ज्योतिर्लिंगांच्या दर्शनाने शिगेला पोहोचली. हिमालयाच्या माथ्यावरचे ' केदारनाथ ' तामिळ–नाडूतील ' रामेश्वर ' पश्चिम समुद्रावरील ' सोमनाथ ' तर श्रीशैल पर्वतावरील मल्लिकार्जुन ! मध्यप्रदेशातलें क्षिप्रानदीचे तीरावरील महाकाल, गंगा ही या देशाची लोकमाता, तिच्या तीरावर श्रीकाशी विश्वनाथ ! अशी सर्वच्या सर्व सांगत बसण्यापेक्षा वाचका–नीच वाचावे. लेंखकाने आपल्या समर्थ लेखणीने उभा केलेंला या देशाचा प्राचीन इतिहास, भूगोल, समाज,धर्मधारणा आणि या देशाच्या भिन्न–भिन्न वंशांच्या शेंकडो हजारो मैल दूर असलो तरी ऐक्याच्या अखंडत्वाचा आणि एकात्मकतेचा साक्षात्कार व्हायला हे पुस्तक अतिशय मौल्यवान ठरेल यात मला बिलकुल संदेह नाही. भिन्न भिन्न भाषा चालीरीती, आर्थिक व सामाजिक स्तर आणि पुरातन संस्कृतीच्या या खंडप्राय देशाला आजच्या क्षणी भावनिक ऐक्याची कधी नव्हती तेवढी गरज निर्माण झाली आहे. पन्नासहून अधिक धर्मग्रंथ लिहुन व ते विनामुल्य प्रकाशित करुन आजपर्यंत फार मोठी समाजसेवा केलेल्या या धर्मपरायण कवी-लेखक, समाजकार्य धुरंधराला या ग्रंथनिर्मितीसाठी ' समाजसेवाचंद्र चंद्रकांत सदाशिवअप्पा चपणे प्रतिष्ठान ' तर्फे पुरस्कार लाभतो आहे हा दुग्धशर्करायोग आहें. याच लेखकाचा ' सदाशीव पूजा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दीप' हा ग्रंथ याच ट्रस्टच्या माध्यमातून धर्मप्रवण समाजापुढे आणला गेला आहे. एक्कावन्न हजार रुपयांच्या उदार देणगीतून उभारल्या गेलेंल्या श्री चंद्रकांत चपणें यांच्या या उचित कार्याचा सर्व भाविकां-कडून यथोचित गौरव होत आहेच. कष्टांने शरीरशुद्धी, वाचनाने-चिंतनानें बुद्धी आणि मनाची शुद्धी पण ते वाचन कशाप्रकारच्या ग्रंथाचे असावे, या प्रश्नाचें उत्तर हा ग्रंथच देईल.

१२ ज्योतिर्लिंगावरोबरच रुद्राचे ११ नमक व ११ चमक असे २२ अध्याय आहेत,तेमुळातसंस्कृतमध्ये.तीनचतुर्थांशपेक्षा अधिक निरक्षरांची संख्या असलेंल्या आपल्या मराठो मुलुखात संस्कृत भाषेतील ज्ञानगंगेच्या तीरी राहूनही ज्ञानाची तहान भागली नव्हती. ज्ञानियांच्या राजानेमाझा मराठाचि बोलु कौतुके । परि अमृतचेंनि पैजा जिंके, ऐसी अक्षरे रसिके । मठ वोन अशा आत्मविश्वासाने गीतेवर भाष्य केले-ती ज्ञानेंश्वरी श्री बसप्पा अण्णांनी स्वत:च्या जीवनातले यशस्वी पाऊण शतक पुरे करीत असतांना, ग्रंथांचें अर्धशतक, कांही सहस्त्र काव्यें पुरी केलीत. 'रुद्रा'चा अनुवाद करणें सोपे नाही. पण मूळच्याच रसाळ, चौफेर दृष्टीच्या आणि भावनांनी ओथंबलेल्या लेखणीला हें पेलणें शक्य झालें आहें. वाचकांना आनंद देण्याबरोबरच त्यांच्या अभिरुचींलाही चांगले वळण लावण्यासाठीं झटणाऱ्या सर्वश्री चंद्रकांत चपने आणि मान्यवर लेखकांना एक सूचना करावीशी वाटते-

आतापर्यंत जवळ जवळ लाखभर मुद्रित मजकूर 'विनामूल्य' देऊ केलेंल्या ज्ञान-दानाचा बऱ्याच वेळा दुरुपयोग झालेला असणें शक्य वाटते. फुकट मिळते त्याची किंमत वाटत नाही.इंग्रजीत एक म्हण आहे "Every Man has his Price"तसेच कांहीसे या अभिनव प्रयोगा-बद्दल म्हणावेसें वाटते. आजकाल कागद, प्रिंटींग, प्रकाशन इत्यादिचे भाव विचारात घेतले तर निदान १५/२० रु. किंमत असू शकणाऱ्या या ग्रंथासाठी रु. दोन हे मूल्य नगण्यच ठरेंल. शिवाय यातून येणारी रक्कम अशाच सत्कार्यास पुन्हा उपयोगी पडू शकेल. लेखक व प्रवर्तकांना आयुरारोग्य चिंतून या ग्रंथाचा लाभ वाचकांनी अवश्य घ्यावा अशी विनंती करुन प्रस्तुत संपवतो.

एस. बी. शेटे
जज्ज, लेंबर कोर्ट, सोलापूर.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

माझे थोडेसे

बारा ज्योतिर्लिंगे व तीर्थ क्षेत्रें म्हणजे सांस्कृतिक भावनांचे दृष्य असून आपले जीवन सार्थकतेचे मार्गदर्शक असे आधारस्तंभच आहेत. अगणित कालापासून आजपावेतो आपले कार्य ते करीतच आहेत व सर्वांना प्रेरणा देतच आहेत. ते प्रादेशिक सौंदर्य दाखवतात, ऐतिहासिक महत्व पटवतात, पूर्व जनांच्या कृतीची स्मृती करून दतात, भाविकांना भक्तीतून मुक्ती मदीर मार्गी लावतात, सांस्कृतिक आदान प्रदान करतात, राष्ट्रीय एकता साधतात, हे महत्वाचे आहे. मात्र तुमच्यात सद्भाव असेल तरच त्याचा अनुभव येईल. यासाठी – पंचानन परमेश्वराच्या परमपावन पादकमल दर्शन प्राप्तीसाठी प्रत्येकजण परमार्थाचा प्रथम प्रमुख धंदा व प्रपंचाचा जोड धंदा मानून वागल्यास तो मानवतेचा खऱ्या अर्थाने मानबिंदूच ठरेल

सांस्कृतिक जीवनात आपला भारत हा एक परमपावन असा पुण्यमय देश आहे. यामध्यें अनेक तीर्थक्षेत्रे व विविध धर्मगुरुंची निवासस्थानें आहेत ते निरनिराळे सद्भाव व संस्कृती उभी करतात व ते सदैव टिकवितात. यामुळे भारताला आगळे महत्व आहे. या अभिमानानें जगात आपला मान उंच आहे. आणि या उंच मानाचा नदादीप सदैव तेवत राहावा म्हणूनच भाविक जन देळोवेळी दर्शन घेतांत, यास अनुसरूनच हे देवदेवा, देवप्रिया, देवनाथा, वेवर्चितका, देवासुरनमस्कृता, देवासुरमहामात्रा, देवासुरमहाश्रया, देवासुरवरप्रदा, देवासुरेश्वरा, देवासुरमहेश्वरा, देवाधिदेवा, तुझ्या द्वादश ज्योतिर्लिंग निवासाचे, भाविकांच्या भक्ती भांडाराचे, अनेकवेळां दर्शन घेण्यातील वाराणसी विश्वनाथाच्या परवाच्या माझ्या पाचव्या फेरीच्या दर्शनानें व प्रयाग त्रिवेणी संगमाच्या स्नानानें त्याचप्रमाणें रामेश्वरच्या तिसऱ्या फेरीच्या दर्शनानें व मंदीरातील सर्व बावीस पवित्र कुंड व देवस्थान लगतचा समुद्र यांच्या स्नानाने माझ्या अंतरात्म्यातील उचंबळा उग्रपणें उसळला आणि या बारा ज्योतिर्लिंगाचा महिमा व इतिहास लिहून भाविकांच्या करकमली वाचनार्थ सादर करावा हा सद्भावनिक विचार श्री. चंद्रकांत सदाशिवप्पा चपने (उस्मानाबाद तथा धाराशिव) यांचेपुढें मी ठेवला तेव्हा त्यानी आपल्या प्रतिष्ठातर्फे (ट्रस्टतर्फे) या ग्रंथ प्रकाशनास भक्तीभावनेंतून व मोठ्या प्रेमातून क्षणार्धात प्रोत्साहनी पुरस्कार दिला.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

'समाजसेवाचंद्र' हे अर्थभरित बहुमोल बिरुद संपादलेल्या चंद्रकांत स. चपने यानी खऱ्या अर्थाची शीतलता समाजावर पसरवून सिंहाचा वाटा उचलून पूर्ण केली हे नमूद केल्याशिवाय राहवत नाही. या पहाडी व पोलादी पुरस्कारानें माझा आनंद अगणित गुणीत होऊन माझे हात लेखणीकडे व लेखणी माझे हाताकडे पाहात असताना दोघांचे एकरूप करून लेखन कार्यारंभ केला. या ग्रंथाचे अल्पावधीत अवघ्या दीड महिन्यात लेखन, मुद्रण, प्रकाशन पूर्ण होत आहे. यासाठी काही न्यूनाधिक असल्यास सद्गुणज्ञ वाचक गोडच करून घेतील.

या ग्रंथ लेखनाची प्रेरणा श्री विश्वनाथ, श्री रामेश्वर व लोक-मामा श्री गंगा यानीच दिली व त्यानींच ती माझ्या मंद मतीतून बोबडया बोलीतून व लुज्या लेखणीच्या ललकारातून पूर्ण करूत घेतली. 'समाजसेवाचंद्र' चंद्रकांत चपने यांनी 'पुरस्कार' दिल्याबद्दल व माननीय न्यायमूर्ति शेटे साहेब 'प्रस्तावना' लिहून योग्य ते मार्गदर्शन केलेबद्दल व साहित्यविशारद श्री कोठावळे यांनी 'दोन शब्द' लिहीलेबद्दल तिघांचाही मी आभारी आहे.

समस्त भाविकांचा हा परमोच्च ग्रंथ शिवयोगी श्री मन्मथ माऊलीच्या परमपवित्र अशा जयंती दिनीं, मन्मथाच्याच तपोभूमीत, संस्कृतीश्रेष्ठ अशा भारत भूच्या प्रजासत्ताक दिनीं, दि. २६-१-८५ रोजीं तपोरत्न श्री. ष. ब्र. प्र. योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी होटगीश्वर यांचे अध्यक्षतेतून, तपोरत्न श्री. ष. ब्र. प्र. प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी माजलगावकर यांचे शुभ हस्ते, अशा पाच प्रकारच्या पावित्र्यांतून पंचमुखी परमेश्वराच्या पादकमळी प्रकाशनाचा प्रामाणिक प्रपंच प्रगटविलेला आहे.

जनता जगन्नाथाचा रथ अबाधपणें ओढण्यास आपला अखंड आशीर्वाद असावा अशी अपेक्षा.

विनम्र,

बसप्पा वी. वारद

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दोन शब्द

'सेवितो हा रस । वाटितो आणिका ।। अशा विनम्र भावनेने समाजसेवा करण्याचे कंकण बांधून विविध प्रकारे सेवानिरत असलेले अनेक उपाधि विभूषित श्री बसप्पा अण्णा वारद यांच्या 'बारा ज्योतिर्लिंग व रुद्र' प्रकाशनास दोन शब्द लिहिण्यास मला आनंद होत आहे.

'एकला चलोरे' ही त्यांची वृत्ती सतत समाजचिंतन व धर्मप्रेम यांनी अवगुंठित असते. ग्रंथ हे समाजाचे गुरु असतात. साहित्य चिरंतन असते. त्याद्वारे केलेली समाजसेवा चिरकाल जनमानसावर ठसा उमटवीत असते. साहित्याच्या मोजमापाची फूटपट्टी नसते. अंतःकरणात उदित झालेल्या उर्मी शब्दबद्ध होऊन जेव्हां बाहेर पडतात, तेव्हां त्या लेखकाच्या स्वतःच्या उरत नाहीत, त्यावर ग्रहण करणाऱ्यांचाहि हक्क पोचतो. पैसा खर्च करावा तसा कमी होत जातो, पण ज्ञान वाटत जावे तसे वाढत जाते. 'प्रज्वलितो ज्ञानमय प्रदीप' असे म्हटले आहे. श्री बसप्पा अण्णांनी लावलेला हा ज्ञानदीप त्यांच्या अखेरच्या निश्वासापर्यंत प्रज्वलित राहील व समाजाला प्रकाश देत राहील यात शंका नाही.

सर्व जगद्गुरुंनी त्यांना विविध पदव्या प्रदान केल्या आहेत. यावरून त्यांच्या सेवेची कल्पना येते. सुमारे ५० छोटी मोठी पुस्तके स्वखर्चानें प्रसिद्ध करून त्यांनी विधायक सेवा केली आहे. हे नवे पुष्प मौलिक आहे. भाषा सरळ, सोपी. निवेदन शैली उत्तम व समाजापर्यंत विचार पोचविण्याची अमोघ इच्छाशक्ति कौतुकास्पद आहे. भारतीय एकात्मता साधणारी बारा ज्योतिर्लिंग व अध्यात्म साधनेतून मोक्ष साधनेप्रत नेणारा 'रुद्र' (मराठी अनुवाद) यामुळे श्री. बसप्पा वारद वाङमय क्षेत्रात नवी भर घालीत आहेत, हे स्वागतार्ह !

'समाजसेवाचंद्र' श्री. चंद्रकांत चपने प्रतिष्ठान उस्मानाबाद तर्फे हा ग्रंथ प्रकाशित होत आहे. श्री. चपने यांनी धर्म प्रभावनेस्तव रु. ५१ हजारांची देणगी देऊन महाकार्य केले आहे. त्यांना धन्यवाद.

असेच धर्मग्रंथ उत्तरोत्तर प्रकाशित होवोत. श्री. बसप्पाअण्णा वारद यांच्या प्रकाशनाला नवी दिशा प्राप्त होवो, हे शुभचिंतन !

विनम्र,

कुमार कोठावळे

साहित्य विशारद

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

बारा ज्योतिर्लिंग स्तोत्र

सौराष्ट्रे सोमनाथमं च श्री शैल्ये मल्लिकार्जुनम् ।
उज्जयिन्यां महाकालमोङ्कारममलेश्वरम् ।।
परल्यां वैद्यनाथं च डाकिन्यां भीमशङ्करम् ।
सेतुबन्धे तु रामेशं नागेशं दारुकावने ।।
वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यंम्बकं गौतमीतटे ।
हिमालये केदारं घृश्मेशं च शिवालये ।।
एतानि ज्योतिर्लिङ्गानि सायंप्रातः पठेन्नरः ।
सप्तजन्मकृतं पापं स्मरणेन विनश्यति ।।
।। ॐ नम शिवाय ।।

तंटा पहा तंटा ऐसा कैसा तंटा मिटेना हा तंटा वाटे मज
नारी नरा तंटा तीन गुणा तंटा चार वेदा तंटा दिसे मज
पाच तत्वा तंटा सहा शास्त्रा तंटा सात रंगा तंटा भासे मज
आठ वर्णा तंटा नऊ ग्रहा तंटा दहा दिशा तंटा भीती मज
बसवाचा तंटा नम्रतेचा घंटा असो सर्वा कंठा मनी निज

असोनि पार्वती केली गंगा कां रे डामडौल कांरे सांग मज
वामांगी पार्वती शिरी गंगा कां रे भेदभाव कां रे सांग मज
षण्मुख गजमुख बाळ भांडणी रे पक्षपात का रे सांग मज
सर्व एक होऊनी दिले हाकलून रे फिरे स्मशानी रे चिंता मज
बसवाच्या मनी घेई ठाव तू रे एकचि भाव रे तुज मज

मी अजिक्य आहे पैलवान भारी केव्हांही कुस्ती करी येई त्याशी
स्थूल अशा देहा प्रथम पाडले सूक्ष्माला पाडले नंतरचि
पाडले मत्सर मोह लोभ मद काढले काम क्रोध मुळातून
दंड ठोकोनिया देतो हे आव्हान कोण पैलवान उरलासी
कोणी नाही आला भिऊन बसपासी आनंद झालासी त्रिभुवनी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सोमनाथ

सोमनाथ हे ज्योतिर्लिंग गुजरात राज्यांत, सौराष्ट्र विभागात प्रभास पाटणग्राम येथें समुद्रतीरी आहे. मानव या जगाला धर्मशाळा, व्यायामशाळा, संशोधनशाळा, प्रयोगशाळा, भोगशाळा, योगशाळा, पाठशाळा असे निरनिराळे दृष्टीकोनांतून पाहतो पण ती कर्मशाळा असून त्यामधून कैलासशाळा-मुक्तीशाळा गाठायची आहे. हें सर्वांनी खऱ्या अर्थानें जाणले पाहिजे.

अतर्क्य कालावधीपूर्वी महर्षी अत्री व अनसूया हे पती-पत्नी नदीकिनारी संध्यासमयीं निसर्गाचें सौंदर्य व आल्हाद आनंदानें पाहात बसले होते. साऱ्या जीवनात असूयेला स्थान नाही अशी अनसूया महर्षी अत्रीजवळ बसली होती. आनंदभरात ऋषीवर्य अत्रींच्या मनांत आलें की निसर्ग एवढा सुंदर आहे तर हा निसर्ग निर्माण करणारा किती सुंदर असेल या विचाराच्या आनंदभरात मुनीराज म्हणतात हे भार्ये, प्रिये, अनसूये आपण या निसर्गोत्पादकालाच भेटावें, डोळे भरून आनंदानें त्याला मिठी मारावी. आपणांस किती आनंद होईल.

अनसूया :– तें कसें शक्य आहे.

अत्री :– तू म्हणतेस ते जितके अशक्य आहे तितकेच शक्यही आहे.

अनसूया :– आपण सर्वांगी सामर्थ्यशाली आहात मग आपण तसे सौंदर्यशाली, वैभवशाली, शीतलताशाली जगत अवश्य निर्माण करावा.

अत्री :– यासाठीं शूर, वीर, कर्तृत्ववान, वैभवी, सुंदर, सद्‌गुणी पुरुष झाला पाहिजे.

अनसूया :–सर्वसदगुणयुक्त अशी व्यक्ती जन्मू शकेल काय ?

अत्री :– आपण महादेवाजवळ असा सर्वसद्‌गुणसंपन्न मुलगा दे अशी प्रार्थना करू या. मी एकटचाने तप करून, शक्ती वाढवून-भागणार नाही तर तूही तप केला पाहीजे व तुझीही शक्ती वाढली पाहीजे. तरच असा सुपुत्र प्राप्त होईल.

दोघांनीही तपश्चर्येस प्रारंभ केला. भोलाशंकर महादेव प्रसन्न झाले व त्या कृपा प्रसादानें त्यांच्या कुशीत मुलगा जन्मास आला

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जगाला तो आल्हाद देणारा होता म्हणून त्याचे नांव अत्री अनसुयेनें 'चंद्र' असे ठेवलें. हा चंद्र मातापित्याच्या मांडीवर खेळत खेळत मोठा झाला. महर्षी अत्रीच्या अंगातील सर्वांगी रूप व गुण चंद्रात उतरले होते.

चंद्राजवळ महान शीतलता होती. चंद्रानें शेकडो यज्ञ केले. यज्ञ म्हणजे यज्ञ देवपूजा हें तत्व त्याच्या मनावर बिंबले होते सारे यज्ञ विश्वकल्याणार्थ त्यानी केले. अनेक सत्कृत्यें केली. तो वयात आलेला पाहून महर्षी व महर्षीणी यानी त्याचे समोर विवाहाचा विचार मांडला. त्यानेही मान्यता दिली पण एखाद्या स्त्री सापळेशी मी लग्न करणार नाहीं असे स्पष्ट सांगितलें. विवाहेच्छु मुलींचा शोध सुरू झाला काही कामानिमित्त चद्र दक्षाचे नगरीत आला. तेथींल सरोवर काठी फिरता-फिरता आला. तेथील निसर्ग त्याच्या नजरेंत नयनमनोहर नर्तन करीत होते. एवढ्यात एक महान स्वरूपसुंदरी, सर्वांगी नटलेली त्याला समोरून येतांना दिसली व जवळ येतांच मोठ्या हिंमतीनें तिनें त्याच्याशी बोलायला सुरुवात केली- पण तिच्या बोलण्यात चंद्राला अस्वस्थता भासली. त्यानेही धीटपणे व स्पष्ट 'तुझा विवाह झालाय का' असें विचारले.

"नाही." !

का ?

विवाह म्हणजे काय व तो कसा ?

स्त्री व पुरूष यापैकीं एकाचें दुसऱ्यांत विलीन होणें म्हणजे विवाह

जोपर्यंत सर्वगुणसंपन्न तरूण मिळत नाही तोपर्यंत मी लग्न करणार नाही. म्हणून तू अस्वस्थ आहेस का ? जो सर्व सद्‌गुणसंपन्न व वैभवसंपन्न आहे व ज्यांनी जगाला शीतलतेतून खरी शांती दिली अशी एखादी व्यक्ती तुझ्या कल्पनेत आहे का ?

होय, असा एकच एक तरूण जो अत्रीमहर्षींचा पुत्र आहे- त्याच्याशीच मी विवाह करणार आहे.

चंद्र हसला व म्हणाला तू म्हणतेस तों चंद्र (अत्रीऋषीपुत्र) मीच आहे. माझे नांव रोहिणी मी दक्षाची मुलगी. अशी ओळख न विचारताच

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तिनें करून दिली
आपण दोघें ही एकमेकांचे चिंतन करीत होतो. दोघांची भेंट झाली सुदिन व सुसमय आहे. विवाहबद्ध होऊ या. माझ्या वडिलांना साठ मुली आहेत. पैकी आम्ही सत्तावीसजण एक विचाराचें असून सर्वांनी एकपतीच करण्याचे ठरवले आहे.

तुजसम रत्न लाभत असेल तर तुजसम त्याही असतीलच समजून मी त्यांचा ही स्विकार करीन
अत्री, अनसूया, दक्ष यांना कळवण्यात आले. विवाह ठरला व मोठ्या डौलानें, थाटामाटात व एकमेकांच्या मानमरातबीनें व सर्वांना शोभेल अशा इतमानानें पार पडला. याप्रसंगी वधूचा हात वराचे हातात देऊन 'धर्मेच, अर्थेच, कामेच, नातिचरामि नातिचरामि, नातिचरामि,' असे म्हणावयास लावतात. प्रथम आश्विनी भरणी, कृतिका यांचेशी हातमिळवणी सहजगत्या झाली चवथी रोहिणीशी हातमिळवणी करतांना चंद्र कामातुर दृष्टीनें आकर्षिला जाऊन त्याची बुध्दी अगणित भराऱ्या मारू लागली. पुढें उरलेल्या तेवीस जणाशी हातमिळवणी झाली. शेवटी दक्षपत्नीनें आपल्या साऱ्या लेकीवर समान प्रेम ठेवण्यास चंद्रला सांगितलें व चंद्र २७ पत्न्यासह स्वगृही आला पूर्वीप्रमाणें त्यानें आपले सत्तकृत्य प्रारंभिलें त्याच्या सर्वच कार्यांत रोहिणी सदैव बुध्दीचातुर्यानें उत्तम साथ देऊ लागली म्हणून बाहेर जाताना तो रोहिणीला एकटीलाच बरोबर नेऊ लागला, नारदानें सव्वीस एकीकडे व एकटी एकीकडे अशी अवस्था त्यांच्यात निर्माण करून देऊन ते मार्गस्थ झाले, तेंव्हापासून सव्वीस विमनस्क राहू लागल्या. एके दिवशी दक्ष चंद्राकडे आला तेंव्हा या सव्वीस मुलीनीं आपण उपेक्षीत जीवन जगत असल्याचें व फक्त रोहिणीशीच चंद्र आकर्शित असल्याचें सागून त्या खळखळ रडू लागल्या. तेंव्हा त्याने कळवळून ताबडतोब चंद्राला बोलाविले. चंद्र सासऱ्यापुढे नम्रतेनें ताबडतोब हजर झाला. या माझ्या मुली त्यांच्यावर तुझे मुळीच लब्ध-ओढ नाही म्हणतात हें खरे का असे दरडावून विचारले.
तेंव्हा चंद्र अति नम्रपणें म्हणाला- माझे स्वीकृत कार्य अवाढव्य

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

असल्याची आपणांस कल्पना आहेच. त्यामध्ये मी गुंतलेला असतो माझ्या या कार्यात फक्त रोहिणीच सहकार्य करते म्हणून संपर्क जास्त येतो एवढेच.

अशामध्येच गुरूराज वृहस्पती यांची पत्नी तारा हिच्यावर चंद्र कामभावनेनें आकर्षित झाला हे सर्व सत्तावीस पत्न्याच्या लक्षात आले. रोहिणी फक्त चंद्राला या लब्धापासून दूर राहण्यासाठी सदैव सांगत होती. नाना तऱ्हेच्या बोलीतून व जवळ जवळ उपदेशातून ती त्याला पटवींत होती. रोहिणीला यश मिळालें चंद्रानें आपली चुक कबूल केली व पुनरपि असें घडणार नाही याची शाश्वती दिली. उरलेल्या सव्वीस या सर्व चिडलेल्या होत्याच त्यानी दक्षाला सर्व इत्यंभून कळविले. दक्ष एकदम रागावला व माझ्या सत्तावीस मुलीशी समान वागेन अशी तू बिवाहप्रसंगी शपथ घेतली होती. तू दिलेला शब्द पाळला नाही. तुला तुझ्या सौंदर्याचा, कर्तृत्वाचा, बुद्धीमत्तेचा, गुणवत्तेचा असा सर्वांगी गर्व चढला आहे म्हणून तुझ्या सर्व गुणांचा क्षय होईल. तू क्षयरोगी होशील. असा दक्षानें शाप दिला. शापाचा परिणाम चंद्रावर झाला. सौंदर्य गेल्याचें त्याला दुःख नव्हते पण कार्यकर्तृत्व गेल्यानें तो अतीशय व्याकूळ झाला. तेंव्हा रोहिणी म्हणाली. हे प्रेमनाथ, तुमच्या शीतलतेमुळे जग जगत होते आतां या जगाचें काय होईल ? तेंव्हा, आपण प्रतिज्ञेचे पालन केले नाहीं, पत्न्यामध्यें पक्षपात केला, परस्त्रीकडे-गुरूपत्नीकडे-काम नजरेनें पाहिलें हे आपले पापकृत्य असल्याची त्याला खात्री पटली व ज्यानें शाप दिला त्याच्याकडे उपाय व सुटका विचारणेस गेला. दक्षानें ' शाप देणारा शाप परत घेऊ शकतच नाहीं असें प्रतिपादलें. ' नंतर रोहिणीसह चंद्र ब्रम्हदेवजवळ गेला. ब्रम्हानें देवाधिदेव महादेव, कैलासपती शंकर याची तपश्चर्या करण्यास सांगितले. त्याप्रमाणे चंद्र व रोहिणी या पतीपत्नींनी महान तपश्चर्या केली. भोळाशंकर प्रसन्न झाले, चंद्राबर कृपा - अनुग्रह - करून ' चंद्रा, तुझी शक्ती पंधरा दिवस वाढेल व पंधरा दिवस घटेल असा आशिर्वाद दिला, रोहिणीसह चंद्र ब्रह्मदेवाला भेटला. त्यानें शंकराची प्राणप्रतिष्ठा करून तेथें स्मारक म्हणून शिवलिंग स्थापन करणेस सांगितलें. तोच

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हा चंद्राचा स्वामी. चंद्र म्हणजे सोम व स्वामी म्हणजे नाथ असा हा 'सोमनाथ' होय, चंद्राने जीवनभर ईश्वरकार्य करीत राहून विश्व-कल्याणार्थ प्रयत्न केले व विश्व सोडून गेला- अदृष्य झाला. चंद्र ही व्यक्ती नसून महान शक्ती होती. चंद्राच्या आठवणी खातर लोकांनी नभांगणातील एका महान शीतल गोळचाला त्यांचे नांव दिले. तेव्हां-पासून तो गोळा चंद्र म्हणून जगात ओळखला जाऊ लागला.

हा गोळा नभात पूर्वीपासूनच होता. त्याचे नांव लोकांनी चंद्र असे ठेवले. चंद्राजवळ सत्तावीस नक्षत्रे राहतात म्हणून त्यांना चंद्राच्या सत्तावीस राण्यांची नांवे दिली.

सोमनाथ मंदिर हे वेळोवेळच्या मुस्लीम राजाकडून इ. स. १०२४, १२९७, १३३१, १३९५, १४९३, अशा पाच वेळा विध्वंस झाले. त्याचा जीर्णोद्धार भाविक भक्ताकडून वेळोवेळी केला जात होता. शेवटचा जीर्णोद्धार स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दि. ८-४-१९५० रोजीं नवानगरचे महाराजा श्री. जामसाहेब यांचे हस्ते शिलान्यास संपन्न होऊन दि. ११-५-१९५१ रोजी राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांचे हस्ते लिंग प्रतिष्ठापना झाली. हे ज्योतिर्लिंग जुनागड जिल्ह्यातील वेरावळ बंदरापासुन पूर्वेकडे चार मैलावर आहे. हे मंदीर पूर्वाभिमुख असून त्यावर मोठा सुवर्ण कळस आहे. त्याच्याही वर ध्वजस्तंभ असून त्यावर रेशमी कापडाचा भव्य पताका सदैव फडकत असतो.

सोमनाथाची पिंड- शिवलिंग मोठे व काळचा दगडाचे असून अत्यंत आकर्षक आहे. बारा ज्योतिर्लिंगात एवढी मोठी पिंड कोठेही नाहीं.

अशा तऱ्हेचा चंद्राचा हा स्वामी होय. हे सोमस्वामी, सोमय्या, सोमशंकरा, सोमशेखरा सोमेश्वरा सोमनाथा तुला असंख्य प्रणाम.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मल्लिकार्जुन

निसर्गरम्य अशा शैलपर्वत माथ्यावर श्री मल्लिकार्जूनाचे जाज्वल्य ज्योतिर्लिंग आंध्र प्रांतातील कर्नूल जिल्ह्यात नंदीकोट्टूर तालुक्यात आहे. भाव घेऊन जाणाऱ्या भक्ताची इच्छा तृप्त होते अशी भाविकांची ठाम श्रद्धा आहे पांडव द्यूत खेळात हरले होते व वनवासात राहात होते. तेव्हां त्यांच्या येथे महर्षी अचानक आले. पांडवांनी त्यांचे आतिथ्य व आदर योग्य भावे केला. धर्माने नम्रपणें महर्षींना आगमनाबद्दल विचारलें. व्यासजी म्हणाले, तुम्हाला युद्धात विजय मिळवावयाचा आहे. तुमचें समोर महान पराक्रमी योद्धे भीष्म, द्रोण, कर्ण दुर्योधन हे आहेत. त्यांना जिंकण्याकरतां एक अदृष्य शक्ती तुमचे पाठीशीं पाहिजे. तेंव्हा ती मिळवण्याकरता तुमच्यातील अर्जून योग्य आहे त्याने इंद्रकील पर्वतावर जावून तप करून शंकराला प्रसन्न केले पाहिजे व त्याच्याकडून ती शक्ती मिळवली पाहिजे. सर्वांनी मानले. अर्जूनानें तेथे जाऊन तपश्चर्या सुरू केली ती जागा म्हणजेच श्रीशैल मल्लिकार्जून अर्जूनाचे खरें सत्व पाहणे करीता तेथे शंकर व पार्वती वेष पालटून (भिल्ल व भिल्लीणी रूपांत गणासह) आले. अर्जून तपश्चर्येत मग्न असतांना एक मोठा रानडुकर समोरून येताना पाहिला, तो आपल्या अंगावर येणार म्हणून त्यानें बाण सोडला. समोरून शंकराने भिल्ल रूपानें बाण सोडला. दोनही बाण त्या रानडुकराच्या अंगात एकाच वेळेन घुसलें व तो मरण पावला अर्जून व भिल्ल सेवकगण आपली शिकार नेण्यासाठी आमनेसामने आले व शिकार आपली असल्याबद्दल भांडू लागले. दोघेही हमरी तुमरीवरून हातमिठ्ठीवर आले. शिवानीं-भिल्लानीं हे पाहिले व सामोरे आले. दोघांनीही त्या रानडुकरावर हक्क बजावण्यास योग्यायोग्य शब्द प्रहार एकमेकांवर केले. शेवटीं अत्यंत कोपिष्ठ होऊन अर्जूनानें त्या भिल्लावर बाण सोडला. तो त्या भिल्याने परतविला व प्रतिबाण सोडून अर्जूनाचे धनुष्यच मोडून टाकले ते मोडके धनुष्य घेऊन अर्जूनानें मोठ्या आवेशानें शंकराच्या मस्तकावर जोरदार प्रहार केला, तेव्हां भगवान शंकर (भिल्ल रूप सोडून) प्रसन्न झाले. ज्योतिर्लिंग रूपानें प्रगट झाले व त्याला पाशुपत अस्त्र (शक्ती अस्त्र) दिले. ज्या ठिकाणी ही घटना

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

घडली त्या स्थळाचे नांव 'श्रीशैल मल्लिकार्जून'

अतर्क्य कालावधींपूर्वी कृष्णा नदीच्या उत्तर तीरावर चंद्रसेन या महान बलाढ्य व सद्वर्तनी राजाचे राज्य होते. त्यांचें राज्यात सर्व लोक सुखी व समाधानी होते इतरत्र असुरांचा भयंकर धांगडधिंगा होता. त्यातून सर्वांना मुक्त करण्याचें आव्हान त्यानी स्वयं स्विकारलें व सर्व राक्षसांचा नायनाट करण्याचा त्यांनी ठरविले. मीं युद्धात गेल्यावर कित्येक वर्षे लागतील व कदाचित मी जीवंत परत येईन की नाही व माझ्या या राज्याचा वारस कोण असा विचारमग्न झाला. राजांची पत्नी सगर्भा होती तेव्हां पुत्रजन्म झालेवर निघावे असें ठरविले. पुढे राणीने कन्येला जन्म दिला. राजाला फार मोठे दुःख झालें. त्यानें त्या मूलांचे नांव 'चंद्रावती' असे ठेवलें. दिवसामागे दिवस लोटून चंद्रावती तीन वर्षाची झाली राजाचा मनोनिग्रह त्याला उंचबळा सतत देत होता. परिणामी एक दिवसी कोणासही न. कळत अचानकपपे राज्य सोडून असूर विध्वंसासाठी तडक निघाला. तो वेळोवेळी स्वारीवर स्वारी करीत युद्धामध्यें सतत गुरफटला, इकडे चंद्रावतीनें यौवनात प्रवेश केला

सौंदर्यवती व सर्वगुणसंमन्न चंद्रावती अनेक विद्येतून व युद्ध विद्येतूनही अत्यंत तग्वेज झाली तिच्या या गुणांचे कौतुक करण्यास तिचा पिता नव्हता हे तिच्या आईला सदैव दुःख ठवकरित होतें. एकदा मैत्रिणीसह शंद्रावती आपल्या मातेच्या अनुज्ञेने वनविहारासाठी गेली. एके दिवसी लहरीने ती घोडयावर बसून आपल्या पाळीव प्रिय हरणाला सोबत घेऊन धावत निघाली दूरवर जातांच एकाएकी हरण घाबरले व थांवले समोर पाहते तो एका राजाने हरणाची शिकार करण्यासाठी धनुष्यावर बाण चढवलेंला दिसला. तेव्हां अति रागानें व त्वेषानें 'खबरदार, हे हरण माझं आहे, त्याची शिकार करणाराचीच शिकार होईल.' हे आवेशपूर्ण शद्व व तिचा पवित्रा आणि धैर्य पाहून राजा एकदम चपायला तिचें तेज धैर्य, सौंदर्य, निर्भयता पाहुन राजा खूष झाला व म्हणाला 'आपण कोठे राहता' 'आम्ही या जंगलात विहार करण्यास आलो आहोत' असे म्हणून आपले हरण घेऊन विरश्रीच्या भरात ताडकण निघाली. तिला जाताना पाठमोरे तिचे संपूर्ण शरीरावयव तो कामुक

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नेत्रांनी पाहत होता. हरणाची शिकार हे तो पूर्णपणें विसरला व या तेजस्वी सुंदरअशा मुसमुसणाऱ्या न हुंगलेंल्या पुष्पाचा (चंद्रावतीचा) स्वाद साधावा व हीच आपली जन्मातली खरी शिकार मिळवावी म्हणून तो बेचैन झाला. काय करावें कुठे भेटावे, कसे बोलावे, कसे भुलवावे, याचा रात्रदिन विचार करू लागला. ही रूपवती दररोज सरोवरावर स्नानास जातें अशी शोधातून त्याला बातमी मिळाली तलावाजवळील झाडाआड बसून तिचे सर्वांग कामवासनेतून त्याने पाहिले व आकर्षक अशा नवथरा पुष्ट, मांसल, नाजूकशा सर्व भागांचे त्यानें अत्यंत आकर्षक व कामुक शद्बांतून सुंदर असे काव्य रेखाटलें व तलावाच्या काठी नित्य फेकून निघून जाई तो कागद ती रोज वाचे, पण पण हा कोण व कोठे रहातो, हे तिला कळेना शेवटी दोघांची भेट तलावाकाठीच झाली.

अति जवळून प्रथम भेट झाल्यामुळे राजाने चंद्रसेनानें चंद्रावतीचा हात आसक्तीनें हळूवार आपल्या हाती घेतला व कामस्वरुपाने विव्हळ झालेल्या नजरेनें तिजकडे पाहत होता. चंद्रावतीनें त्याच्या हातात निष्पाप बुद्धीनें हात दिला. या स्पर्शातून राजाच्या अंगावर प्रेमाचे शहारे उमटले नाहीत व त्याचे आंतरिक समाधान झाले नाहीं. तरींही त्याने पुढील लघटपणा चालूच ठेवला. त्याने 'मी राजा आहे व तुझ्याशी लग्न करण्याचें ठरवले आहे, मीं तुला घेऊनच जाईन ? असें म्हणताच चंद्रावती म्हणाली 'तुमचे माझ्यावर प्रेंम आहे व मी तुम्हाला आवडतें हे मला ही कळले आहे .पण मी तुमच्याकडून पितृप्रेमाची इच्छा करते' राजा एकदम खवळून तुला उचलून नेतो म्हणताच 'मला बळजबरीने उचलून नेणारा अजूनही जगात जन्मला नाहीं. एवढयातूनही कोणी मुर्खानें तें धाडस केले तर त्याला यमसदनाला पाठवणेची हिम्मत माझें अंगी आहे. काम विव्हळ राजा म्हणाला मी साऱ्या राक्षसांना ठार मारून मी येथून जवळच असलेल्या चंद्रगुप्तपूर या स्वग्रामी जात आहे. मी तेथचा राजा आहे असे ओघात बोलून गेंला. चंद्रावती चकापली. ईश्वरी संकेतच म्हणून मी पितृप्रेमानें तुमचेकडे खेचले गेले. तुम्ही माझे वडिल आहात. मी तीन वर्षाची

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

असतांना तुम्ही मला, मातेला, राज्याला सोडून गेलात. हे सारे ऐकूनही राजावर परिणाम झाला नाही. पुन्हा त्यानें आपले कामुक पंचांगाची री ओढली 'तू माझी कन्या आहे. म्हणून काय झाले ! तू तरुणी आहेस. तुझें रुप सौंदर्य माझें नेत्रांतून जीवनभर जाणार नाहीं.' चंद्रावती भयंकर चिडली व संतापून अयोग्य व अत्यंत अभद्र शब्दात नानाप्रकारे अवमान करु लागली, तिचे केस विसकटले, भान हरपले, तिने प्रत्यक्ष कलकत्त्येच्या कालिकेचें क्रूर रुप धारण केले. तिचे प्रत्येक शब्द शर राजाच्या अंत:करणाची चिरफाड करु लागले. त्याची चूक त्याला कळली. पश्चात्ताप झाला व तो चंद्रावतीकडे क्षमेची याचना करु लागला. तिनें त्याला आपल्या पर्णकुटीत आणले बहु दिवस तो या कृत्याच्या शर्मेने बाहेर पडेना, कोणाशी बोलेना, मनावर आपण अधमाधम असल्याचे त्याला पटले. जगात काय तोंड दाखवावें म्हणून त्याने एक चिठी लिहून ठेवून कृष्णेंत – श्रीशैलच्या पाताळगंगेत आपला देह अर्पण केला चंद्रावतीला फार दु:ख झाले

कामाचा परिणाम काय होतो हें तिला पुरेपुर कळले व जीवनभर महादेव भक्ती व अविश्रांत कर्मयोग करीत राहण्याचें तिनें ठरवलें, ती कृष्णा किनारी एके दिवशी फिरत असताना तिला अजाण असंस्कारी कांही गवळी लोक भेटले त्यांना भक्तीमार्ग शिकवीत ती प्रभुकार्य करू लागली तेथील सर्व लोक तिला 'आई' म्हणू लागले व दैवी शक्ती समजून पूजा करु लागले. लोकांना मी ज्ञान शिकवू कीं भक्ती शिकवू हें तिला कळेना ज्ञानानें लोक शुष्क व मठ्ठ बनतील व भक्तीनें नादान-दुवळे बनतील तेंव्हा हा प्रश्न तिनें महादेवजीपुढे टाकला. कारण कामातील जबरदस्त शक्ती ; त्यातील सौरभ सौष्ठव व अति विकृत– घृणा स्वरुप तिनें पाहिले होते. देवानें तिच्या स्वप्नांत येऊन तू कामावर चिडली आहेस हे ठीक नाही, पण त्यांच्या आधीन होणे हेंही ठीक नाही त्यासाठी चंद्रावती, तू ज्ञानपीठ व प्रेमपीठ या दोहोंच्या संयोगातून सदैव वाग असे सांगितले. जीवनांत दोहोंची गरज आहे. तौलनिक जीवन दीक्षा हाच जीवनांचा भाव आहे आकर्षणात जसा काम भाव

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आहे तसा वात्सल्यभावही आहे. ज्ञानाला वळवून जेव्हा जीवनात प्रेम अर्पण करशील तेव्हा कामाचे आकर्षण न राहता वात्सल्य भावच राहील. या बाबत मी फक्त आईचेच वात्सल्य अनुभवले आहे. म्हणून तुम्ही मला पित्याचे वात्सल्य द्या अशी प्रार्थना आहे असे म्हणताच 'एका पवित्र स्थळी मी तुला भेट देईन. तू कर्मयोग चालू ठेव असे प्रभूनी ठणकावून सांगितले व चंद्रावतीचे नेत्र उघडले. तिनें कर्मयोग चालू ठेवला.

चंद्रावतीकडे दहा वीस गायी होत्या. एक चांगली मोठी दुभती एकाएकी तीन चार दिवसापासून दुधच देईना, तेव्हां तिनें गाय कोठे चरते व काय करते याची चौकशी करणेस गवळ्यांना सांगितले तेव्हा मागे जाऊन पाळत ठेवली तर एके ठराविक ठिकाणी गाय जाते तेथे पान्हा फुटतो व आचळांतून दुधाच्या धारा वाहू लागतात, गवळ्यांनी हें चंद्रावतींला कळविले पौर्णिमेच्या रात्री ती शोध घेत तेथे आली व महादेवाची प्रार्थना केली ते स्थळ म्हणजे भिल्ल रुपानें अर्जुनाला पाशुपत अस्त्र दिलेलेच होय, ती जागा म्हणजेच. **श्री शैल मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग होय.** चंद्रावतीच्या कर्मयोग प्रार्थनेला. भगवान शंकर प्रसन्न झाले, चंद्रावती नेत्र उघडून माझे बापाविना आईनें लालन पालन केले आता बाप आईविना भेटत आहे. हे प्रभो असे का ? असे म्हणतांच त्याने पार्वतीला बोलवलें व मल्लिकार्जुनाच्या रूपांत दर्शन दिले. मल्लिका म्हणजे पार्वती व अर्जुन म्हणजे शंकर या एकाच ज्योतिर्लिंगात एकरूप बनून चंद्रावतीला दर्शन दिले. केवळ प्रेम कार्य करीत नाही व केवळ ज्ञान उद्धार करीत नाही. यासाठी मल्लिकार्जुन हें प्रेमपीठ व ज्ञानपीठ बनले. निर्भय शौर्याचे व वात्सल्याचे दर्शन हा निसर्गरम्य शैलपर्वत घडवीत आला आहे. भक्तांना इच्छित फल प्रदान करुन सर्वांना समाधान देणारा आहे.

कैलास दरबारात एके दिवशी शिव (शंकर) व शक्ती (पार्वती) यांचा विचार षण्मुख (षडानन) गणपती व (गजानन) या आपल्या दोन पुत्रा पैकी प्रथम विवाह कोणाचा करायचा या बद्दल चर्चा करु लागले. तेव्हा दोन बंधूनाही आनंद झाला. पार्वतीचा लाडका पुत्र

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गजानन, हे शंकराला पूर्ण माहित होते. शंकरानें युक्ती काढून, दोघाना जवळ बोलावून 'पृथ्वी प्रदक्षिणा करुन जो माता पित्याला नमस्कार करील त्याचा विवाह प्रथम करायचा असे सांगितले' व सर्वांनी मान्य केले. षण्मुख हा शूर वीर कर्तृत्वशाली असल्याचे व हा गणपती बोजड शरीराचा, याला कांही पळापळ करायचे माहीतच नाही, हा काय करणार ! तेंव्हा गणपती हरणार व षण्मुख जिंकणार हे पार्वतीला मनामधून कळू लागले इतक्यात गणपतीनेही ही पैज झुंजण्याची व जिंकण्याची खास तयारी दर्शविली तेव्हा षण्मुख पृथ्वी प्रदक्षिणेस निघून ही गेला. गजाननानें पार्वतीस हळूच म्हटले 'हे आई, मला पोटभर गूळ खोबरे खाऊ दे व थोडिशी विश्रांती घेऊन मी पृथ्वीप्रदक्षिणेस निघतो' यथेच्छ गूळ खोबरे झोडपून गजा न झोपला व गाढ झोपून घोरु लागला चिंताग्रस्त पार्वतीने गणपतीला उठवले व पृथ्वीप्रदक्षिणेंस जाण्याची आज्ञा दिली. स्वच्छ तोड वगैरे धुऊन, सुखकर्ता, दुःखहर्ता कुशाग्र बुद्ध च्या गणपतींनें जगन्नियता व जगन्नियंती आपल्या माता पित्यासाठी दोन उच्चासने मांडून, त्यांना प्रार्थनेंतून त्यावर स्थानापन्न करुन त्या दोघांना प्रदक्षिणा घालून, भावपूर्ण नमस्कार केला व पैजेचा संकल्प जिंकल्याचे सांगून, गजानन खऱ्या अर्थाने फलाधिकारी झालें.

बऱ्याच कालवधीनंतर षण्मुख (षडानन, कार्तिकेय) पृथ्वी प्रदक्षिणा आटोपून आपला आता विवाह होणार या महदानंदभरात परतले. तेव्हां त्याच्या नजरेस सर्वत्र प्रतिकूल परिस्थिती दिसू लागली. गजाननाचे लग्न विश्वरूप प्रजापतीच्या 'सिद्धी' व 'बुद्धी' या दोन कन्यंबरोबर होऊन सिद्धीस 'क्षेम' नावाचा व बुद्धीस 'लाभ' नावाचा असे दोघाना दोन पुत्र हीं झाले होते व ते आपापल्या मातेच्या मांडीवर आनंद ओसंडत खेळत होते (लोकांची अशी समजूत आहे की गणपतीचे लग्नच झाले नाही तर कांहीचे म्हणणे आहे की गणपतीची बायको सरस्वती आहे. या दोनहीं कल्पना चुकीच्या आहेत म्हणून येथे मुद्दाम खुलासा केला आहे) षण्मुख तथा कार्तिकेय यांनी प्रतिकुल अशी सर्व घटना पाहून माता पित्यांना वंदन करुन म्हणाले 'आता मी विवाहच काय पण स्त्री जातीचे या जन्मात दर्शन ही घेणार नाही अशी प्रतिज्ञा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

करुन रागाने क्रौंच पर्वतावर निघून गेले. शंकर पार्वतीनी नारदकरवी बोलावणे पाठवले पण षण्मुख परतले नाही. मातेच्या कोमल व प्रेमळ हृदयाला ते पटले नाही व शंकरासह पार्वती क्रौंच पर्वताकडे निघाल्या हे अंतज्ञानी षन्मुखानें ताडले व तेथून आणखी चार योजने दूर निघून गेले व तेथून कठोर निरोप पाठवला कीं कोणत्याही स्त्रीचे मुखावलोकन मला करायचे नाहीं असा माझा पण आहे, तेव्हा पार्वती जरी माझी माता असली तरीं ती स्त्रीच आहे म्हणून तिनेही माझेजवळ येऊ नयं. अत्यंत दुखी मनानें पार्वती व शिव क्रौंच पर्वतावर परत आले. व तेथेंच मल्लिकार्जुन व भ्रमरांबिका या नावानें कायमचे राहिले, श्रीशैलपासून चार योजनेवर 'कुमार पर्वत' आहे तेथं षण्मुख तया कार्तिकेय मंदीर आहे त्यास कार्तिक स्वामी मंदीर असे म्हणतात तेथं कार्तिक पौर्णिमेला मोठो यात्रा भरते.

श्रीशैलम् येथें मल्लिकार्जुन व भ्रमरांबिका या देवतांची स्वतंत्र मंदीरे आहेत. कृतायुगात हिरण्यकश्यपु, त्रेतायुगात राम, द्वापरयुगात पांडव, कलियुगात हेमरड्डी मल्लम्मा यांनी या दोनही देवतांची भक्ती करुन मुक्ती मिळवली आहे. समुद्र सपाटीपासून सुमारे १७०० फूट उचीवर हे मंदीर असून भोवती सव्वीस फूट उचीचा व तीन फूट रुंदीचा भक्कम मजबूत दगडी तट आहे. मंदीराभोवती चारही बाजूस चारही दिशाला एक एक अशी चार अति उच गोपुरे आहेत. देवळावरती चार बाजूस चार व मध्यें एक मोठा असे सोन्याचे पाच मनोरे आहेत. मंदीरात दहा विहिरी असून एक पुष्करणी वजा व एक भरपूर पाण्याची आहे. पाताळगंगेचे स्थान मंदीरापासून सुमारें दीड मैलावर आहे.

मंदीराचा आवार ६८० फूट लांब व ५१० फूट रुंद असून लंबचौकोनाकृतीचा आहे. मंदीरातील सभामंडपात नटराजाची धातुची पुराण प्रसिद्ध मूर्ती असून समोरच विशालकाय नंदीकेश्वराची बैठक आहे. मंदिराच्या बाहेरच्या भींतीवर रामायण व महाभारतमधील कांही प्रेक्षणीय प्रसंग उत्तम रीतीनें कोरलेले आहेत. मुख्य गर्भगृहात श्री मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग फारच आकर्षक आहे. ते आठ अंगुले उंचीचे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

असून लिंगाभोवती तीन फण्या असलेल्या नागराजानें विळखा घातला असून लिंगावर त्यानें फणा उभारला आहे. आसपासची मंदीरे शिल्पकलेनी नटलेली आहेत. देवस्थानचे पूजेस देवस्थान कमीटीतर्फे एक जंगम व एक ब्राम्हण असे दोन अर्चक ठेवली आहेत. अलीकडे दर्शनास तिकीटही ठेवले आहे. येथें महाशिवरात्रीपासून चैत्र पौर्णिमेपर्यंत उत्सव साजरा केला जातो.

आंध्र प्रदेशातील महिबूबनगर व कर्नुल जिल्ह्याच्या सीमेवर एका प्रचंड दरीतून वाहणाऱ्या कृष्णेंच्या विस्तृत पात्रास धरण बांधकाम पूर्ण होत आले आहे. महाशिवरात्रीस देवस्थानांत मंडप उभारुन शिव पार्वतीचा विवाहोत्सव थाटाने साजरा केला जातो. फाल्गुन वद्य अमावस्याचे रात्रो १२ ते चैत्र पाडव्याचे पहाटे पाच वाजेपर्यंत सोलापूरच्या सिद्धेश्वर भक्त मंडळासच मंदीरात खास प्रवेश दिला जातो. रुद्राभिषेक व सहस्त्र बिल्वार्चन आदि भाविक कार्ये सोलापूरकरातर्फे हक्काने केली जातात. ही परंपरा बहुवर्षापासून चालत आली आहे. सन १९५४ पासून आंध्र सरकारने देवस्थानकडे विशेष लक्ष दिलेमुळे रस्ते, पाणी, निवारा, लाईट यांची भरपूर व्यवस्था झाली आहे. देवस्थान समोरील पूर्व बाजूचे महाव्दारातून बाहेर पडल्यावर 'पाताळगंगा' येथे स्नानास जाणेस थोडचाशा सपाट भागातून चालून गेल्यावर ८५२ पायऱ्या उतरुन खाली जावे लागते त्या पायऱ्या कदंब राजाच्या कन्येनें बांधले आहेत असा तेथें शिलालेख आहे.

भीमनु कोलानु अर्थात भीमन कोळ्ळ अत्यंत रमणीय स्थान एका प्रचंड खोल दरीत मंदीरापासून चार मैलावर आहे. पांडव वनवासात असतांना येथे भीमाला तहान लागली पण कोठेच पाणी सापडेना. तेव्हां भीमानें जमीनीवर मोठ्या जोराने गदा प्रहार केला. तेव्हां पाण्याचा श्रोत जमीनीतून उफाळून वर आला तो पाण्याचा उच्छास अद्यापही तेथें नजरेस पडतो. शिखरेश्वर तथा हाटकेश्वर हे दरापासून सुमारे सहा मैलावर मंदिर आहे. हे ज्योतिर्लिंग देवस्थानापेक्षा फारच उंचावर व चढणावर आहे. येथून मल्लिकार्जून मंदीर कळस दर्शन होते व तें महान पुण्यकारक मानले जाते. याशिवाय

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ज्योतिर्लिंग मंदीराभोवती अनेक मठ मंदीरे तीर्थे आहेत त्याची जंत्री देणें येथें टाळत आहे.

हे मल्लय्या, मल्लेशा, मल्लेश्वरा, मल्लिका स्वामी, मल्लिनाथा मल्लिकार्जूना, तुला अगाणित प्रणाम.

महाकाल

महाकाल हें ज्योतिर्लिंग मध्य प्रदेशातील माळवा विभागात क्षिप्रा नदीकिनारी उज्जयनी येथे आहे. फार प्राचीन काळीं उज्जयिनी येथें विक्रम राजाचें राज्य होते. तेंव्हा तेथील लोक सुसंस्कारसंपन्न, सदाचारी, विद्याधर्म, सुकर्म तत्पर, अर्थोत्पादक, निर्जश्वर्यी होते. उंच देवालयांचे सुवर्णकळस आकाश भेदण्यासाठी गर्वानें आपली डोके वर काढीत होती. रत्नजडित राजवाडे, मोठेमोठे नाट्यशाळा, पाठशाळा, चंद्रशाला असे सर्व मोठ्या डौलानें नांदत होते मोर, चक्रांग हंस हे क्षिप्रा नदीच्याकाठी मोदभराने नर्तन करींत होते. मोठेमोठे कवीश्वर, दाते पंडित हे सारे आपले सर्वस्व विसरून बसले आहे असे वाटते. कारण हे वैभव आज तेथें दिसत नाही, विक्रम राजाची कथा सर्वश्रुत आहे म्हणून येथे त्याची पुनुरावृत्ती करीत नाही.

या उज्जयिनीला पूर्वी अवंतीनगर म्हटले जात होते. वेद, शास्त्रपुराण यामध्यें अवंतीनगरी म्हणूंनच उल्लेख आहे. या अवंतीनगरीमध्यें अनेक राजकुळे, शास्त्रपंडीत, कलावत, गुणवंत, कर्मयोगी होऊन गेले. एक काळ असा होता की, लोकांमधील भाविकता नष्ट होऊन हीन, क्षुद्र व लाचार जीवन जगू लागले. अशा पडत्या व संकरी काळात वैदिक वाङ:मयाचा गाढा अभ्यासू व पंडित गरीब ब्राह्मण क्षिप्रा किनाऱ्यावर राहत असे. इश्वरी भक्ती व त्यांचे चिंतन, मनन यात तो पूर्ण जाणकार होता. तो सर्वसाधारण व सामान्य लोकात समरस होऊ शकत नव्हता व वैभवी पंडिताशी सहमत होऊ शकत नव्हता. माणूस कितीही पंडित असला, सत्य व शील सांभाळून वागणारा असला व जग झुकवायचे वाक् पांडित्य व बोलकला नसेल तर त्याची प्रगतीच होऊ शकत

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नाही. लोकांशी आपण मिसळू शकत नाही व त्यांचा सहयोग मिळवू शकत नाहीं. याबद्दल तो सदैव भगवान महादेवाजवळ लोकांतील अज्ञान घालवणेकरतां व भक्ती, मुक्ती, भुक्ती या तिन्हीमधील गेलेलें ज्ञान परत मिळवणेसाठी 'मला संतान दे व त्यांच्या मुखे मी लोकांना भक्ती-मार्ग सांगेन.' अशी प्रार्थना करीत असे.

शंकरकृपेनें पुढे त्याला चार मुलें झाली. त्यानी आपल्या मुलांची नांवे १) देवप्रिय, २) प्रियमेधा, ३) सुव्रत, ४) सुकर्म अशी ठेवण्यांत त्याच्या इच्छेचें व मुलांच्या ज्ञानाचें व बुद्धीमत्तेचे दर्शन व्हावे असा भावार्थ होता. या चारही मुलांना त्यांने सर्वांगी ज्ञानसंपन्न केलें. सर्व मुलांचे पांडित्य व बुद्धिमत्ता पाहून तो संतुष्ट झाला. कालावधीनें तो ब्राह्मण कालवश झाला. या चार मुलांनी वडिलांचे भक्तीकार्य लोकांत रुजवण्यासाठीं भगीरथ प्रयत्न केले. त्याच्या रक्षणासाठी, संगोपनासाठी, संवर्धनासाठी एक जबरदस्त भाविकांचा संच निर्माण केला. क्षिप्रा-काठचा आजूबाजूचा बराचसा प्रदेश भक्तीमय बनवला. हा संघ वाढला व सतत विकास होऊ लागला व ते रत्नमाल पर्वताच्या कुशीत वास्तव्य करू लागले. बहुसंख्य समाज त्यांना पूज्य मानू लागला. त्या रत्नमाल पर्वतावर दूषण नांवाचा असूर राक्षस राहत होता. त्याला हे पटेना व एनकेन प्रकारेण त्यांना हाकलून – हुसकून देण्याचा त्याने चंग बांधला. व निंदा, नालस्ती, अवमान असा सर्वांगी सतावण्यास सुरूवात केली. यायोगे त्यांच्यावर व त्यांच्या अनुयायांवर कांहीच परिणाम झाला नाही. त्यामुळे तो भयंकर संतापून आपल्या सर्व असूर सैन्यानिशी तुटून पडला. भाविक भक्तांना चार बंधूंनी न भिण्याचे आश्वासन दिलें. व प्रभूची प्रार्थना केली. आम्हीं आतापर्यंत तुझी निरीच्छ - निष्काम सेवा केली व सर्वांमध्ये भक्तीभाव निर्माण केला. तूं या संकटातून आम्हाला व आमच्या सहकाऱ्यांना मुक्त करेपर्यंत आम्ही येथून हलणार नाहीं असा हट्ट धरला. अशावेळी सर्व भाविकामध्यें एक प्रचंड शक्ती निर्माण झाली व त्यांनी दूषणाला हरवले व सारा परिसर आनंदमय झाला.

या प्रचंड शक्तीला विचारले 'तू कोण आहेस'

त्या शक्तीने सांगितले 'मी महाकाळ'

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

असें नांव का धारण केले ?

काळालाही हरवणारा मी, मी महाकाळ अर्थात महाकाल.

या चार बंधूनी व सर्वांनी अत्यानंदाने प्रणाम केला व हे भगवान, भाविकांच्या रक्षणासाठीं व दुर्जनाच्या संहारासाठी आपण येथेंच राहावें व येथून जावू नये अशी प्रार्थना केली. या सर्वांच्या भक्तीमय विनंतीस मान देऊन क्षिप्रा नदीच्या किनारी ज्योतिर्लिंग म्हणून शिवांनी वास केला. तेंच हें उज्जयनीचें महाकाल ज्योतिर्लिंग.

सुमारें दोन अडीचशें वर्षांनंतर पुन्हा अवंतीनगरी भोगमय बनली भक्तीमार्ग सुटला. यावेळी तेथें चंद्रसेन नावाचा राजा राज्य करीत होता. व धार्मिक वृत्तीचा होता. त्याचे घराण्यांत परंपरेने महाकालाची पूचा चालत आली होती. राजा प्रतिनित्य राज वैभवातून, साजश्रृंगारातून अपूर्व थाटामाटातून पूजा करीत असे. तो पूजेमध्यें व्यग्र असताना एक पांच सहा वर्षांचा मुलगा आपल्या मातेंसह तेथं आला. त्यांने राजाजी पूजा व त्यातील तल्लिनता पाहिली व त्यावें हृदय मोदविभोर झाले. खेळणें, कुदळणें, शिकणे सोडून. शिवलिंग करून, त्यासमोर राजाप्रमाणें एकाग्र होऊन, बसू लागला राजाची पूजा त्यानें पूर्ण टिपणी केली होती. राजासारखेच शिवलिंगपूजेंत तो स्वःतला समजू लागला. आई जेवणास चार-सहा वेळा हाक मारीत असतां त्याचें तिकडे लक्षच नव्हते. शिवलिंग आणि तो अशीच त्याची स्थिती. तिला राग आला व चार - सहा बिरूदावल्या हासडल्या तरी ही त्याचें लक्षच नाही. तिनें जवळ जाऊन त्याचें हाताला धरून उठवले. त्याची समाधी भंगली, पूजा उध्वस्त झाली, माझ्या आईच्या हातून माझ्या आराध्य दैवताची अशी निर्भत्सना व्हावी ! असा भडका त्याचे मनात उठू लागला. व या पापाचें क्षालन माझ्या मृत्युनेच होईल असें विचार करीत असताना मी चूकच केली नाही तर मी का मरावें ? चूक माझ्या आईनें केली त्यासाठी तिलाच ठार मारण्यासाठी तो पुढे धावला. पण त्याचे विचारी व संस्कारी मन त्याला आडवू लागले. रामचंद्रानें सतावणाऱ्या व वनांत पाठविणाऱ्या आपल्या सावत्र आईच्या वनांत जातांना पाया पडला मग मी हें करणे योग्य नाहीं. असे समजून आईला न सांगता त्याच दिवशी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

काळोख्या रात्री घराबाहेर पडला. फिरता-फिरता तो और्व्य ऋषीच्या आश्रमात येऊन विद्याभ्यास करू लागला. एके दिवशी त्याने ऋषीला विचारले. 'मला शंकर प्रसन्न झाला पाहिजे याला करावे लागेल ? मुनीजी म्हणाले 'तू जे बोलतोस त्यात शिव आहे, तुझ्यात शिव आहे, माझ्यात शिव आहे, व शिव सर्वव्यापक आहे.' त्यास एक नवी दृष्टी लाभली. गुरूचा निरोप घेऊन तपोवनाचे बाहेर पडला, निघाला हे खरे पण काय करालचें, कसें करायचें, कोठें करायचे, केव्हां करायचें, याचा विचार करीत-करीत तो शिवनामस्मरणात तल्लीन झाला. मी व माझा शिव या शिवाय जगात काहीच नाही, याचा आनंद व अनुभूती तो पाहत होता. बुद्धी, तेजस्विता, भक्ती, भाव हे सारे जवळ असून शक्ती व वैभव असल्याशिवाय लोकामध्ये आपण कांहीही रूजवू शकणार नाहीं हा दृष्टांत त्यास होऊ लागला. त्याचा कर्मयोग व त्यातील तीव्रता पाहून शिवजी प्रसन्न झाले व तुला जें पाहिजें ते हा चिंतामणी देईल असे सांगून त्याच्या हातात चिंतामणी देऊन अदृष्य झालें. चिंतामणी म्हणजे काय व तो कसा, केंव्हा, कोठं वापरावा याचे ज्ञान नसलेमुळे तो आपले खिशात ठेवून महाकालाचे दर्शनास गेला. इतक्यात चंद्रसेन राजा पूजेसाठी मंदीरामध्यें आला हा मुलगा महाकालासमोर तल्लीन होऊन बसलेला पाहून राजा आश्चर्यचकित झाला. राजाने हा कोणी महान तपस्वी, कर्मयोगी शिवाचा परमभक्त आहे हे ओळखून त्याला प्रणाम-नमस्कार-केला. तेंव्हा तो मुलगा म्हणाला 'हे महाकाळ परंपरेने तुझे उपास्य दैवत असून काळास फिरविणारे लोकांचें दैवत आहे. तू तर स्वतःच कालप्रवाहात वाहून चाललास, भगवान शिवाला काळ बदलणारे लोक पाहिजेत, आज लोकपिडित आहे, निस्तेज व लाचार आहे, असेच जर चालले भक्ती काय अवस्थेत जाईल ? याचा विचार सांगत खिशातून चिंतामणी बाहेर काढला, तेंव्हा साऱ्या मंदीरामध्यें महान तेजोमय प्रकाश चकाकला. राजा दिपून गेला 'हे राजा हा चिंतामणी घे व प्रभू कार्याला वाहून घे' असे म्हणाला. या मुलाच्या वेळोवेळच्या विचाराने चंद्रसेन राज्याची सूत्रे हलवू लागला. लोक सुखी-समाधानी कृतीशील झालें. हें सारें चिंतामणीच्या योगानेंच घडू लागले, हे आसपासच्या धनलोभी राजांना सहन न होऊन त्या सर्वांनी एकत्रित होऊन चंद्रसेन राज्यावर चाल करून त्याचा पराभव करण्याचा एकमुखी निर्णय

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

घेतला. हे चंद्रसेनाला कळताच या दैवी शक्तीशाली मुलास त्यानें हें सांगितलें. व संकटाला - युद्धाला तोंड देणेचे ठरवून युद्धाच्या तयारीला लागला. तेंव्हा शिवाच्या या वरपुत्राने मी एकटा त्यांचेकडे जाऊन हा सर्व विषय संपवून येतो' असें सांगितले. त्या प्रमाणें सर्व युद्धातूर राजांना भेटून त्याना युद्धापासून परावृत्त केले. तुम्ही चिंतामणी मिळवूं इच्छिता तो चितामणी त्यालाच का मिळाला? तुम्ही शूर वीर, बुद्धीवान वैभवशाली, सामर्थ्यशाली आहात, मग तुम्हाला तो का मिळाला नाहीं. तुम्हीं आजच्या मैदानांत उतरूं इच्छिता ते तुम्ही मेल्यावर. तुमचेबरोबर येणार का ? तुम्ही जो दगडाचा चिंतामणी मिळवूं इच्छिता याचा अर्थ खरा चिंतामणी तुम्हाजवळ असूनही तो तुम्हाला दिसत नाहीं, तुम्ही प्रत्येकजण चिंतामणीच आहां, तुम्हां सर्वांचे देह हे चिंतामणीच आहे. तुम्हीं खऱ्या अर्थानें या तुमच्या देहाचा देवकार्यासाठीं – शिवासाठीं – समाजकल्याणासाठीं उपयोग केला तर चंद्रसेनाजवळच्या दगडाची काही किंमतच नाही. ही महान प्रभावी व तेजस्वी वाणी ऐकून सर्वांनी युद्धाचा बेत रहित केला. पुढें या सर्वांचा एक संघ निर्माण करून चंद्रसेन राजाला त्याचा प्रमुख केलें. सर्वांच्या मनांतील किल्मिष निघून गेले, हृदयं पवित्र बनलीं व सर्वजण शिवकार्याला लागले. सर्वांच्या राज्यात सुखशांती समाधान निर्माण झाले. अशा या महान कर्तृत्वशाली व परमज्ञानी शिव-भक्ताचे नांव 'श्रीकर' होय. पुढें याच श्रीकराच्या आठव्या पिढीत श्रीकृष्णाचा जन्म झाला. काळ बदलण्याची सदैव हिम्मत राखण्यासाठी हा कराळ काळाचा काळ – 'महाकाळ-महाकाळ' होय.

महाकालेश्वर हे शिवलिंग विशाल असून नागवेष्टित आहे पिंडीवर अति सुंदर कलाकुसरीनें नटलेली चांदीची भव्य छत्री आहे. हे शिवलिंग तळघरात असून दक्षिणाभिमुख आहे. मंदीरामध्ये एक तुपाचा व एक तेलाचा असे दोन नंदादीप अखंडपणे तेवत असतात हें विशेष आहे श्री महाकालेश्वराची एक जुने व एक नवे अशी दोन मदिरे येथे आहेत. वर दिलेले वर्णन नव्या मंदिराचे आहे. मंदिरालगत दक्षिणेस अनादिकालेश्वर व वृद्धकालेश्वर ही मंदिरे आहेत वृद्धकालेश्वर म्हणजेच जुने महाकाल मंदीर होय या उज्जयिनीला पूर्वी कनकशृंगा, कुशस्थळी, अवंती, चूडामणी, अमरावती, पद्मावती, कुमुद्वती, विशाल

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

भोगावती, हिरण्यमयी अशी निरनिराळी नांवे होती. ही नगरी म्हणजे चवदा विद्या व आडसप्ट कलांचे माहेरघर होते. विपत्ती व वैभव या दोहोंची पराकोटी या नगरीने अनेकवेळा अनुभवली आहे

या नगरीची लोकसंख्या सुमारे पावणे दोन लाख आहे. श्रीकृष्ण ज्येष्ठ बंधू बलरामासह येथें आले होते. प्रतिनित्य या शिवलिंगाची पूजा व आरती तीनवेळां केली जाते व तीनवेळा श्रृंगार चढवला जातो पहाटेची पूजा चिता भस्माने केली जाते हे विशेष आहे विजयादशमीस महाकालेश्वराची सवारी–मूर्ती मिरवणुकीने निघते, तेव्हा राज्य शासनातर्फे तोफांची सलामी दिली जाते हे महत्वाचे आहे महाकाल मंदीर स्टेशनपासून दोन मैल दूर आहे मंदीराचे दोन खंड असून वरच्या भागावर ॐकारेश्वर मूर्ती आहे व त्याच्या ठीक खालोखाल भागात महाकाल लिंग आहे याशिवाय हरसिद्धी, विक्रम, गोपाल, गढकालिका भर्तुहरी, अंकपाल, मंगलनाथ, कालभैरव, सिद्धपट, छोटा गणेश, बडा गणेश, चिंतामण गणेश ही मंदीरे आहेत

हे महाकाला, महाकालेश्वरा, तुला माझा साष्टांग नमस्कार

ॐकार अमलेश्वर

ॐकार अमलेश्वर हे ज्योतिलिंग मध्यप्रदेशातील नेमाड जिह्यात नर्मदा किनारी आहे. या जगात आपला जिवंत इतिहास व भाव वेगवेगळें नांवानें व रूपानें वठवणारे तीर्थक्षेत्रे व पवित्रस्थानें बरीच आहेत. त्यापैकी रेवा नदी ही एक होय रेवा या प्राचीन नदीचें नांव पुढे नर्मदा असे ठेवणेत आले. नर्म म्हणजें खेळ अथवा आनंद-जीवन हा एक खेळ आहे. अशी शिकवण त्यावेळच्या शेकडों ऋषीजनाना रेवा नदीने आपल्या उसळत्या लाटेने दिली म्हणून त्यानी तिचे नांव नर्मदा असे ठेवलें. येथे नर्मदनदी अति अरुंद भागातून वाहात येत असल्यामुळें पाण्याला ओढ जास्त आहे निसर्ग रेखीव व सुंदर आहे खांडवा स्टेशन (जक्शनजवळ) विंध्य पर्वतराजींत ॐकार आकारासारखा एक पर्वत भाग नर्मदा नदी किनारी आहे. त्यामध्यै ॐकार अमलेश्वर भगवान

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ज्योतिर्लिंग आहे.

प्राचीन काळी तपोवनातील मुनीच्या आश्रमातून एक ऋषीकुमार पोक्त विद्याभ्यास पूरा करून आपल्या घरी आला तेन्हा त्याच्या मनांत समाधान वाटेना हा माझा देह प्रभूकार्यासाठी आहे हे समजून त्याने आपले घर सोडले व आपली विद्या शिव चरणीच वाहायची असा निर्धार केला. फिरता फिरता तो विंध्य पर्वताजवळ आला. खळखळ वाहणारी नर्मदा नदी व तिच्या काठी असलेला ॐकार आकाराचा विंध्य पर्वत पाहून त्याची नजर तेथेंच खिळली. येथे भगवताचा कांही विशेष हेतू असला पाहिजे हे त्यांनी ताडले. कांही दिवस तेथे मुक्काम केला. तेथे पर्वतीय लोक राहात होते. नगरात राहणारे नागरीक व पर्वतात राहणारें पर्वतीय, एके दिवशी हा ऋषीकुमार नदीत स्नान करीत असतांना गुरे हाकीत येऊन आठ दहा वर्षाच्या एका पर्वतीय अजाण मुलाने मोठ्या धैर्यानें 'तुम्ही हें काय करीत आहात' असे विचारले 'मी स्नान करतोय' तुम्ही रोज सनान करता काय' 'स्नान तर रोजच केले पाहिजे' 'आम्ही ही रोजची कटकट करीत न्हायी पाऊसानें भिजल कीं सनान झाल'

ऋषीकुमार भोजन तयार करूं लागला. 'तुम्ही ह्यो काय करतां, अग्नी कसला पेटवला.' जेवण तयार करण्यास या सर्व खटाटोपी केल्याच पाहिजे. आमी कधी असल्या भानगडी करीत न्हाई, बाणानें शिकार मारायची व फाडून खायची, असे म्हणून त्यानें बाण दाखवला.

एके दिवशी तो ऋषीकुमार ध्यानस्थ बसला असतांना तो पर्वतीय बाल मित्र त्याचेकडे आला. मैत्रीच जमली होती त्याचें ते बसणे पाहून आश्चर्य वाटले व त्यानें जणू ऋषीकुमारवर हक्क म्हणून त्याला हलवून जागे केले. ऋषीकुमार जागृत झाला. मी भगवंताचे चिंतन करीत होतो.' 'कोण भगवंत ?' अन तेच्यासाठी डोळे कशाला मिटायचे ! तुझ्या वडिलांनें तुला भगवंताचे चिंतन शिकवले नाही काय ? वडिल मंजे कोन ? त्या ऋषीकुमारनें ओळखले, या आपल्या अजाण मित्राला कांहीच बाह्य जगाची कल्पना नाही. त्याला बरोबर घेऊन ऋषीकुमारनें भोजन केलें. 'असल जेवन म्या जलमात खाल्ला नाहीं' तो मुलगा आपली गुरे घेऊन निघून गेला, एके दिवशी ऋषीकुमार त्या

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गुलालाघेऊन पर्वतीय लोकवस्तीत आला. माणसाला माणूस न ओळखणाऱ्या व खायला स्वापद अगर शिकार मिळाली नाही तर पोटच्या पोराला कापून खाणार अशा रानटी लोकामध्यें आला व त्याने आपला कर्मयोग सूरू केला. तेंव्हा त्याला काय त्रास सोसावा लागला असेल त्याबद्दल न लिहीलेलेच बरे. त्यासाठी त्याला फार मोठा पुरुषार्थ व कल्पनातीत तप करावे लागले व खऱ्या अर्थाने भाव उभा करून लोकांना नवे जीवन दिले या ऋषीकुमाराजवळ सागर संपूर्ण पिऊन टाकण्याचीही शक्ती होती असा तो ऋषीकुमार म्हणजेच 'अगस्ती महर्षी' होय. या अगस्तीनें त्या पर्वतीय लोकामध्ये आई बाप, बहीण, भाऊ, नातलग यामध्ये प्रेम व ऐक्य निर्माण केलें, अद्वैताचा जीवन सिद्धांत जोवनांत आणायला समजावले. त्यांचेमध्ये अजोड संघ शक्ती निर्माण केली व वर्णव्यवस्थाही समजावली. शेतीत कष्ट ओतून फलप्राप्ती करू लागले. सर्वत्र सुख व समाधान पसरले पुढें कांही कालानंतर भक्तीवरील लोकांची श्रद्धा कमी होऊन नष्ट होऊ लागली म्हणून अगस्ती हितचिंतक नारद तेथें आले. लोकांनी आमचे सारखे सुखी जगात कोणी नाही अशा शद्बांचे नारदांना मानपत्र दिले. नारद म्हणाले 'तुमचे सुख समाधान वर्तमान ऐंकून समाधान झाले पण तुमच्या विंध्य पर्वतापेक्षा मेरू पर्वत कितीतरी श्रेष्ठ आहे.' व तेथील लोक तुमचेपेक्षा सुखी असून श्रेष्ठ आहेत. हे ऐकून विंध्य पर्वतातील लोकांना फार दुःख झाले व त्यानी तपश्चर्या सूरू केली. या पर्वतीय लोकाजवळ वैभव, एकता, सामर्थ्य, कर्तृत्व, होते पण भक्तीभाव नव्हता. तो नारदांनी त्याना दिला. हा नारदाचा उपदेश ऐकून सर्व थरातील लोक एकत्रीत आले आणि घरोघर भक्तीचा नंदादीप लागला. लोकोत्तर कार्यारंभ झाला. ज्या ठिकाणी या लोकाना भगवान प्रसन्न झाला ते स्थळ म्हणजे ॐकार अमलेश्वर - ॐकारम अमलेश्वरम्.

महादेवाचें दर्शन होताच सर्व लोक अत्यानंदी झाले. भावभरीत अंतःकरणानें पादपुजा केली व कमावलेली बुद्धी, विद्या, संपदा, समृद्धी तुझ्या योगानेंच प्राप्त झाली त्यासाठीं वेळोवेळी या आमच्या सर्वस्वांना तुझा स्पर्श होवो अशी प्रार्थना केली. हे आमच्या हातून व आमचे वंशजांचे हातून सदैव घडत राहण्याकरता हे प्रभो, पंचानना, पतितपावना, परमेश्वरा, तू येथेंच स्थिर रहा, या आपल्या कर्तृत्वशाली

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

व निरिच्छ मुलांची – भक्तांचीं मागणीं प्रेमाने मान्य केली व त्याप्रमाणें तेथेच राहिला.

अगस्ती महर्षीच्या तपोबलाने पवित्र ठरलेला नर्मदा किनारा व भोवतालचा प्रदेश व तेथील ॐकारम् अमलेश्वरम् याची लोकांना कालांतरानें विस्मृती व्हावी हे खेदजनकच होय, याला कारण म्हणजे दस्यू लोकाकडून ते वेळोवेळी मलीन बनवले गेले. दस्यू म्हणजें लूच्चा, दुसऱ्याचे हरण करणारा, मायावी, क्षणीक बोली, म्हणजे वेळोवेळी विविध बोली बोलणारे. सकाळची बोली दुपारी नाही व दुपारची बोली संध्याकाळी नाही अशा लोकांचा भरणा वाढु लागला. अशा दस्यू लोकांनीं या पर्वतीय भक्तीवान लोकावर चाल करुन त्यांचा भावीक पणा, सुंदर संस्कृती, देवावरील श्रद्धा, प्रेम, ही सर्वस्व उध्वस्त केली. अशा संकटी काळांत मांधाता नांवाचा अति प्रभावी तेजस्वी भक्तींवान राजा उदयास आला. या मांधाता राजाचे नांव भारताच्या पौराणिक इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नोंदलेले आहे. या मांधाताचे भाविक कार्य अजोड आहे. युवाश्वर राजाचा हा पुत्र होय, या मांधाता राजाला मुचकंद व अंबरीष असे दोन मुलगे होते. अंबरीष हा अत्यंत धर्मकार्य तत्पर व कर्तृत्वशाली महादेवाचा परम प्रिय भक्त होता.

माधांता व अंबरीश सारखे भक्तीवान राजे झाले नाहीत. मांधात्याला कळले कीं, लोकांत भक्ती आहे पण ती दस्यू लोकांकडून बिघडवली जात आहे. म्हणून त्याने लोकशांती, समाज शांतोसाठी शंभर यज्ञ केले त्यायोगे भगवान ॐकार अमलेश्वर खुष झाला मांधाताने सर्व दस्यूना सळे की पळो करुन सोडले व समाजातील संस्कृतीचा खऱ्या अर्थाने जीर्णोद्धार केला. साऱ्या जगाला सुख समृद्धी प्राप्त करुन दिली. मांधाता म्हणाला ‘ हे प्रभो, मी तुझे कार्य मनापासून केलें आहे. पण तुझे दर्शन व्हावे ही एकच इच्छा आहे ’ म्हणून त्याने ध्यानार्थ ठाण मांडले प्रभू प्रसन्न झाला. तेव्हा पंचाननानें मांधातला सांगितले तूं परमभक्त आहेस, तुझ्या जीवनांतील परमोच्च क्षण तुला साधावयाचा आहे, तर शिवरूप होऊन तू मला भेट, तुझें आत्मरूप नाहीसेंकर व तुझ्या प्रेताचे मुंडके माझ्या गळयात घाल म्हणजेच तुझा अहंभाव मला वाहून टाक. ज्या ठिकाणी भगवंत प्रसन्न झाला त्या स्थळी शिवाची दोन रूपे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आहे, एक ॐकारेश्वर व दुसरा अमलेश्वर. पहिले प्रणव रुपी व दुसरे पार्थिवरुपी अशी दोन शिवलिंगे तेथें आहेत.

ॐकार अमलेश्वर मंदिरात तेरा ब्राम्हण प्रतिमित्य साडे तेराशें शिवलिंगे तयार करुन त्यांची षोडशोपचोर पूजा करुन ती नर्मदेत विसर्जन करतात. याचा सर्व खर्च अहल्याबाई होळकर यांचे देणगीतून चालतो. नित्य शिवलिंगे तयार करुन विसर्जन करणाऱ्या ब्राम्हणांना या कार्याच, इतिहास काय, कशासाठी केले जाते, त्याचे फल काय असे विचारले असता ते अर्चक ब्राम्हण समर्पक असें पटवून देऊ शकत नाहीत त्यायोगे भाविकांना यथोचित बोध होत नाहीं. दर श्रावण सोमवारी ॐकारेश्वराची मिरवणूक निघून अमलेश्वराकडून रात्री परत येतें. येथील निसर्ग फारच रमणीय आहे. अगस्ती ऋषीला, मांधाता राजाला, पर्वतीय लोकाला, नारदाला धन्यवाद. ॐकारेश्वर व अमलेश्वरयांना प्रणाम.

वैद्यनाथ

हें ज्योतिर्लिंग महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील बीड (चंपावतीनगर) जिल्हयात अंबेजोगाई तालुक्यात परळी ग्रामी आहे, फार प्राचीन काळी आसुरी वृत्तीमुळे सत्कर्मे बंद पडली व त्यांतील नैराश्येमुळे ही ती अटकली गेली. अशा वेळी बुद्धीशाली वर्ग सत्कर्मे करायला धजत नव्हता हें मृतंडऋषी व त्याची धर्मपत्नी मनस्विनी यांना ते सहन झाले नाही. व मनांत उद्वीग्नता निर्माण झाली. सत्कर्मे झाला पाहिजेत असे त्याने सतत वाटें व त्यायोगें सतत लोकांना एकत्र करी, समजावी, पण लोक ऐकत नव्हते. मुनीजी निराश झाले. परंतु मनस्विनीच्या मनात आपणास पुत्ररत्न प्राप्त व्हावा व त्याने समाजाला सत्कर्मास तयार करावे असें वाटत होते. अशा प्रवाहात मनस्विनी पुत्राची माता झाली व त्याच्या जीवन विकासासाठी दोघेंही प्रयत्न करु लागले त्यानी आपल्या पुत्राचें नांव मार्कंडेय ठेवले. ईश्वर कृपेनें लाभलेला सुपुत्र अत्यंत हूशार, चलाख व तेजस्वी असलेनें दोघांचें मन भरुन येत होते, परंतु तो अल्पायुषी असल्याचे ज्योतिषानें सांगितल्यामुळें त्यांना अतीव दुःख झाले. निष्कर्मण्यावस्थेंत सांपडलेल्या समाजाला कार्य प्रवण करण्याचे राहून जाते. याबद्दल रात्रंदिन चिंता करु लागलें पुत्राच्या अल्पायुष्याबद्दल आठवण होतांच मनस्विनी स्फुंदून स्फुंदून रडू

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

लागे. मार्कंडेयनें मातेला रडण्याचे कारण विचारतांच ती उत्तर देण्याचें टाळत असे. एके दिवसी आईजवळ रडण्याचें कारण सांगणेबद्दल हट्टच धरला, तेव्हा नाविलाजानें सांगतांना ' तु या जगात व परलोकांत सुद्धा दुःखी होऊ नये अशीच माझी इच्छा आहे. पण लोक तू अल्पायुषी असल्याचे सांगतात त्यामुळे तुझ्या हातून दैवी कार्ये कशी होणार या बद्दल मला चिंता आहे. ' यासाठी तू रडतेस? ' यांत कांही विशेष महत्व नाही मी भगवंताकडून दीर्घायुष्य मागून घेईन. मग तर झालें ना. आता रडू नकोस, हस पाहू, खरोखरच हस पाहु '

देवाकडे मागणी करणेस मी काय केले पाहिजे ते सांग पाहु, शंभू महादेवाच्या नामाचा जप कर, तप कर,हे शब्द कानी पडतांच मातेला नमस्कार करुन तप करायला निघाला. धो धो वाहणाऱ्या नदी किनारी एक मोठ्या वृक्षाच्या गर्द छायेखाली तो महादेवाचा जप करणेस्तव बसत असे. त्याच वृक्षाखाली एक दिवशी कांही संत सत्कर्माबद्दल चर्चा करीत बसले होते. ते सप्तर्षीच होते. मार्कंडेयने त्यांना नमस्कार केला सप्तर्षी म्हणाले ' तू तप करीत आहेस हें ठीकच आहे. पण त्याचे फळ तुला या जन्मात मिळणार नाही. पुढील जन्मात मिळेल. तुझे अल्पायुष हा नियतीचा नियम आहे. तो नियती आपला नियम कधीच तोडीत नाही. एखाद्या कर्मयोग्यासाठी एखाद्या वेळेसच देवाधिदेव महादेव नियतीच्या नियमाचे उल्लंघन करतो. तेव्हां तू कर्मयोग करायला — भगवताचें काम करायला लाग म्हणजे तू निश्चित दीर्घायुषी होशील ' त्याने कर्मयोगाला सुरुवात केली. भक्तीमार्ग समजावून सांगण्यास सुरुवात केली सप्तर्षीकडून दृष्टी मिळाली, शक्ती व कृती डोळस झाली. प्रचंड पुरुषार्थ साधना केली; लोकांचीं वृती बदलवू लागली. त्यांची जीवनें उज्वल होऊ लागली. जो भगवंताचे काम करतो त्याला तो सांभाळतो. मृत्युमार्कंडेय जवळ जसाजसा येंऊ लागला तसातसा भोळाशंकरही त्याच्या अगदी जवळ येंऊ लागला. शेवटी भगवंतानें त्याला अगदी जवळ घेतलें. भगवंताला बिलगुन बसलेंल्या मार्कंडेयावर झडप घालण्या एवढी ताकद मृत्युजवळ राहीली नाही.भोळ्याशंकरानें मार्कंडेयाला बिलगून घेतलेंलें स्थळ आणि भक्ती ज्ञान व कर्म या तिनही गोष्टी ज्या ठिकाणी एकत्र आल्या ते स्थळ म्हणजेच परळी वैद्यनाथ ज्योतिर्लिंग ! !

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

त्यानंतर बहु वर्षानी हे स्थळ निस्तेज बनू लागले. तेथील परमाणू प्रभावी असून सुद्धा त्याना काळाच्या फेरात दडावे लागले. पुढें रामकाल आला. या कालमान सुरुवातीला रावण हा सर्वांगी वैभवशाली व कर्तृत्वशाली ब्राम्हण राजा होऊन गेला. प्रत्यक्ष देव त्याच्या घरी पाणी भरीत होते. या लिखाणाचा वाच्यार्थ न घेता लक्षार्थ घेतल्यास त्याचे जवळ साऱ्या जगाचे वैभव होते. हे कळेल एके दिवशी रावण व त्याची आई कैकसी हे दोघे गोष्टी करीत बसली होती. तेव्हा रावण अभिमानाने म्हणाला 'आई, माझे जवळ साऱ्या त्रैलोक्याचे वैभव आहें' कैकसी म्हणाली "खरे आहे, पण हे तुझें वैभव अशाश्वत आहे ईशस्पर्शी वैभवाचा आनंद चिरंतन असता. तुझ्यालंकेत ईशस्तघन होत नसेल तर तिचे चिरंतनत्व टिकणार नाही. रावण म्हणाला "जो वैभव आणू शकतो तो भगवंत नाही. आणू शकणार"? असे म्हणून तडक निघाला व स्वर्गात जाऊन त्यानी तपश्चर्या केली. पूजा प्रसंगी एक फूल कमी पडले म्हणून त्याने एक डोके कापून श्री शंकर चरणी अर्पण केले. त्याच्या दहा डोक्यात, एक काम, दुसरे क्रोध, तिसरे लोभ, चवथे मद, पांचवे मोह. साहवे मत्सर, सातवे दारैषणा, आठवे वित्तैषणा, नववें पुत्रेषणा असें नऊ डोकी त्यानी प्रभूचरणी वाहिली प्रभू भोळा शंकर प्रसन्न झाला व 'तुला काय पाहिजे' असें विचारले. तेव्हां रावण म्हणाला 'मला तुझे फक्त आत्मलिंग दे व ते मी लंकेस घेऊन जाणार आहे' शंकर म्हणाला 'ठीक आहे. पण एक गोष्ट लक्षात ठेव, रस्त्यात जिथे ते ठेवशील तिथे मी स्थिर होईन तेवढे सांभाळ'. रावणाने ते कबूल केले, पण ते शिवलिंग अतिशय जड होते रावणाला ते नेंता येईना तेव्हा. शंकरानी त्या लिंगाला दोन रुपे देऊन दोनही मध्ये आपली प्रचंड शक्ती ओतली व ती लिंगे कावडीतून नेंण्यास सांगितले. रावण कावड घेऊन लंकेस निघाला तेव्हां सर्व देवानी एक सभा बोलवली व शंकर भोलानाथ आहेत. जो जें मागतो त्याला तें भोलानाथ देतो. हा रावण साऱ्या संस्कृतींचा सत्यानाश करीत आहे. त्यालाही शंकरानें आत्मलिंग दिले. या जगातून सद्‌विचार व सद्‌भक्ती नाहीसे होतील. तरी शंकरानें असे कोणालाही वश होता कामा नये, असे म्हणू लागतांच बृहस्पती म्हणाला शंकर भोळा नाही व वर देण्यात त्याची चूक ही नाही तो. सर्वच जाणतो. काय करावे व काय न करावे हे त्याला पूर्ण कळते. सर्व देवानी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वाटेल त्या प्रयत्नानी व किमतीनी ही घटना मोडून काढली पाहिजे असे ठरविले. बाहुबलाने रावणावर मात करणें कठीण होते, त्यासाठी बुद्धीनेच कार्यभाग उरकण्याचे ठरवून बुद्धी देवता श्री गणपती याजवर हे काम सोपविले. त्याने ते स्विकारुन सर्वांना निश्चित राहण्यास सांगितले. गणपती वेष पलटून रावणाकडे गेला व शिष्टाचार पूर्वक विवेक ठेवून त्यानें तुमच्या हातात हा पत्थर कसला म्हणून विचारलें. तेव्हा रावण म्हणाला, अरे याला पत्थर म्हणू नकोस, या शिवलिंगात त्रैलोक्याचे चैतन्य भरलेले आहे. व तें मी महान तपश्चर्यांतून मिळविले आहे. अज्ञानाचे ढोंग करुन गणपती म्हणाला 'एवठा मोठा बलाठ्य रावण व तो कावडीतून पत्थर काय नेतो' असे म्हणत ज्ञानी व बुद्धीमान लोक हसत आहेत. महान वैभवसंपन्न रावणाला हे असले काम शोभत नाही असे म्हणत आहेत. रावणाजवळ अहंकार हा मोठयात मोठा दोष होता व तो स्तुतीला पघळत होता. रावण वर्णनानें फुलून गेला. मी जेथ जातो तेथे तुमचे पराक्रमाचे वर्णन कानावर येते म्हणून आपले दर्शनार्थ येथवर आलो दोघे बोलत चालत असतांना रावणाला लघवी लागली. त्यासाठी तो बाहिर्दिशेला जायाला निघाला हातात लिंग घेऊन लघवी करीत नाहीत ते शास्त्रबाह्य आहें. रावण म्हणाला, देवाजवळ पवित्र अपवित्र असा भेदच नाही त्यासाठी मी इतके दिवस असाच करीत आलो आहे गणपतीनें युक्तीवादातून तुमचे बरोबर इतके दिवस कोणी नव्हते म्हणून तुम्ही तसे केले, आता मी तुमचे बरोबर आहें. तेव्हा ते शिवलिंग माझे जवळ द्या व जा रावण म्हणाला 'ठीक आहे पण काही झाले तरी लिंग जमीनीवर टेकवू नकोस' गणपती म्हणाला 'लिंग वजनदार आहे. तुम्ही बलाढय पुरुष म्हणून उचललात मी ते फार वेळ पेलू शकणार नाही. मला जड वाटू लागले कीं मी तीन वेळा हाका मारीन तेव्हा तुम्ही ते घ्यावे वेळीच तुम्ही न आलेस मी खाली टेकवीन, मग मला दोष देऊ नका रावण दूर लघवीला गेला व उठला व आपल्यासमोर एक सुंदर नवतारुण्याने रसरसलेली नवयुवती पाहिली स्त्री सौंदर्याचा जातींवंत शिकारी रावण तिला पाहातच राहिला लिंग व गणपती, ढोंगी गवळी याना विसरुन गेला, गणपतीनें बराच वेळ झालेवर रावणा, रावणा, रावणा, असे तीनदा मोठयानें पुकारले रावण आला नाहीं. एकीकडचे लिंग जमीनीवर टेकवले व दुसरे टेकवणार इतक्यात रावण धावत धावत आला व ते न टेकलेले हाती पेलून

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जमीनीवर टेकवलेले चिकटलेले लिंग उचलण्याचा फार प्रयत्न केला पण उपयोग झाला नाही. दुसरे लिंग घेऊन लंकेकडे निघाला वाटेंत त्याच परिस्थितीने व पध्दतीने दुसरे लिंगही जमीनीला चिकटलें. गायीच्या कानासारखा त्याचा आकार असल्यामुळें त्या शिवलिंगाला गोकर्ण महाबळेश्वर असे म्हणतात महान बलवान असा रावण अहंकारामुळे व स्त्रीलंपटतेमुळे हताश होऊन हात हलवीत लंकेंस परत गेला अहंकार व स्त्रीलंपटता आपल्यापासून गेली नाही तर आत्मलिंग आपणापर्यंत येणारच नाही. मिळूनही उपयोग होणार नाही व कामी पडणार नाही ते वाटेंतच राहिल. या दोनही विकारापासुन जपून वागा. जीवनातल्या महत्वाच्या जागेवर कसे उभे राहयचे याचे ठोस मार्गदर्शन ही शिवलिंगें करीत आहेत.

आत्मलिंगाबाबत परळीकी गोकर्ण या स्थानापैकी कोणत्या ठिकाणी ही हकींकत प्रथम घडली याबद्दल लोकामध्यें कुतुहल आहे. गोकर्णास प्रथम हा भाग घडला असता तर कावडीतील दुसरे शिवलिंग घेऊन रावण सरळ दक्षिणेस-लंकेस स्वगृही गेला असता, त्याला उलट उत्तरेस-परळीस येंण्याची गरजच नव्हती, यावरुन प्रथम परळी वैद्यनाथ येथच ही हकीकत घडलीं व नंतरच गोकर्णाचा भाग घडला हे सुर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे.

परळी वैद्यनाथ–वैजनाथ ज्योतिर्लिंगास दिनांक २४-५–७४ ते ९–६–७४ पर्यंत अतिरुद्राभिषेक कार्यक्रम (१४६४१ वेळां रुद्र पारायण) झाला. सदर कार्यक्रम श्रीरंभापुरी व श्रीकाशी जगद्‌गुरुचे नेतृत्वाखाली मोठ्या वैभवाने झाला, वैद्यनाथ ज्योतिर्लिगास स्पर्श दर्शन करण्यास व रुद्राभिषेक करणेस कोर्टतर्फे निकाल वीरशैवांनी भगीरथ प्रयत्नानी मोठ्या जिद्दीने व हिरारीनें मिळवला आहे. मात्र शुचिर्भूत अंगाने देवस्थानांत प्रवेश करावा लागतो कोणी पुजारी अगर इतर कोणा अडवू शकत नाही. त्याच प्रमाणें सोलापूरला अतिरुद्राभिषेक कार्यक्रम श्री रंभापुरी जगद्‌गुरुचे नेंतृत्वाखाली दि. १६/५/६८ ते १९/७/६८ पर्यंत झाला आहे. याशिवाय इतर कोठे झाल्याचे ऐकिवात नाही.

'वैद्यनाथ धाम' म्हणून संथाळ परगण्यात ई. आय. रेल्वेच्या जसिडीह जंक्शन–स्टेशनजवळ हे मंदीर आहे. याला चिताभूमी असेही नांव आहे. हे मंदीर अतिशय सूंदर आल्हादकारक असून कलाकुसरीने नटलेलें आहे पण हे ज्योतिर्लिंग नव्हे. परळी वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मंदीर गावाचे नैऋत्येस फलांगावर एका डोंगर टेकडीच्या उतरणीवर आहे. या डोंगरास नगनारायण म्हणतात. मंदीरास वर जाण्यास पूर्वउत्तर व दक्षिण बाजूनें चिरेबंदी दगडो बांधलेलें पसरट पायऱ्या आहेत. या वैद्यनाथास धन्वंतरी म्हणून संबोधिलें जाते.

हे वैजनाथा, गोकर्ण महाबळेश्वरा, माझा प्रणाम स्वीकार करावा

डाकिन्या भीमाशंकर

महाराष्ट्रांतील पुणें जिल्ह्यांतील आंबेगांव पेटा व खेड तालुका यांच्या सीमेवर सह्याद्रीच्या एका शिखरावर हें भीमाशंकर ज्योतिर्लिंग आहें. हें स्थान पुण्यापासून सुमारे १२५ कि. मी. व मुंबईपासून सुमारें ६० कि. मी. वर आहे. महाराष्ट्रातील या दोनही प्रमुख गांवाच्या मध्यें उंच डोंगर माथ्यावर निसर्गरम्य अशा प्रशांत भागात वसले आहे. येथे जाण्यास चौहोबाजूनी एस. टी. सोय अलीकडे झालेली असून पर्यटन केंद्रही झालेले आहे. व तें समुद्र सपाटीपासून सुमारे ३५०० फूट उंचावर आहे.

फार प्राचीन काळी येथे डाकिनी नांवाचे शिवभक्त लोक राहात असत, त्यामुळे तेथील वनाला डाकिनी वन असे नांव पडलें. या वनात एक प्रभावशाली विधवा स्त्री राहात होती ती अतिशय सुंदर होती. तिच्या सोनेरी व वैभवशाली भूतकाळाची ओठवण होताच ती रडत असे. तिचे नांव कर्कटी असे होते. तिला एक हुषार, चपळ, संवेदनशील व तिच्यावर प्रेम करणारा भीम नांवाचा मुलगा होता. रडण्याचे कारण भीम विचारतांच ती उत्तर देणें टाळत असे. बाल भीमने एके दिवसी रडण्याचे कारण सांगण्याचा आईजवळ हट्टच धरला तेव्हा तिनें सांगितले, माझ्या वडिलाचे नांव मर्कट वीराट नावाच्या महान पराक्रमी वीरा बरोबर माझे लग्न झालें. मी आनंदी व वैभवी जीवन कठीत होते. ज्याला सारे लोक 'भगवंत, भगवंत' म्हणतात तो राम आला. दोघामध्यें युद्ध होऊन रामाने त्याला ठार मारले. विराटाच्या मृत्युनें माझें सारें संसार सुख वैभव उद्धस्त झालें व विधवा बनून माहेरी राहावयाला आले. माझे आई वडिलांना अतीवदु:ख झालें अशा काळी सुतीक्ष्ण नांवाचा राजा स्वत:ला अगस्तीमुनीचा शिष्य समजणारा ऋषी लोकांच्या सस्कृतीत वाढलेंला होता. माझ्या पतीच्या हत्येंचा बदला घेण्यासाठी सुतीक्ष्ण रकाजाडे रामाला ठार मारण्यासाठी माझे आई वडिल गेलें. तेव्हा संघर्ष

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

होऊन सुतीक्ष्णानें माझे आई वडिलांना मारुन टाकलें. या जगात माझे कोणीच उरले नाही, पती, पिता, माता यांना भगवंताला-रामाला मानणाऱ्या लोकानी मारुन टाकलें. तेंव्हापासून भगवंताला-रामाला मानणाऱ्या लोकांची पडछायाही नको म्हणून मातृ-पितृ गृह सोडून श्रमालाच राम म्हणणाऱ्या लोकांमध्ये येथें येऊन राहिलें त्यांच्याशी मैत्री बांधली व येथेंच स्थिर झाले.

मी तरूण होती, सौंदर्यवती होती, पण कडक स्वभावाची होती, त्यामुळे सारे लोक मला दबून वागत, अति आदरानें पाहात. एक दिवस एक अज्ञात तरुणाने मोठ्या धाडसानें माझा हात पकडला. त्याचेशी झालेल्या बोलाचालीवरुन तो ऋषीमुनींला व रामाला मानणाऱ्या लोकांचा कट्टर विरोधी असून शूर व पराक्रमी होता,त्याचे योगाने आपले इप्सीत साध्य करुन घ्यावे म्हणून आमचेमध्ये डोळ्याला डोळे भिडून प्रेम उभे राहिलें. मी त्यांचेशी विवाहबद्द झाले व आनंदीं दिवस कंठू लागले मुलगा भीम विचारता झाला 'आई त्य. तरुणाचें नांव काय'? कर्कटी म्हणाली ' तो लकेचा राजकुमार कुंभकर्ण होय. तुझ्यां आगमनाची माहिती मिळण्यापूर्वीच त्याला लंकेला जावे लागले. मी सुद्धा बरोबर लंकेला जाण्याचा हट्ट धरला. तेव्हा लंकेच्या राजकुमाराच्या भावीं पत्नीला राजघराण्याच्या इतमानाप्रमाणे थोरल्या बंधूला सांगून घेऊत जातो असे आश्वासन देऊन तुझे वडील निघून गेंले. मी त्याची वाट पाहात असे पण ते परत आले नाहीत.' पुढे मला कळलें की, युद्धामध्ये रावणाबरोबर त्याचाही वध त्या कावेबाज रामाने केला. आतां तूच एक माझे आशास्थान आहेस असें सांगून स्फुंदून स्फुंदून रडू लागली.

आईच्या रडण्यातील आक्रोशाने व भयानकतेनें भीम भयंकर चिडला व ऋषीमुनीला व देवाला मानणाऱ्या लोकांवर बदला घेण्यास तयार झाला. ज्यानी माझ्या आईला दोन दोन वेळा विधवा बनविले' वडिलांची हत्या केली, आईच्या कुटुंबीयांचा सत्यानाश केला — अशा आकाशातल्या न दिसणाऱ्या देवाला मानणाऱ्या लोकांना मी जगु देणार नाही, अशा अहंतीनें तो सर्वासमोर ठाम उभा राहिला. ऋषीमुनींचा संहार करीत गेला. ठिकठिकाणी विजय मिळवित गेला. सर्वत्र हाहःकार माजला. लोक भयंकर घाबरले. त्याकाळी भगवंताला मानणारा सुद—

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

क्षिण नांवाचा निष्ठावान राजा फक्त बाकी राहींला होता. तो देखील या भीमाच्या – भीमासुराच्या हातानें पराभूत झाला. भीमासुरानें त्याला कैद केले.व सह्याद्रीवर आणून ठेवले व त्यास पर्वतावरुन खाली उतरुन कोठेही जायचे नाही असे सक्त बजावलें, तेव्हा पासून यज्ञ कार्य बंद पडले.संस्कृती नष्ट होऊ लागली,लोकांची अतिदुरावस्था झाली,मूर्ती पूजन करायचे तर मूर्ती मिळेनात,सर्व लोक आर्तरुदन करीत होते देवांनी त्यांना जोपर्थंत तुम्ही प्रयत्न करुन थकत नाहीं तो पर्यंत तुम्हाला भगवंत मदत करणार नाही. तुम्ही प्रभूवर अढळ श्रद्धा ठेवून, हिमतीने उभे रहा. भीमासुराने सुदक्षिण राजाला सह्याद्री पर्वतावर नेऊन ठेवले आहे. तुम्ही त्याला भेटा. त्याच्यात हिम्मत व शक्ती आहे. त्याला तुमचा नेता बनवा व या राक्षसांचा संहार करा. सारे सात्विक वृत्तीचे लोक एकत्र आले. रात्री पर्वतावर बैठका भरु लागल्या. मोठी संघटन शक्ती निर्माण झाली, हा सुगावा भीमासुराला लागला. तेव्हां आपण सुदक्षिण राजाला जीवंत ठेवले ही आपण मोठी चूक केली.त्या चुकीच्या सुधारा प्रीत्यर्थ त्यानें प्रचंड सेना उभी करुन सुदक्षिण राजाचा संहार करण्यासाठी चाल केलीं. भीमासुर व सुदक्षिण यांच्या मध्ये घनघोर युद्ध झालें. भगवंताच्या नांवासाठी मरायला तयार झालेल्या लोकांना प्रभूने प्रचंड शक्ती दिली, ते युद्धस्थान व प्रचंड शक्ती म्हणजेच डाकिन्या भिमाशंकरम्, या युद्धात भीमासुर मारला गेला. सूदक्षिण राजाने भगवंताला प्रार्थीले ' हे प्रभू, तू असा असुरांचा विध्वंस करण्यासाठी आम्हांस प्रचंड शक्ती दिलास, त्या भक्तांचें खऱ्या सांत्वनासाठी तू येथेंच राहिले पाहिजेस. भगवंतानें मान्यता दिली व भीमाशंकर म्हणून चिरंतन राहिला ते स्थान म्हणजे डाकिन्या भीमाशंकर ज्योतिर्लिंग होय.

कांही काळानंतर प्रचार कार्य बदलले. आसुरीवृत्ती पुन्हा वर आली. तारकासुर अर्थात त्रीपुरासूर नांवाच्या दैत्याने – राक्षसाने व त्याच्या विद्युन्माली कमलाक्ष व मादाक्ष या तीन पुत्रानी देवाला सतवण्यास सुरु केलें. तेंव्हा ब्रम्ह व इंद्र यांनी शंकराची महान तपश्चर्या केली. शंकर प्रसन्न झाले. शंकरानी त्यांना आदिमायेचा मंत्र जपण्यास सांगितलें. त्यांनी मंत्र जपून आदिमायेची स्थापना केली ती कमलजा–

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

देवी होय. शंकर व कमलजादेवी यांनी एकरुप धारण करुन त्रीपुरासुराचा येथेंच संहार केला तो दिवस कार्तिक शुद्ध पौर्णिमा होय. भीमा म्हणजे कमलजादेवी व शंकर असे जोड नांवाने 'भीमाशंकर' या नांवाने हें स्थान गणू लागलें. कार्तिक शुद्ध पौर्णिमेला येथें यात्रा भरते. हे मंदीर इ. स. १२०० चे सुमारास बांधल्याची आख्यायिका आहे. हे मंदीर बहुवर्षें सभामंडपा शिवाय होते. सन १९६७ मध्ये सभामंडप बांधकाम सूरु झाले. व तें आता पूर्ण झाले आहे. सुमारे ३० फूट रूंद व ५० फूट लांब असा हा सभामंडप आहे. पर्यटक निवास बांधला आहे. तेथें उतरण्याची व्यवस्था चांगली आहे. मंदीर जवळ मंदीर संबंधित अशा फक्त ५० लोकांचीच तेथें वसती आहे. येथें पाण्याचा त्रासच आहे.

भीमाशंकर नांवाचें आसाम राज्यातील कामरुप जिल्हयात एक मोठें मंदीर आहे. या मंदीराविषयी बऱ्याच भाविक कथा आहेत पण त्यावरुन ' डाकिन्या भीमाशंकर ज्योतिर्लिंग? असा कोठेच त्याचे इतिहास वाचनातून बोध होत नाहीं त्यायोगें ते ज्योतिर्लिंग नाहीं पुणेंजवळील डाकिन्या भीमाशंकर हेंच खरें ज्योतिर्लिंग होय.

हे भीमेशा, भीमेश्वरा, भीमशङ्करा, माझ्या नम्र नमस्काराचा स्वीकार व्हावा.

रामेश्वर

हें देवस्थान तामिळनाड प्रांतात रामनाड उर्फ रामनाथपूरम जिल्ह्यांत रामेश्वर या तालुका गांवात समुद्र तीरावर आहे. रामेश्वर हे मदीर १७०० फूट लांब व १४०० फुट रुंद जमीनीवर व्यापलेले आहे. एवढया प्रचंड विस्ताराचे भारतातील एकमेव देवस्थान आहे, याशिवाय फार मोठा भूभाग देवस्थानलगतचा, देवस्थान मालकीचा आहे. एकांत एक असे तीन चौकोनातून देवस्थान विस्तारलेंले आहे. रामेश्वर गांवाची लोकसंख्या सुमारे ३२००० असून त्यांची लांबी सुमारें १।। मैल व रुंदी अर्धा मैल आहे रामेश्वर येथें जाण्यास मीटर गेजनें रेल्वेने जावें लागते. मोटारी, कार्स, टूरिस्टस, टेम्पो, आदि वाहनानी जाणाऱ्यांना मंडपम् या रेल्वे स्टेशनवरच गाडया सोडावे लागतात. मंडपम् स्टेशनपासून पांबन स्टेशनपर्यंत सुमारे दोन मैल पूलवजा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

असलेल्या सेतूबंधावरुन रेलगाडी रुळावरील पाण्यातूनच जाते. भरती प्रसंगी रुळावर सुमारे १॥ फूट पाणी असते व ओहोटीप्रसंगी सहा ते आठ इंच पाणी रुळावर असते. तेथून पांबन व तंगतिमडम स्टेशन ओलांडून रेलगाडी रामेश्वराला जाते.

रामेश्वर हे समुद्रद्धीपावर वसलेले आहे.चार धामापैकी एक धाम असून बारा ज्योतिर्लिंगापैकीं एक ज्योतिर्लिंग आहे. रामेश्वर हे नांव रामास ज्यानी ईश्वर मानलें ते रामेश्वर की रामानें ज्याला ईश्वर मानले ते रामेश्वर असा दोअर्थी शब्द प्रयोग तथा नामाभिधान आहे. असो. बहुतांशी पुराणामध्ये रामानेच रामेश्वराचीं प्रतिष्ठा केली असें आहे. थेथें अगस्त्य महर्षी, राम, लक्ष्मण, सीता. हनुमान, बलराम,पांडव यांनी या तीर्थयात्रेचे दर्शन घेतले आहे या देवस्थानच्या चारी बाजूच्या आवाराच्या मजबूत दगडी भिंती सतरा फूट उंच आहेत. चारी बाजूस चार मोठमोठी प्रवेशद्वारे असून त्यावर सुंदर नक्षीकाम केलेले आहे. दक्षिण व उत्तर बाजूचे महाद्वार सुमारें तीस ते बत्तीस फूट उंचीचे असून ते अपूरे बांधलेले आहेंत. पूर्व व पश्चिम बाजूचे महाद्वार ८०ते९० फूट उंचीचें आहेत. देवस्थानच्या मध्यें चारी बाजूला दगडी रस्ते आहे. देवळांतील दर्शनार्थ फिरणाऱ्या रस्त्याची लांबी सुमारें ४१०० फूट आहे व रुंदी सर्वत्र २० फूटच आहे. दोनही बाजूला २३ फूट उंचीचे २॥ x ३ फूट रुंदीचे व जाडीचे १४४२.नक्षीदार खांब असून त्यावर सुमारें ३० फूट लांबीचा कलाकुसरीने खोदलेला दगडी छत आहे. देव–ळांत तेरा फूट उंच आठ फूट लांब नऊ फूट रुंद असा आकर्षक नंदी आहे. याशिवाय लहानमोठी मंदीरें आहेत. उत्तर भागातील झूल्यावर पार्वती मूर्ती आहे ज्याला शयनाधर म्हणतात. रात्री रामेश्वर मूर्ती उत्सवानें येथें पार्वतीजवळ आणून आरती केली जाते. प्रात:काळी मंगलारती करुन रामेश्वर मूर्ती निजमंदीरांत नेली जाते. **रामेश्वराची पूजा प्रतिनित्य सहा वेळां केली जाते.** रामेश्वरजीचें अत्यंत सुंदर स्फटिक लिंग आहे कीं ज्याचें पहाटे पांचचे पूर्वी दर्शन होऊ शकतें. हे लिंग अत्यंत स्वच्छ व पारदर्शी आहे. जेव्हां यावर दुधाचा अभिषेक होतो तेव्हा त्याचे स्पष्ट दर्शन घडते. **प्रतिनित्य सहा वेळा पूजा होणारे हे रामेश्वर भारतातील एकमेव देवस्थान व ज्योतिर्लिंग आहे.** येथें प्रत्येक दिवस उत्सवाचाच असतो. प्रतिनित्य हजारो परस्थ भाविक

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

यात्रेकरु दर्शनार्थ येतातच. महाशिवरात्र, चैत्र पाडवा, वैशाख पौर्णिमा, संक्रांत या दिवशी येथे मोठी यात्रा भरते. येथे स्पर्श दर्शन होत नाही. तीस-चाळीस फूट अंतरावरुन दर्शन घ्यावे लागते. येथे बारा वर्षाला एकदा कुंभमेळा भरतो तेव्हा लाखो भाविक यात्रेकरु समुद्रस्नान व मंदीरांतील अनेक कुंडस्नान करुन रामेश्वरजीचे दर्शन घेतात.

देवस्थान व्यवस्थेकरतां लोकनियुक्त समिती नेंमली आहे. जायदाद संभाळणेंकरतां पगारी अधिकारी आहे. सर्व कारभार विश्वस्थांचे हाती आहे. मंदीराच्या पूजेसाठी पगारी महाराष्ट्रीय ब्राह्मण आहेत. देणगी देणेंचे असल्यास ती पेटीतच टाकावी लागते. पावती देऊन मोठी देणगी स्विकारणेची पद्धत आहे. निरनिराळ्या प्रकारची पूजा करवणे असलेस निरनिराळी आकारणी आहे. देवस्थानचे पूर्व द्वारातून वाहेर पडल्यावर समुद्रस्नान करुन काशीहून अलाहाबाद त्रिवेणी संगमातून आणलेले गंगेचे तीर्थ तेथील सेतूत-वाळूत मिसळून त्याचें शिवलिंग तयार करुन त्याची षोडशोपचोर पूजा करुन, ती, शिवलिंगाची वाळू पदरात घेऊन, देवालयातील वावीस कुंडांचे स्नान करुन, उरलेंले अर्धे तीर्थ रामेश्वरास देवस्थान पुजारीकरवी वाहिली जाते. ती पदरी घेतलेली वाळू परत काशीस, अलाहाबादेस गंगेत सोडल्यावर यात्रा पूर्ण होते अशी भाविकांची दृढ भक्ती भावना आहे.

मंदीरातील बावीस कुंड—१) महालक्ष्मी. २) गायत्री. ३) सावित्री. ४ सरस्वती. ५) गया. ६) गंगा. ७) यमुना. ८) चंद्र. ९) सूर्य. १०) ब्रम्हहत्याविमोचन. ११) शंख. १२) चक्र. १३) साध्यामृत. १४) सर्व. १५) शिव. १६) कोटि. १७) माधव. १८) नल. १९) नील. २०) गवय. २१) गवाक्ष. २२) गंधमादन.

मंदीरा बाहेरील कुंड तीर्थ—१) चक्र. २) पापविनाश. ३) कवी. ४) मंगल ५) ऋणविमोचन ६) अमृतवापी ७) सुग्रीव ८) जांबव ९) अंगद १० पांडव ११) भीम १२) अर्जून १३) नकुल १४) सहदेव १५) द्रौपदी १६) ब्रम्ह १७) परशुराम १८) हनुमंत १९) अगस्त्य

सुवर्णनगरी लंकेचा राजा रावण याने रामचंद्राची सीता पळवून लंकेस नेली याचा शोध हनुमंताने लावला तेव्हा रामाने आपल्या लक्ष्मण

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

बंधूसह हनुमंत सुग्रीव वानरसेना यांच्या सहाय्याने समुद्रावर सेतू–पूल बांधून लंकेंत प्रवेश करुन बलाढ्य रावण व त्याचा धाकटा भाऊ अक्राळ विक्राळ कुंभकर्ण यांना ठार मारुन, विजय संपादून, तेथील धनाचा व वैभवी राज्याचा अभिलाष न धरता बिभीषणास ते सर्वस्वी बहाल करुन सीतेस घेऊन, स्वग्रामी निघाला, हे पुराण व रामायण सर्वांना माहित आहे. असुरांचा वध करुन भाविका मधील देवावरील भक्ती व संस्कृती टिकविली म्हणून ऋषीनी व भाविक भक्तानी गंधमादन पर्वतावर राम सीतेसह येताच रामाचा जयजयकार केला.सर्वांचे मूखावर आनदं ओसंडत होता पण राम मात्र मनाने व मुखाने दुःखी दिसत होता. हजारो लाखो लोकांना मी युद्धात ठार मारले व ब्राह्मण रावणाला ठार मारले हे महापाप माझे हातून घडले म्हणून त्याचें मन त्याला खात होते. याचें प्रायश्चीत्त मला भोगावे लागतील याचा तो. सतत विचार करीत होता. त्याचा जयजयकार केल्यानें त्याला समाधान लाभले नाही.

पर्वताच्या विशाल पृष्ठभागावर ही भेट झाली होती. मध्यभागी रामचंद्र व सर्वांकडून निरनिराळे प्रश्न विचारले जात होते. समर्पक उत्तरे रामाकडुन मिळत होती. एकाने धाडसाने पुढे येऊन, संधी साधून, हळूच विचारले प्रभू आपण कुशल आहे ना, अयोध्येला जायची तीव्र इच्छा झाली असेल ना, तुम्ही अयोध्येला गेल्यावर भरताला खूपच आंनद होईल ना, पुष्कळशा बाजुंनी रामाच्या विषादाचे कारण शोधण्याचा प्रयत्न झाला, पण कारण कांही कळले नाही. दुसऱ्यानें याहीपेक्षा मोठ्या धाडसानें समोर येऊन विनम्रपणें विचारले प्रभू आपण त्रैलोक्यविजयी झालात, त्रीभुवनांत आपला डंका वाजत आहे, सर्वत्र आनंदी आनंद ओसंडत आहें पण आपल्या बदनावर विषादाची रेखा स्पष्ठ दिसत आहें. तेव्हा आपले दुःख दूर करण्याचे भाग्य आम्हांला लाभो आम्ही येथून तुम्हाला दुःखी अंतकरणानें जाऊ देणार नाही. तेव्हा रामाचा नाविलाज झाला. व त्यानें माझ्या विषादाचे कारण 'हें युद्ध होय. या युद्धांत मी हजारो निरपराध लोकांना ठार मारले. डोके उडविली, संहार केला. त्याच्या इहलोकाची यात्रा मी संपविली. त्यांच्या बायका पोरांचे पुढे कसे होईल हा विषाद माझे मनात ठाण मांडून

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वसला आहे' विचारवंत ऋषी म्हणाले "वैभवासाठी सत्तेसाठी लढाई केली तर ते पाप आहे". दुसरे म्हणालें, "जडवादी भोगवादी विचारसरणी समाजात स्थिर होत असेल, लोकांना विनाशाकडे खेचून नेत असेल तर ते वाचविणेंसाठी केलेलें युद्ध हे पाप नव्हे", तिसरे म्हणाले 'नीतीमता खलास होत असेल, परंपरेचे सातत्य तडा पावत असेल तर ते वाचवणेंसाठी केलेली लढाई हे पाप नव्हे' चवथे म्हणाले 'अधर्मा-विरुद्ध अन्यायाविरुद्ध लढणें हे क्षत्रियांचे कर्तव्यच आहें. तुम्ही क्षत्रीयच आहात तुम्हाला लढाईचे पापच नाहीं.' अनेकांनी दृष्टांत देऊन खुलासा केला, पण रामाचें मन पाप ते पापच असे स्पष्ट सांगत होते. राम म्हणाला 'रावण ब्राह्मण होता, वेद शास्त्र अभ्यासू होता, जन्मजन्माचे पुण्य पदरी घेऊन तो आला होता अशा ब्राह्मणाला मी मारले हे मोठे पातकच आहे' ऋषी म्हणाले, 'रामा तुला आमचा आशिर्वाद आहे. तुला या कृतीचें पाप लागणार नाही. ज्याने हातात आलेल्या तीन तीन राज्यावर उदक सोडले त्याचे हातून पाप होईलच कसे ? राम म्हणाला "तुमच्या साऱ्या गोष्टी मी ऐकल्या पण पाप हें पापच आहे अशा निर्धारापासून मी दूर होऊ शकत नाही' ऋषी म्हणाले 'रावण हा जरी ब्राह्मण असला तरी त्याचे आचार विचार अतिउन्मत असून आतताई होता अशा माणसाला ठार मारलेच पाहिजे अशी शास्त्रज्ञा आहे, राम म्हणाला 'मी विधानाला अनुसरुन चालणारा आहें. विधाना-नुसार चालणाऱ्या माणसाच्या हातुन निधान तोडले गेलें तर ती अक्षम्य चूकच होय', ऋषी म्हणाले 'प्रभू आपण निर्गुणनिराकार, निष्कलक, निराभास, निरामय निष्पाप आहात, आपल्याला पाप कसले' राम म्हणाला 'मी स्वतःला माणूस समजतो, मी दशरथ राजाचा पूत्र आहें मला धर्माची बंधने मान्य केलीच पाहिजे' ऋषींचा व रामाचा संवाद ऐकून वाचकांना अर्जूनास कृष्णानें युद्धामध्ये सांगितलेली गीताच होय असे वाटणे साहजिकच आहे तेथे कृष्णाने अर्जूनास तयार केले येथें ऋषीनी रामाला तयार केले.

ऋषींना विचार पडला, रामचंद्राचा विषाद कसा दूर करावा, या विवंचनातून काही मार्ग काढण्याचे ठरवले व म्हणाले, " प्रभू

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तुमच्या हातून घडलेल्या कृतीतून पाप निर्माण झालें असे तुम्हांला वाटत असेल तर त्यासाठी शास्त्राने प्रायश्चित सांगितले आहे. आपण ज्ञानस्वरुप संहारशक्ती भगवान शंकराच्या लिंगाची प्रतिष्ठा करा, त्याने आपलें पाप नष्ट होईल » ऋर्षींच्या शब्दाला व धर्मशास्त्राज्ञेला मान देऊन त्यांनी शंकराचीं प्राणप्रतिष्ठा करण्याचे कबूल केलें व मुहुर्त जेष्ठ शुद्ध दशमी बुधवार निश्चित केंला. कैलासास जाऊन शिवलिंग आणण्याची कामगिरी हनुमंतावर सोपविली.

हनुमंत कैलासात गेला पण त्याला शंकर कोठेच भेटेना, खूप फिरला, खूप तपास केंला, शंकर येथं नाही मग शिवलिंग देणार कोण? हे हनुमंताचे विचार चक्र सुरु झाले. शंकर भेटत नाही, हे पाहून शिवलिंगाच्या प्राप्तीसाठी त्याने कैलासातच तपश्चर्या सुरू केली. त्याची तपश्चर्या, कर्मयोग, स्वामीनिष्ठा पाहून शंकर प्रसन्न झाले व झटकन आत्मलिंग हनुमंताच्या हाती देऊन कैलासाहून शीघ्र रवाना केले. इकडे गंधमादन पर्वतावर सर्वजण मुहूर्ताच्या अंतिम क्षणापर्यंत हनुमंताची वाट पाहिली पण वेळेवर हनमंत आला नाही, मुहूर्त टाळू नये, म्हणून जगन्माता सीतामाईनी वाळूचे शिवलिंग तयार केलें, पुण्याहवाचन झाले, प्राण प्रतिष्ठा होऊन, शिवलिंगाची स्थापना झालीं. रामचंद्र आरती व मंत्रपुष्पांजली वाहणास उठले इतक्यात हनुमंत शिवलिंगासह येऊन दाखल झाला. राम हनुमंताला म्हणाले, « तू आणलेलें शिवलिंग साक्षात शंकराने स्वहस्ताने तुला दिले आहे त्यात प्रचंड कर्तृत्वशक्ती भरलेली आहे अजूनही पूजा कार्यक्रम चालूच आहे, तू माझा पंचप्राण आहेस, तेव्हा तू तुझ्याच हाताने हे शिवलिंग स्थापन कर. » रामाची आज्ञा म्हणून ते शिवलिंग उठविण्याचा हनुमंताने महान प्रयत्न केंला त्याचा घाम गळू लागला, हात रक्त बंबाळ झालें, पण शिवलिंग तसूभरही हालले नाही. तो लज्जीत झाला ऋषी म्हणाले 'तू लज्जित होऊ नकोस, तूं तुझ्या पुरूषार्थाने व कर्तृत्वाने हे शिवलिंग साक्षात शंकरा कडून मिळविले आहेस, ते महान आहे व ते मिळविणाराही महान आहे शिवलिंगामध्ये आम्हा सर्व तपस्वीचे तेज

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

चढेल, सीतांमाईनीं पुरवलेली शक्ती त्यामध्ये वास्तव्य करील, त्याला येथून हलवू नकोस. हणुमंताने आणलेल्या शिवलिंगाची स्थापना झाली आज ज्याला आपण रामेश्वर म्हणतो शिवलिंग सीताताईनी तयार केलेले व रामाने स्थापून पूजलेले व हनुमंताने कैलासाहून आणलेल्या शिवलिंगाचें नांव हनुमंतीश्वर आहें. हें शिवलिंग रामचंद्रानें सेतु बंधा जवळस्थापन केले म्हणुन त्याला सेतुबंध रामेश किंवा रामेश्वर म्हणतात.

रामेश्वर देवस्थानमध्ये सात मातृका व अकरा रुद्र या देवतांची छोटी मंदीरे आहेंत. मंदीर हे अगदी समुद्रालगतच असले तरी मंदीरा-तील सर्व बावीस कुंडांचे पाणी गोड आहें व मंदिराबाहेरील सर्व एकोणीस कुंडात खारे पाणी आहे हे विशेष महत्वाचे वाटते. रामेश्वर मंदीरात एक स्थायी स्वरूपाचे प्रदर्शन ठेंवण्यात आले आहें. त्यामध्ये विविध प्रकारच्या व प्रेक्षणीय वस्तु ठेवण्यात आले आहेत. रथ, नंदी-केश्वर, भूतवेताळ, गरुड, राजहंस, हत्ती या वस्तु चांदीचे आहेत. दशमुखी रावण, दोन हत्ती, दोन घोडे, दोन सिंह हें सोन्याचे आहेत. विभीषण, हंस व कैलास हे चांदीचे आहेत. कामधेनू, दोन मखरें व पालखी ही सोन्याची आहेत. देवाचा मूकुट सोन्याचा असुन रत्नजडित आहे. एकंदर वस्तूंची किंमत तेवीस कोटी रुपयाचे असल्याचें तेथे सांगतात. हे प्रदर्शन दर्शनदुर्लभ असून पाहणेंस पंधरा रुपये मूल्य-तिकीट द्यावे लागते. या ठिकाणी अहल्याबाई होळकर यांचें अन्नछत्र आहे.

या रामेश्अर लिंगाबद्धल काही लोकानी जाणून बुजून संभ्रम निर्माण केला आहें की,शंकराने रामनामाचा जप केला व त्याच्या स्मृती प्रीत्यर्थ म्हणून शंकराने रामाच्या नावाने हें लिंग स्थापन केले आहे. असे सांगतात, हें सपशेल असत्य व अविवेकी आहे. वास्तविक असे घडण्याचे काहीही कारणच नाही. सकल ब्रम्हांड उत्पत्ती, स्थित्ती, लय यास कार-णीभूत्त असलेल्या शंकराला त्रेता युगामध्ये जन्म घेतलेल्या रामाच्या नावाने जप करण्याची अशी कोणती गरज भासली होती, याचा खूलासा विचारला असता कोणीच काही सांगत नाही. रामाचा प्रभाव व महत्व

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वाढण्याकरता रामभक्ताचेहें कुभांड बोलणें चालणें लिहीणें आहें. चालू भाषेत बोलायचे झाल्यास राष्ट्रपित्याने फोजदाराच्या नावाचा जप केला असेंच म्हटल्यासारखे आहें असें स्पष्ट लिहावे लागते,असो.

हे रामलिंगा, रामनाथा, रामेशा, रामस्वामी, रामेश्वरा व हनुमंतीश्वरा माझ्या नम्र नमस्काराचा स्वीकार व्हावा.

नागेश्वर

नागेश, नागनाथ, नागेश्वर हे ज्योर्तिलिग महाराष्ट्रातील, मराठवाडा विभागातील, परभणी जिल्हयातील, औंढा ग्रामीं आहे म्हणुन याला औंढा नागनाथ असे म्हणतात. येथे महाशिरात्रीस मोठी यात्रा भरते. याशिवाय चैत्र वद्य एकदशी, श्रावण शूद्ध पंचमी, गुरुवार अमावस्या हा दिवसीही यात्रा भरते. या देवस्थान मध्ये एक छोटेंसे कुंड (भरपूर पाण्याचें) आहै. त्याच जलाने नागेशाची पूजा प्रतिनित्य केली जाते व यात्रेकरुनाही त्या पाण्याचा पिण्यास उपयोग होतो देवस्थानच्या कळशारोहणावर अती सुंदर कला कुसरीने तयार केलेले दगडी बाहुल्या आहेत. परंतु त्यातील बहूतांशी मुर्ती मुसलमानाकडुन भंगलेल्या आहेत, त्यायोगे त्याचे आकर्षणच नष्ट झाले. गर्भ देवस्थानात दर्शनार्थ गेल्यावर सुमारें १५x१६ फुटाचा नुसताच खोलीं वजा बांधलेली आहे व त्याचे एका बाजूस कोपऱ्यात ४x४ फुटाचें एक चौकोन खाली उतरणें करता बांधलेलें आहे. त्या चौकोनातून अधारातुन सात आठ पायऱ्या खाली उतरुन गेल्यावर तेथे नागेशची मूर्ती (शिवलिंग-ज्योर्तिलिंग) आहे आंत गेल्यावर प्रशांत शिवलिंग पाहुन अत्यंत समाधान वाटते तेंथे स्पर्श दर्शन आहे. आनंदाने रुद्राभिषेक वगैरे करता येती.

फार प्राचीन काळी एक दारुका नांवाची अति प्रभावी राक्षसी होती. आळसी लोकॉंना पाहुन तिरस्कारनें चिडून जात असे. तिची स्त्री शक्तो जागृत असे. या दारूकेने महानशक्तीच्या प्राप्तीसाठी पार्वतीची घोर तपश्चर्या केली व पार्वतीला प्रसन्न करुन घेऊन वरदानाने अमाप शक्ती मिळविली. दारुकेचे लग्न दारुक नांवाच्या राक्षसाबरोबर

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

झाले होते, स्त्री कोणाचें नुकसान करीत नाही व कधी संस्कृती बिघडवीत नाही असे मानले जाते. स्त्री जेंव्हा भयकर बनते तेव्हां संस्कृतीचें अंध:पतन होऊन नैतीक मुल्याचा संहार होतो तत्कालीन समाज दारुकेला देवी समजून पूजित होते तिच्या आचार विचार उच्चाराने लोक चकित होत व इशाऱ्याप्रमाणें वागत. तिचा दारुक तिच्या ताटाखालचे मांजरच बनला होता. तिने लोकामध्ये कृतीं धृती व मेघा या तीनही शक्ती जागृत केल्या. दारुकेच्या वास्तव्याच्या सभोवतालच्या वनाला तिच्याच नांवावरुन दारुकावन हे नांव पडले. म्हणूनच नागेश दारूकवनें असे म्हटले जाते, राक्षस अथवा राक्षसी म्हणजे प्रचंड शरीराकृतीचा अक्राळ विक्राळ रुपाचा असे नसून माझे पायावर उभें राहून मी कोणाचेही (देवाचेही) आधाराशिवाय स्वत:चें रक्षण करायला समर्थ आहे असे मानणाऱ्या वृत्तीचें राक्षस होत. दारूका याच वृत्तीची होती. तिनें देवावरील लोकांची श्रद्धा उडवून दिली. सारे लोक तिच्या प्रभावी व्यक्तिमत्वासमोर निष्प्रभ ठरले होते. तिच्यापुढे ब्राह्मण,भटजी शास्त्री पंडीत यांचेही कांही चालेना व समाजातल्या ब्राह्मणांचे वर्चस्वच खलास झाले. सारे ब्राह्मण और्य मुनीच्या आश्रमांत जावून सारी संस्कृतीच नष्ट होऊ लागली आहे, तेव्हा ती वाचवण्याकरता उपाय विचारले. मुनी म्हणाले, 'समाजाला वळण चांगले लावण्यासाठी तुम्ही क्रियाशील व्हा, तरच यश मिळेल, तुम्ही भिक्षा मागत फुकटचे सदैव खात फिरल्यास भगवंत कसा भेटेल.' दारुकानें समाजात आत्मप्रत्यय परत उभा केंला आहे. आळशी माणसाला हालवून, जागवून कृतीशील बनवलें आहे. ब्राह्मण म्हणाले, 'मुनीश्वर, या दारूका व दारुकनें समाजाचा सत्यानाश करुन संस्कृती सारी नष्ट केंली आहें.लोकांना तन्मार्गी आणणें अशक्य झालें आहें.ब्राह्मणाच्या वाणीतील अशक्यता व असमर्थता पाहून मुनी हसले व म्हणालें, 'देवावरील तुमची श्रद्धा ठीक आहें, पण त्याबरोबर ज्ञानाची उपासना असणें आवश्यक आहे. राक्षस वर्ग सर्वस्व देऊन ज्ञान मिळवीत आहें, ते विद्येचें उपासक असून ज्ञानपिपासू आहेत. केंवळ ज्ञान कृतीशून्य असते, तर त्याबरोबर जबरदस्त निष्ठा असून ती अभंग व अतूट टिकविली पाहिजे. अशा निष्ठेसाठी तीव्र संकल्प पाहिजे,

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

'झालें तर करीन' हा संकल्प नव्हे. तर 'वाटेल तें करुन मिळवीनच' याला संकल्प म्हणतात: और्यं मुनीचा उपदेश ब्राह्मणांना व सर्वांना पटला व स्वकर्तृत्वाची जाणीव होऊन ज्ञान मिळवून त्या सर्वांनी एक स्वतंत्र संघटना तयार केंली. त्यांनी दारुक व दारुकेंला मोठ्या धैर्यानें 'कोणा ब्राह्मणाला अगर इतर कोणाला त्रास दिला तर याद राखा' असे पत्र दिलें राक्षसांना हे पत्र अवमानास्पद वाटून, त्यांनी लढाईची तयारी केंली. परंतू दारूकेला लढाईचा विचार पटला नाही, ब्राह्मण व सर्व लोक खरोखच संघटीत झाले असलें तर ते लढाईनें दबणार नाहीत. आपली सत्ता आतून पोखरली जात आहे हें बुद्धीमान व पार्वतीकडून वरदान मिळवलेल्या दारूकेंनें जाणले व सर्व वैभवासह फारच दूर जाऊंन समुद्रतीरी नवीन वसाहत करून राहू लागलें,

और्यंमुनी सात्विकांना व भाविकांना सतत मार्गदर्शन केले. सद्-विचार, नैतिक मुल्यें, संस्कृती, यांची जोपसना घडू लागली. मुनींनी भाविकांना अभय देण्यासाठी परमेश्वराची तपश्चर्या केली. व प्रसन्न करुन घेतले. ते स्थळ म्हणजे नागेश दारुकवने.

दारुकेनें सागरतीरी वस्ती करुन स्व:ताच्या प्रभावानें व कर्तृत्वानें राक्षसी विचारधारा मानणारा समाज पुन्हा निर्माण केला. एक वेळ सुप्रिय नांवाचा महान शिवभक्त वैश्य देशोदेशांतरी मोठा व्यापार करुन अमाप संपत्ती मिळवून परत येत होता, दारुकेची सत्ता असलेल्या किनाऱ्यावर सुप्रियाच्या संपतीच्या होडय येताच दारुकेने अडविले व मुकाटयाने सारी संपती आमच्या ताब्यात दे असा हुकुम सोडला.

सुप्रिय म्हणाला हे प्रभो तुझ्या कार्यासाठी ही आणलेली संपती या राक्षसानी लुटावी हे तुला तरी पटते का? ही लक्ष्मी तुझी आहे, हे राक्षसीं गिधाड झडप घालीत आहे. तेव्हा त्याचे रक्षणार्थ मला शक्ती दे, सुप्रियाने वैभव देण्यास नकार दिला. त्यामुळे युद्धास तोंड लागले. सुप्रिय व त्यांच्या मांणसाना कैदेत टाकले.सुप्रिय हतवल हाऊन मृत्यूजय प्रभूचे स्मरण करु लागला. तुझ्या कृपेमुळे हे सारे धन वैभव मिळालें ते तुभ्याच कार्यास मी वेचणार आहे. ते सारेच लुटले गेलें आहे. आणि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

माझ्या प्रारब्धी तूरंग लिहिला गेला. असें असतांना तू शांत कसा आहेस? एकाएकी त्याच्या डोळ्यात नागेश भगवंताची उपासना करणारी एक प्रचंड शक्ती निर्माण झालेली आहे.असे येताच त्याने स्वतःच्या एका खास माणसाला सारा वृतांत देऊन संघटना प्रमुखाकडे पाठवले.संघटना शक्तीने सुप्रीयास त्याच्या सर्व वैभवासह परत पाठवावें नसल्यास आमच्याशी गांठ आहे हें लक्षात ठेव,असे दारुकेस कळवले,या पत्रास न भिता दारुकेने मोठ्या हुशारीने व मुत्सद्देगिरीने 'तुमच्या व आमच्यामध्ये कोणत्याही ब्राह्मणाला त्रास देणेंचा नाही अशी अट आहे. तेव्हा ती अट आम्ही तंतोतंत पाळली आहे, सुप्रिया हा ब्राह्मण नसुन वैश्य आहे तरी या प्रकरणात तुमचा कांही संबंध येत नाही. त्या पत्राला ब्राह्मणांनी प्रत्युत्तर दिले. ब्राह्मण हा कधीच एकटा असत नाही तो चातुर्वर्ण्यं व्यवस्थेसहच असतो जे लोक वर्णाश्रमधर्मं पाळतात, वैदिक विचाराना मानतात ते सर्व लोक आमचेच आहेत म्हणून सुप्रिया व त्याचे सारे लोक याना मुक्त तुम्हीं केलेंच पाहिजे या पत्राकडे दारुकेने लक्ष दिलें नाही व मान तुकविली नाही. त्यामुळे युद्धच ओढवले या संकटसमयी सर्ववर्णीय एकत्र आलें. नागेश भगवंताची प्रार्थना केली. भगवंत प्रसन्न झाले, भगवंताची शक्तीं पाठींशी धरुन सर्वांनी प्राणपणाने लढून असूरांचा पराभव केला, परंतु सगुण साकार महादेवजी मात्र उव्दिग्न झाले. कारण पार्वतीने राक्षसांना वैभवाचें व शक्तीचे वरदान दिले होते. त्यांना महादेवानें हरविलें होते पार्वती महादेवजीची पत्नी तिच्या शब्दाचें मह व संपले होते म्हणून ती दुःखी झाली होती पार्वती म्हणाली, राक्षसांचा पराभव झाला याचें मला दुःख नाही, पण राक्षसांचा आत्मप्रत्यय गुण समाजात राहिला पाहिजे, किंकर्तव्यामुळें बनलेल्या हीनतेंला महान गुण समजणाऱ्या लोकांतून स्वात्मप्रत्यय खलास होतो तेव्हा माणूस मुर्ख व आळसी बनतो, जीवन परावलबी बनतें यासाठी तामसी सृष्टीची आवश्यकता आहे. आणि तीं राहिली पाहिजे. लोकात कृतीशिलता येणे आवश्यक आहे, म्हणून तुम्ही या राक्षसी गुणांना संपवू नका, शंकर म्हणाले, तुझे म्हणणे बरोबर आहे माझी कृतीशीलता व श्रद्धा तसेच तुझा स्वात्माभीमान, स्वावलंबीपणा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आत्मप्रत्यय हे सर्व सांभाळलेच पाहिजेत, या दोनही प्रकारच्या गुणांना नीट सांभाळू, मग राक्षस उन्मत बनणार नाही व ईश्वरभक्त आळशी बनणार नाहीत? राक्षसांना शंकराने मारले नाही कारण त्याच्या पाठीमागे समाजशास्त्राचा सखोल अभ्यास होता. पुढे वीरसेन नांवाचा राजा जन्मास आला. त्याने नागेश भगवंताची उपासना केली व दोन्ही विचारांचा संगम साधून सत्युगी समाज निर्माण केला. राक्षसी विचार धारा दैवी विचारात परिवर्तित केली. नागेश दारुकवने ज्योतिर्लिगाच्या पवित्र दृष्टीने व आर्शीवादाने हे महान कार्य झाले असा वज्राक्षरी इतिहास आहे.

जगन्माता पार्वती जगत्पिता शंकर व नागेश दारुकावने अशा ज्योतिर्लिंगास अगणित प्रणाम.

विश्वनाथ

हे ज्योतिर्लिग उत्तर प्रदेशात वारणसी उर्फ काशि येथे गंगा नदी किनारी आहे. याचा इतिहास फार मोठा आहे म्हणून काशीखंड म्हटले जाते, याचा अर्थ खंडप्राय त्याचा इतिहास आहे. हा ग्रंथ १०० अध्यायांचा असुन १५५८ पानांचा आहे. खऱ्या भावनेनें संपूर्ण वाचणारा त्यात तल्लीनच होतो. काशी म्हणजे ज्ञानाचे तीर्थ, विद्येचे धाम, भारतीय संस्कृतीची फडफडती पताकाच होय. संस्कृतमध्ये काशी या शब्दाचा अर्थ 'प्रकाशणारी' असा आहे. ज्ञानाने व भक्तीभावाने प्रकाशणारी नगरी म्हणजे काशी.

प्राचीन काळीं रिपुंजय या प्रभावी राजानें घोर तप करुन शंकरला प्रसन्न करुन घेतले व तुझ्या चरणाजवळ मला जागा दे. अशी मागणी केली. शंकर म्हणाले ते होईल, पण प्रथम लोक पशुतुल्य जीवन जगत आहेत, त्यानी संस्कृती सोडली आहे. तेव्हा त्यांना मानवी जीवन जगणारे बनवून दाखव. रिपूंजय म्हणाला 'प्रभो ते करण्यास मला शक्ती व सामर्थ्य दे' ते शंकरानें मान्य केले. पण प्रभो माझी दुसरी प्रार्थना अशी आहे की 'जोपर्यंत मी येथे आहे तोपर्यंत दुसरे कोणाचीं येथे सत्ता चालू नये.' शंकर म्हणालें 'तुला माझा आर्शीवाद

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आहे. पण रिपुंजय म्हणून तू न रहतां दिनोदास या नांवाने कार्यालय लाग' रिपुंजय दिनोदास झाला. त्याने सूंदर शिक्षण व्यवस्था निर्माण केली. विद्या व सांस्कृतिक जीवन गांवोगांव पोहोचवले, लोकांत चैतन्य निर्माण होऊन प्रेम व आत्मीयता वाढून भावजीवन पुष्ठ झाले, लोकात ख्याती पसरली. काशीला अमृत नव्हते पण अमृतजीवी लोक होते. हें पाहुन इंद्राला राग आला व मत्सर निर्माण झाला. इंद्राने अग्नीला चौकशीसाठी काशीस पाठवले. तेथींल लोकांचे तेजस्वी जीवन पाहुन चिरंतन तेजस्वी जीवन जगणाऱ्या अग्नीनें काशीतच वास केला. अग्नी परत आला नाही म्हणून इंद्राने वायूदेवाला पाठवले. वायू स्वत:स्वच्छ राहतो व दुसऱ्याला स्वच्छ राखतो दिनोदासाच्या वाराणसी नगरी लोकांची स्वच्छता निर्मळ जीवने पाहुन खुष होऊन अग्नीच्या बाजूला तेथेंच राहू लागला. अग्नी आला नाही, वायु आला नाही, म्हणून तपासासाठी सूर्याला पाठवले. सूर्याने घराघरात प्रवेश करुन लोकांची अविचल वृत्ती पाहिली. लोक दु:खाला घाबरत नव्हते व सुखानें हरखून जात नव्हते हे पाहून सूर्य खूश झाला. त्यानेही तेंथेच वास्तव्य केलें. अग्नी,वायू, सूर्य परत आले नाहीं म्हणून इंद्रानें चंद्राला पाठवले. तेथील लोकांचे मुक्त जीवन, सुख दु:खाबरोबर लढण्याची हिम्मत, प्रेमभाव, औदार्ययुक्त प्रसन्न जीवन पाहून आनंदभरीत अंत:करणाने चंद्रही तेथेच राहिला. तपासासाठी पाठवलेले एका मागून एक असे सर्वच देव परत न येता तेथेच राहिले, याचे कारण शोधार्थ इंद्र स्वत. काशीला गेला तेथील लोकामधील सत्यता, भाविकता, चैतन्य प्रेमभाव, औदार्य पाहून सर्वाप्रमाणें तोहि आकर्षित होऊन तेथेंच राहिला.

काशीचे विलोभनीय सौंदर्य, पावित्र्य, ज्ञानगंगा, भक्तीभाव पाहून दिवोदास संतुष्ट न राहता सारे देव काशीत आले पण भगवंत देवाधिदेव महादेव मात्र काशीमध्ये अजून का यत नाही याबद्दल त्याचें मन अत्यंत चिंताग्रस्त होते. एके दिवशी गंगाकिनारी फिरता फिरता दिवोदासाला अंत:प्रेरणा झाली की, मीच येथे सत्ताशीश म्हणून राहीन असा वर मी मागितला व तो त्यानी दिला. जर मीच सत्ताधीश होवून

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

येथे राहायचे असेल तर महादेव शंकर येथे कसा बरे येईल. कारण तो स्वत:च सर्वसत्ताधीश आहें. दिवोदासाच्या मनांत प्रकाश पडला, सर्व देव आले पण शंकर नाही त्यामुळे हें सर्वंच निरर्थक आहें. सर्व सुंदर झाले पण शंकरजी नसलेमुळे कळसाशिवाय मंदीर बनलें आहे. शंकराला विश्वनाथला येथे आणायचें असेल तर मला माझे अस्तित्व खलास करावे लागेल. त्यानें लोकांची नम्रतापूर्वक अनुज्ञा मिळविली. मी गेल्या शिवाय भगवंत या नगरीत येणार नाही म्हणून मी आपणा सर्वांची रजा घेत आहे. त्याने युवराजाला गादीवर बसवले. लोकांचा निरोप घेतला लोकांचे नेत्र अश्रुनी भरुन आले. प्रसंग विलोभनीय होता दिवोदासाच्या वियोगाचें दु:ख व विश्वेश्वराच्या–विश्वनाथाच्या आगमनाचें सुख अशा सुखदु:खाश्रुनी सर्वांचे नेंत्र पाणावले गेले. भगवंताने दिवोदासाचा भाव ओळखला-तो जाताच शंकराने काशीत प्रवेश केंला तेच काशी विश्वनाथ ज्योतिर्लिंग होय.

चतुर्मुख ब्रह्म व चतुर्भुज विष्णू हें दोघेही आपापल्या श्रेष्ठत्वाबद्दल वाद करु लागलें तेंव्हा चारी वेदांनी 'तुम्हा दोघांचे तत्व श्रेष्ठ आहे असे तुम्ही भांडता तर परमतत्व कोणाचे आहे' असा प्रश्न केला. तेंव्हा दोघेही कुतूहलतेने एकमेकाडे पाहू लागले हें जाणून ऋग्वेदने 'रुद्र' यजुर्वेदानें 'शिव' सामवेदानें 'त्र्यंबक' अथर्ववेदानें 'विश्वनाथ' असे हे सर्व शिवाचेंच रुप आहेत म्हणून 'शिव' हाच सर्वश्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन करताच दोघेही आपले अज्ञान जाणून निरुत्तर झाले व पुढे ब्रह्म विष्णू इंद्र कुबेर आदिमा व इतर अनेंक देवदेवता यानी भोला शंकर विश्वनाथाच्या प्रसन्नतेप्रित्यर्थ वाराणसीत वास करुन महान जप-तप करुन आपले इप्सीत प्राप्त करुन घेतले, राम, लक्ष्मण, सीता वनवासात जाताना व येतांना आपलें संकट निवारणार्थ बावा विश्वनाथाचे दर्शन घेतलें, अगस्ती, अत्री, गौतम, दधिची, कपील, विश्वामित्र, वाल्मीकी व्यास महर्षीनीही आत्मोव्दारार्थ व लोककल्याणार्थ विश्वनाथाला अहर्निश पूजले, कारण भोळ्या शंकराकडे त्याला आपण जाणून एक पाऊल पुढे ठेवल्यास तो आपणाला जाणून दोन पाऊलें पुढे ठेवून आपणाकडे धावतो हें त्या सर्वांनी जाणले होते,

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

स्वर्गात वर्षेषु, अंतरिक्षात वातेषु, पृथ्वीत अन्नेषु व दशदिशात राहणारे सर्व रुद्रगणापेक्षा वाराणसी विश्वनाथ दर्शन श्रेष्ठ आहें. प्रलय-काळी पृथ्वी पाण्यात, पाणी अग्नीत, अग्नी वांयूत, वायू आकाशात, आकाश अहंकार तत्वात विलीन होतात तेव्हा ब्रह्म, विष्णू, इंद्र, कुबेर सर्व देवदेवता कोणीच राहत नाही. अशा स्थितीत देवाधिदेव, महादेव, विश्वनाथ या सर्व जीवात्म्याना आपल्या रुपात आत्मसात करुन घेतो. विश्वनाथाला असंख्य नावें व रुपे आहेत परंतु विश्वेश्वर, देवाधिदेव, महादेव, भगवान, आणि मुक्तेंश्वर, भोला शंकर अशी नांवे पुराणात बहूतांशी आढळतात.

विश्वनाथ मंदीर–देवस्थानचा आवार ५०×५० = २५०० स्केंअर फूटाचा असून गाभारा अर्थात गर्भ मंदीर-मुख्य देव प्रतिष्ठास्थान ६×६ = ३६ स्केअर फूट आहें. यातील शिवलिंग-विश्वनाथ ज्योतिर्लिंग जमीनीपेक्षा थोड्याशा खोलातच असून एका बाजूस आहें. भाविकांना वाकून अगर खाली बसूनच विश्वनाथ लिंगास भावपूर्ण स्पर्श करून दर्शन घ्यावे लागते. मंदीराचा नगारखाना–नौबतखाना–चौघडखाना अजिजितमूल्क नांवाच्या मुसलमान बांधवाने, धनिकाने बांधला असून अनर्घच्या मुस्लीम नबाबानी नित्य नगारा निनादासाठी मोठी देणगीही दिलेंली आहे. त्याप्रमाणें प्रतिनित्य आजही त्याप्रमाणें वाद्य घडतें.

विश्वनाथ पूजा– विश्वनाथ मंदीर हे पहाटे ठीक साडे चार वाजता उघडले जाते. शिवलिंगास प्रथम गंगाजल स्नान, चमेली तेंल लावून 'हर हर महादेव शंभो, काशी विश्वनाथ गंगे' या गगनभेदी गज-रात पुनरपि गंगाजलानें धुतले जातें. नंतर पंचामृताचा अभिषेक करुन, पुन्हा गंगाजलानें धुवून, त्यावर गुलाब पाण्याचा वर्षाव करुन, अत्तर तेंल लावून, मस्तकावर चंदनाचा भरपूर गंध लावून, विभूती लावून, मस्त-कावर ओल्या अक्षता बिल्वदळे फुले चढवून, नैवेंद्य दाखविला जाऊन, मंगलारती करुन, मूर्तीला भोग लावून, पंचारती केली जातें. डमरु,ढोल, नगारा, झांज, शंख या पाच निनादातून दर्शनार्थी खच्चून भरलेंले भाविक भारावून जातात व विश्वनाथाशी डोळे मिटून तन्मय होतात व

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जीवन साफल्याचा आनंदानुभव लुटतात. अशा प्रकारे प्रतिनित्य तीन वेळा पूजा केली जाते. पूजेंचे प्रसंगी नित्यनेमधारी बहुसंख्येंने उपस्थित असतात.

दर्शन प्रथा– प्रत्येंक भाषिक स्त्री पुरुष गंगास्नान करुन, तांब्यात गंगाजल घेऊन, विश्वनाथ मंदीरास जाणाऱ्या अत्यंत अरुंद मार्गावरुन वाटेतील दुकानातून बेलफुले घेऊन वाटेत साक्षी विनायक, भवानीमाता धुंडीराज, गणपती, मुक्तीमंडपातील आदित्य (सुर्य) दंडपाणी, महेश्वर, पार्वतीचे व मंडपातील अनेक देवतांचे दर्शन घेऊन, तीन पुष्पहार घेऊन विश्वनाथ मंदीरात जायचे. पहिला हार पार्वतीला. दुसरा हार विश्वनाथाला घालायचा, तिसरा हार हा पुजारी हातात घेऊन भक्ताला आर्शीवाद म्हणून घालतात. आणलेंलें गंगाजल विश्वनाथाला अर्पण करून (ओतुन) भक्तीभावपूर्ण स्पर्शदर्शन करायचें. भक्ताला हार घालून आशीर्वाद देण्याची पद्धत फक्त काशीतच आहे. इतरत्र कोठेंही नाही. विश्वनाथ मंदीरात वाक्यामध्ये विश्वनाथाष्टक, लिंगाष्टक, शिवाष्टक, माणसपुजास्त्रोत्र, रुद्र व वेदातील कांही महत्वाचे भाग, विविध बोध सुमनें, संगमरवरी मोठमोठ्या दगडामध्ये खोदुन लिहूलेली आहेत. वाचून प्रसन्नतेतून तल्लीनता निर्माण होतें.

अतूट नाते – गंगास्नान व विश्वनाथ दर्शन हे भाविक भक्तांना सोडतच नाही. हे दोघामधील द्वंदयुद्ध आजपावेतो संपलें नाही. संपत नाही व संपणारही नाही, या दोघांचे नाते अतूट आहे व ते चिरंतन अतूटच राहणार आहे. विश्वनाथ मंदीरातील घंटा पहाटे साडे चार वाजलेपासून रात्री दहा वाजेपर्यंत अविरथ घणाणतच असतात. कोणा विनोदमुर्तीनें त्या गावांतील लोक निरुद्योगी आहेत की काय, असे म्हटल्यास ते चुकीचे की बरोबर हें त्या विनोदमुर्तीनें व वाचणारानीच ठरवावे.

महाशिवरात्र – विश्वनाथ मंदीराच्या पूर्वेकडील व उत्तरेकडील निम्या भागालगत मशीद आहे व उरलेल्या निम्या उत्तर भागालगत मंदीराचाच मोठा बांधीव आवार आहे. त्यामध्ये छोटी मोठी बरीच

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मंदीरे आहेंत. त्यामध्ये मोठा नंदी व त्यास अगदी लगत डावे बाजूस विहीर आहें. नंदीसमोर असलेले महादेव शिवलिंग म्लेच्छांच्या अमलात त्या विहीरीत त्यानी टाकल्याची आख्यायिका आहे, नंदी असला की त्याचसमोर शिवलिंग असलेच पाहिजें. यावरुन त्यांनी ते सत्तामदांधातून टाकलें असलें पाहिजें याची खात्री वाटते महाशिवरात्रीस दर्शनार्थ भाविकांची प्रचंड गर्दी होते. त्यादिवशी याच प्रशस्त अशा मार्गानें प्रवेंश दिला जातो. महाशिवरात्रीस मंदीर रात्रभर दर्शनाप्रित्यर्थ खुलें असते. नेहमीचे अत्यंत अरुंद रस्त्यात असलेंलें महाद्वार त्यादिवशी प्रवेंशास बंद ठेंवून भाविकांना तिकडून बाहेंर सोडण्यात येंतें.

गंगा–हे गंगे,अंबे,रुद्रे,भद्रे हरे,चामुंडे,चत्पुरे,शिवे,शांभवे तुला माझा नमस्कार हे माते, तू जगद्धात्री, परब्रह्मस्वरुपिणी, शुद्ध विद्यारूचा, त्रिशक्तीमयी, करुणात्मिका, आनंदामृतरुपा, धर्मस्वरुपिणी आहेस,तुला माझा नमस्कार असो. सकलब्रह्मांडनायक. धारक, संचालक. तारक, संहारक सदाशिवाने वेदाक्षरात पिळून काढून त्यातील द्रवरसाने तुला निर्माण केले आहे. तूला ती रुद्रावतारी, भद्रावतारी, शांतावतारी अशी त्रिविधावतारी रुपात हिमवत् केदारनाथापासून गंगासागरपर्यंत विविध वेळा मी प्रत्यक्ष पाहिले आहे-दर्शन घेतले आहें-पण या माझ्या पाचव्या फेरीची-दर्शनाची-फलश्रुती म्हणजेच हा ग्रंथ, आज तुझ्याच कृपेने निर्माण होत आहे. उठता, बसता. खाता,पिता, जागता,निजता,बोलता, जपता, जाता, येता, ध्यान करता जो गंगामातेचे स्मरण करील तो या भावबंधनातून निश्चित मुक्त होईल. दुर्बूद्धीतून, कुतर्कातून, संशयातून दुसऱ्या नद्याप्रमाणें गंगेला समजणारा नराधम ठरुन त्याने जीवन-भरात काही दान, धर्म, तप, नियम, व्रत केलें असल्यास निरर्थक ठरुन तो यमलोकापासून कधीही सुटणार नाही. जल, दुध, कुश, तूप, मध, गोदार्थ, लाल चदन, लाल कणेरी फुल असे अष्टांग गंगाजलात मिसळून महादेवास–सदाशिवास, विश्वनाथास रुद्राभिषेक केल्यास तो प्रसन्न होतो. गंगातटावर अनाथास, अपंगास दान करावे. सोमवारी चंद्रग्रहण व रविवारी सुर्यग्रहण असते तेव्हा गंगास्नान करावे, अशक्यानी गंगास्मरण करावे.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तुझे वर्णन व महती रेखाटण्यास मोठमोठे ऋषी असमर्थ ठरले आहेत तेव्हा माझी मुळातच मंदमत्ती लेखणी, बोबडी बोलगंगा ती कशी पूर्ण करणार! असा हिमालय माझे नेत्रासमोर उभा असल्यामुळे हिमालयोत्पन्न तूच माझ्याकरवी तें पूर्ण करून घेणार आहेस.

सूर्यवंशी राजा सगर याच्या साठ हजार पुत्रानी पूर्व समुद्र-किनारी कपील मुनींच्या आश्रमात अश्वमेध यज्ञासाठी आपल्या पित्यानी सोडलेला घोडा पाहिला आणि त्या कपील मुनीला ढोंगी तपस्वी म्हणून अपमानास्पद शब्दात गोंधळ करु लागले, तेव्हा कपील मुनी क्रोधीत होऊन नेत्र उघडताच साठ हजार पुत्र भस्म होऊन गेले. नारदाने त्या पुत्रांच्या उद्धारार्थ स्वर्गातील गंगा भूलोकी आणणेसाठी घोर तपश्चर्या करण्याचा बोध केला.तप करतानाच राजा सगर स्वर्ग-वासी झाला.पुढें राजा भगीरथाने तारुण्यातच राज्यपद प्रधान मंत्र्यावर सोपवून भोलानाथ शंकराची घोर तपश्चर्या केली. शिव शंभूनी प्रसन्न होऊन गंगेला भूलोकी हिमालयातील मानसरोवर गंगोत्री येथे उतर-वून साठ हजार सगर पुत्रांचा उद्धार केला. तीर्थयात्रेच्या दृष्टीने हिमालयाचें– १) मानसरोवर व कैलास २) अमरनाथ ३) गंगोत्री, यमुनेत्री व केदारनाथ ४) मुक्तीनाथ, पशुपतीनाथ, दामोधरकुंड असे चार भाग केले आहेत. मानसरोवर अंडाकृती असून त्याचा बाहेरील घेरा तेंवीस मैल आहे यामध्ये हंस पक्षी आहेत. याची उंची समुद्र-सपाटीपासून १९००० फूट आहेत. येथेच कस्तुरीमृग मिळतात.

मानसरोवराजवळ गंगोत्री या उगमस्थानानजीक गंगेची रुंदी ४३ फूट व घेर ३ फूट आहे. पुढे पंधरा सोळा मैल वाहत जाऊन ७० ते ८० फूट उंचीवरुन मोठ्या शिवलिंगाकारावर आदळते व तेथून तीन चार फर्लांगभर अतिशय अरुंद उंच कड्यामधून जोरदार उसळत्या वेगाने येते येथे गंगेचें (एक छोटा व एक मोठा असे) भाग होऊन छोटा प्रवाह गंधकयुक्त डोंगर कपारींत घुसून त्या उष्णतेमुळे एकदम जवळ जवळ न्हाणेसारखे गरम पाणी तयार होऊन वाहत येऊन एका कुंडात पडते. त्यांस "गौरीकुंड" म्हणतात. पार्वतीने येथे स्नान केलें आहे अशी आख्यायिका आहे. त्या गौरी कुंडास लगतच ४० ते ५० फूटावरुन गंगेचा मोठा प्रवाह वाहतो तो बर्फासारखा अत्यंत थंडगार पाण्याचा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आहे. हे पाहून भाविकांना आश्चर्यकारक वाटतें. येथे गौरीकुंडातील गरम पाणी वाहत येऊन मोठ्या थंड पाण्याच्या प्रवाहामध्ये मिळते. गंगाकिनाराजवळ उत्तर काशी-गुप्तकाशी हे महत्वपूर्ण व अत्यंत आकर्षक स्थान आहें. त्याला प्रेमाने 'नैनिताल अथवा सिमला' म्हटले जाते. येथे नियतींचा नखशिकांत वटलेला नयनमनोहर नगारा नयनात नर्तन करतो गुप्त काशीचे बाजूस आठ मैलावर अगस्तीमुनीं व गौरीकुंडचे पुढे पाच मैलावर भैंरवमंदीर व भैरवघाट आहे. हा सर्वच भाग निसर्ग-सौंदर्याने थाटलेला आहे. गंगा नदी हिमालयातून वाहतांना तिच्या दोन्ही काठचा भू-भाग नानातऱ्हेने नटलेला नयनरम्य आहे. शेकडो फूटावरुन खाली कोसळणारे स्फटिकासम शेकडो जलप्रपात, डोंगर कपारी उंचकडे, तुटलेले कडे, ठिकठिकाणी वसलेल्या पहाडी लोकांच्या अनेक आकर्षक चटचा (छोटे लोकवस्ती) व देवप्रयाग, रुद्रप्रयाग, उत्तरकाशी, उषामठ, श्रीनगर (काश्मीरचें श्रीनगर नव्हे) अगस्तीमुनी गरुडचट्टी. हनूमानचट्टी, टेहरी, गढवाल, पौडी, चमोली ही छोटी गांवे नियतीचें नटलेलें नमुनेच आहेत. येथून पुढे गंगेचा प्रवाह विस्तारत गेला आहे. हिमालयातून गंगा वाहताना तिला अलकनंदा, चिलगंगा महानंदा, मालीन, देवगौड, जांगला, धराली, हरसिल, निलगंगा या नद्या मिळाल्या आहेत.

पुढे हिमालयातून सूटून सखल भू-भागात प्रवेश करुन ऋषीकेश, हरिद्वार, कनखल, बीजनौर, दारानगर, गढमुक्तेश्वर, मुरादाबाद, कानपूर, दौलतपुर, हाजीपुरा, खजूरगांव, गोपालपूर, सेनपूर, ढलमऊ, कालाकिकरा यावरून प्रचड विस्ताराने अलाहाबादला-प्रयागला पोहोचते.हरद्वार यास त्या भागांत फार मोठे महत्व दिले जाते. दक्षिणे तूनही जाणारे भाविक व यात्रेकरु तेथे भक्तीने स्नान करतातच. येथे पाण्याला ओघ मात्र फार जबरदस्त आहे येथे अत्यंत स्वच्छ पाण्याचा प्रवाह आहे येंथे ही मेळा भरत असतो तेव्हा लाखो यात्रेकरु जातात. अलाहाबादला व काशीला ब्रॉड गेज व मीटर गेज अशा दोन्ही मार्गाने जाता येता येते. यमुना नदी गंडकी गोमती, कोसी, चंबला, वटवा या नद्यांच्या संगमासह येऊन गंगेला मिळते.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

त्रिवेणीसंगम– अलाहाबाद उर्फ प्रयागला गंगा यमूना सरस्व
या तीन महापवित्र नद्याचा संगम होतो म्हणून त्यास 'त्रिवेणी संग
म्हटले जाते. शास्त्रात, पुराणांत या संगमाला फार मोठे महत्व आ
त्रिवेणीसंगमांत्त स्नान केल्यास अनेक जन्मांचें पाप नाहीसें होतें अ
सर्वाची दृढ भावना आहे. येथे बाराही महिने स्नानासाठी यात्रेकर
गर्दी असते. तीन नद्याचें एकाच ठिकाणी संगम होण्यास हे भारतात
एकमेव स्थान असून जगातीलही एकमेव स्थान म्हटल्यास मुळी
चुकीचे होणार नाही. येथील नदीवर बांधलेल्या टोलजंग पूलाव
गाडी जातांना प्रवाशांना भिती वाटते. गांव मोठे असून बाजारपेठ
मोठी आहे. येंथे भारताचे लाडके व लोकप्रीय नेते व पहिले पंतप्रध
पं. जवाहरलाल नेंहरु याचे निवासस्थान 'आनद भवन' हें महर्षी भा
द्वाज यांचे ठीक आश्रमापुढेच आहे. आनंद भवनमध्ये नेहरुचे कुटुं
यांचें व जवाहरलाल यांचें बालपणापासूनचे सर्व फोटो तेथे आकर्ष
रित्या लावलेलें आहेत. पाहणेस ५० पैसे तिकीट आहे. भवन व भो
तालचा बगींचा, स्वच्छता टापटीप सर्वांगी रेखीव आहे.

गंगा नदीवर हाजीपूर या गावाजवळ ४७० कोटी रुपये खर्च
५,५७५ किलो मिटर म्हणजे ३,५३४ मैल लांबीचा रेल्वे पूल नुकता
बांधलेला आहे. हा जगातील सर्वांत जास्त लांब रेल्वे पूल होय.

प्रयाग क्षेत्राचे वर्णन करतांना ब्रह्मदेवाने स्वत: सांगितले की
त्रिवेणी सगम स्नानाचें त्रिकाल स्मरण करण्याने मनुष्य खऱ्या अर्था
निष्पाप बनतो तेथे सकाम बुद्धीने स्नान करतो तो इच्छानुसार पवित्र
होतो. निष्काम बूद्धीने स्नान करतो तो मोक्षपद प्राप्त करतो. राजा
आणि सेवक यामध्ये जेवढे अंतर आहे तेवढेच अंतर इतर तीर्थ
स्नानात व त्रिवेणी संगम स्नान यामध्ये आहे. प्रयागला नदी किनारी
भुईकोट किल्ला असून तेथे उताणा झोपलेला मारुती आहे. येंथे बारा
वर्षाला कुंभमेळा व सहा वर्षाला अर्ध कुंभमेळा भरतो ;तेव्हा मोठमोठे
साधू, संत, महंत, धर्मगुरु, मठाधिपती, पीठाधिपती प्रचंड भक्तगणासह
हत्ती, घोडे, उंट आदि वाहनासह सवाद्य मिरवणूकीने भजनें, स्तवने

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

स्तोत्रे, म्हणत गगनभेदी जयजयकारात येंतात व मोठ्या भक्तीने, प्रेमानें त्रिवेणीसंगम स्नान करतात. ही लाखो लोकांची यात्रा मोठी भाविक व प्रेमपूर्ण पाहिल्यावर नेत्रांचें पारणें फिटल्याचे सिद्ध होते.

तीर्थराज– प्रयागहून प्रचंड विस्ताराने निघून तीर्थराज वाराणसी काशीस पोहोचते. येथे गंगा धनुष्याकृती वाहते म्हणून तिचा वेग कमी भासतो. गंगेच्या काठी पुढीलप्रमाणें घाट आहेंत. पश्चिम बाजूस असलेलें घाट– १) असी २) रेवा ३) बाजीराव (बाजीराव पेशवेनी बांधला) ४) तुळशीदास ५) भद्रेश्वर ६) गणेंश ७) आनंदमयी ८) जानकी (हा घाट १८८२ मध्ये बांधला) ९) वच्छराज (लाला वच्छराज यांनी बांधला) १०) जैन ११) पंचकोट १२) खिडकी १३) शिवाला १४) नेंपाळी १५) दंडी १६) हनुमान (सोळाव्या शतकात बांधला) १७) म्हैसूर १८) हरिचंद्र-स्मशान-डोंब्या (याची कथा सर्वश्रुत आहेच) १९) लाली (लालशहा नांवाच्या मुसलमान भाविकांनी बांधला) २०) केंदार २१) रामेश्वर २२) मानसरोवर (हा घाट अंबरचे नरेश मानसिंग यानी १७७० मध्ये बांधला) २३) नारद २४) विनायक २५) भुवनेंश्वर २६) अन्नपूर्णा (२१ तें २६ हे घाट पेशव्यांनी बांधला) २७) राजा २८) चौसष्टी (बंगालचे राजें दिग्पती यानी बांधला. या घाटावर चतुषष्टी देवीचे मंदीर आहे. तेथे प्रतिवर्षी होळीचे दिवशी यात्रा भरते) २९) सर्वेश्वर ३०) दशाश्वमेध. हा घाट अत्यंत महत्वाचा मानला जातो हा सर्वांत मोठा घाट आहें. १) पांडे २) राणा महल ३) मुनशी ४ अहिल्याबाई ५) शीतला हें पाच घाट दशाश्वमेघात विलीन झालें आहेत. सतराव्या शतकात उदयपूरच्या नरेशनें राणामहल घाट, नागपूरच्या राजानें मुनशी घाट, इंदोरचें महाराजानी अहिल्याबाई घाट, नारायण दिक्षीत, जडे यानी शीतला घाट बांधला. ब्रह्मदेवाने येथें दहा अश्वमेध यज्ञ केले म्हणून यास 'दशाश्वमेध घाट' असे नांव पडलेलें आहे बहुतांशी यात्रिक येथेंच स्नान करतात. या ठिकाणी तीन शिवलिंगे आहेत. १) त्रिशूलधारी शंकर २) ब्रह्मेश्वर ३) शिवलिंगेश्वर हे तीनही मंदीर गंगेला पूर आला की पाण्यात झाकलें जातात) ३१) प्रयाग ३२) राजेंद्रप्रसाद ३३) मान मंदीर ३४, मीर (नवाब मीर रुस्तुमनें

...MANDIR
LIBRARY.
Jangamwadi Math, VARANASI,
Acc. No. 3481
CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

बांधला, येथे विशालाक्षी मंदीर आहे) ३५) त्रिपुराभैरवी ३६) ललिता ३७) सिद्धेश्वर ३८) राजेश्वरी ३९) जलसाई ४०) मणिकर्णिका (हा घाट सर्वश्रुत व प्रसिद्ध आहे. श्री महादेवाची–विश्वनाथाची–विष्णूनी महान तपश्चर्या केली. महादेव प्रसन्न झाले व विष्णूला वर देताना श्री महादेवाचे कानांतील मणी गळून खाली पडणार इतक्यात विष्णूनें ते वरचेंवर झेलले व तो आशीर्वाद मिळाला असे समजून प्रेमाने तो मणी आपल्या नेत्रास दर्शनाप्रित्यर्थ लावला तेंव्हा विष्णूचे नेंत्रातून आनंदाश्रू टपकले म्हणून त्या गंगाकिनारी घाटाला 'मणीकर्णिका' घाट म्हणतात. येथे भाविकांची सदैव स्नानास गर्दीच असते) ४१) वीरेश्वर-सिंधीया ४२) संकटमोचन ४३) गंगासागर (नागपूरचे राजघराणें भोसले यांनी बांधला) ४४) गणेश ४५) चोर ४६) राम ४७) बालाजी ४८) मंगलागौरी ४९) पंचगंगा (किरण, सारजा, धूमपापा, जीर्णनंदा, गंगा याचा संगम होतो म्हणून पंचगंगा घाट म्हणतात. हा घाट महाराष्ट्रीय श्रीपतराव या धनिकाने बांधला) ५०) वेणूमाधव ५१) ब्रह्म ५२) दुर्गा (५०, ५१, ५२ हे तीनही घाट महाराष्ट्रीय नारायण दिक्षीत, जडे, कायगावकर यानी १७४० मध्ये बांधले) ५३) राजमदीर (नरेश सुदर्शनसिंह हांडा बूंदीकर यांनी १५५६ मध्ये बांधला) ५४. लाला (बिर्ला कुटुंबियांनी बांधला) ५५) बालाबाई ५६) गाय ५७) त्रिलोचन (५५. ५६, ५७ हें तीनही घाट महाराष्ट्रीय नारायण दिक्षीत-जडे यांनीच बांधलें) ५८) महू ५९) तेंलियानाला ६०) फूटेश्वर ६१) प्रल्हाद ६२) राज. अशा प्रकारे पश्चिम बाजूचें घाट असून पूर्व किनाऱ्यावर रामनगर किल्ल्याजवळ 'सामनें घाट' म्हणून एकमेव घाट आहे.

हिंदु धर्मामध्ये जी सात तीर्थ क्षेत्रे–सप्तपूरी मानली गेली ती काशी, अयोध्या, मथुरा. हरद्वार, कांची, उज्जैन. द्वारका, अशी आहेत. या सर्वामध्ये काशी हे प्रमुख असून त्याला अनन्य साधारण महत्व आहे. गंगेने उत्तर भारताला सुजलां सुफलां करुन सर्वत्र नंदनवन केलेले आहे. गंगा ही सर्वाची उपयूक्त नदी असून भारतातील

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सर्वांत मोठी नदी आहें. म्हणून तीला लोक ' नद ' असेही म्हणतात. गंगास्नान व विश्वनाथ दर्शन हें भक्तांना–भाविकांना नित्यनेम सोडत नाही. भक्तांचे या दोघांशी चाललेलें द्वंदयुद्ध अनादिकालापासून आज पावेतो संपले नाही. संपत नाही. व संपणारही नाही. याचे नाते अतुट आहे.

येथून–वाराणसीहून–गंगा ही अतीं विस्तारीत रूपाने वाहत जाऊन कलकत्याजवळ, १ हुगळी २ मेघना, ३ पद्मजा, अशा निरनिराळचा आठ प्रवाह मार्गातून व निरनिराळचा नामाभिधानातून हिंदी महासागराच्या बंगाल उपसागराला मिळते. गंगा व सागर यांचें संगम–मिलन प्रसंगी दोन तीन मैलपर्यंत एकमेकांच्या अक्राळ [विक्राळ प्रचंड लाटा एकमेकांना जोरदार उसळचातून धडक देत असतात. हे द्वंद युद्ध दृश्य पाहुन मला व आमच्या बोटीतील सर्वांना भयंकर भयानक वाटले. आम्ही यातून सुटून सुखरुप स्वगृही परतू की नाही ही भ्याड भावना भेंडसावू लागली. पुढे प्रवास न करतां येथूनच परत फिरावे असेहीं कांही लोक विशेष करुन महिला बोलू लागलें. एवढचात आमची बोट थांबली व पुढे पाण्याची खोली कमी असले कारणानें होडचांतून सुमारे चार फर्लांगभर जाऊन कपील मुनीच्या (छोटचाशा) मंदीरा नजीक उतरलों. येथून जलसागर संपून जनसागर सुरु झाला व त्यांत आम्ही सारे मिसळलो.

" सब तीर्थ बार बार, पर गंगासागर एकही बार " ही जी म्हण आहे ती सपशेल खोटी आहे. येथे फक्त वर्षातुन १४ जानेवारीस च यात्रा भरते व इतर वेळेस ' कपील मुनी ' मंदीर पुर्ण झाकले जाते असे सांगतात. तेही साफ खोटे आहे. आम्ही कलकत्याहून ब्रम्हपूत्रा तथा घोटना या बोटीने गंगेच्या हुगळी प्रवाहातून तेथे गेलो. आमच्या हूगळी नदीच्या समोर बाजूने तेथे कपीलमूनी मंदीरास लोक बैलगाडीने, घोडागाडीनें, मोटारी व ट्रक्सनी हजारो आलें होते. त्यायोगे आमच्यातील व इतर लोकांना अत्यंत आश्चर्य वाटले. समुद्राची

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

भरती व ओहोटी ही सदैव चालूच असते. (मुंबईला चौपाटीवर पौर्णिमा व अमावस्या दिवशी समुद्राची स्थिती कशी असते हे सर्वांनी पाहिलेच आहे.) तेथे बाराही महिने केंव्हांही जाता येता येते. तेथे यात्रेच्या वेळी नागवे साधू शेकडो येतात व राहुटचा मारुन, भोळ्या भक्तांना कांही भक्तीमार्ग आमीष सांगून अक्षरशः लुटतात. जाणाऱ्या यात्रेकरुनी सावध रहावे.

गंगासागरसारख्या पवित्र क्षेत्रात अशा तऱ्हेची लुबाडणूक होते हे शासनातर्फे बंद होणे जरुरीचे आहे. खिसेकापूंचा भरपूर भरणा असतो. आमच्यातील कांही यात्रेकरू नंगे साधूकडून लुबाडले गेलें व कांहीचे खिसेही कापले गेलें. अशा यात्रेकरुंची काय त्रेधा अवस्था होते हे गंगेनीच पारखून पहावे. या यात्रेला का आलो असे प्रत्येकाला वाटतेच. पोलीस बंदोबस्त भरपूर असूनही उपयोग होत नाही हे खेदजनक आहे. गंगामातेनीच हे बंद केल्यास बरे होईल. गंगेप्रमाणे वाहणाऱ्या या माझ्या शब्दगंगेला विराम देत आहें.

" हे गंगे, हे सागरा, " तुम्हां दोघांनाही माझा साष्टांग नमस्कार हे विश्वेशा, विश्वेश्वर, विश्वनाथा तुला माझे अगणित नमस्कार.

त्र्यंबकेश्वर

हे ज्योतिर्लिंग महाराष्ट्रातील नाशिक या जिल्हा गावापासून तीस किलो मीटरवर त्र्यंबक या गांवी गोदावरी नदीजवळ आहे. ऋषींची तपोभूमी, सिद्धांची योगभूमी, मानवांची मोक्षभूमी, रामचंद्राची (त्रेतायुगातील) कर्मभूमी, राष्ट्रवीरांची जन्मभूमी, नव्या युगाची उद्योग भूमी म्हणून नाशिक प्रसिद्ध आहे. रावणाची बहीण शूर्पणखेचें नाक येथे कापले म्हणून नाशिक नांव पडले. येथें सदैव यात्रा असते दर बारा वर्षानी कुंभमेळा भरतो. बद्रिकासंगमतीर्थ, ब्रम्हतीर्थ, अग्नीविसर्जन तीर्थ, अरुणासंगम तीर्थ, रामगंगातीर्थ, रामकुंडतीर्थ अशी तीर्थस्थाने आहेत. रामकुंड येथे यात्रेकरुंची स्नानासाठीं सदैव गर्दी असते. कपालेश्वर व सुंदरनारायण ही मंदिरे आहेत. सुंदरनारायण हे मंदिर पाडून मुस्लीमानी तेंथे कबरस्तान केलें होते सन १७७६ मध्ये चंद्रचूड

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नांवाच्या धनिकाने हें मंदीर पुन्हा बांधलें. कपालेश्वर व सुंदरनारायण ही दोन्ही मंदीरे गोदातीरावर समोरासमोर आहेत. नारीशंकर तथा रामेश्वर हे १७४७ मध्ये बांधलें. रामाचा वनांत वास असतांना या रामेश्वर मंदीर स्थानाजवळ त्याचा वास होता. व तेथे पाच वडांची झाडे होती म्हणून त्यास पंचवटी म्हणतात. याशिवाय सीतागुंफा, बालाजी, गोराराम, तीळमंडेश्वर, एकमुखी दत्त, निलकंठेश्वर, मोदकेश्वर ही मंदीरे प्रसिद्ध आहेत. देव आणि दानव यांचेमध्ये अमृत-कुंभासाठी पहिले युद्ध येथे झाले. अनेक मुनीनी तपश्चर्या केली. त्या जागेस तपोवन म्हणतात. येथे कपीला नदी गोदावरीला मिळते. येथील डोंगरात लेणी आहेंत. ते इ. स. पूर्वी १५० वर्षाचे आहेत. पंचवटीत यात्रेकरूसाठी अनेक धर्मशाळा आहेंत. येथे विमानतळ उपलब्ध आहेत. येथे नोटा व नाणी व मिग विमान तयार करण्याचा प्रचंड कारखाना आहे. या कारखान्यात सुमारे वीस हजार कर्मचारी आहेत.

ब्रह्मगीरी पर्वतावर गोदावरीचा उगम झाला. ती गोदावरी पश्चिम वाहिनी होती. तिला गौतम ऋषीनी इंद्राशी लढा देऊन, जिंकून तिला पूर्व वाहिनी केली. गोदावरीचा उगमापासून राजमहेंद्रीजवळ समुद्रात विलीन होईपर्यंत सुमारे १५०० कि. मि. लांब प्रवाह आहे. भारतातील प्रमुख बारा ज्योतिर्लिंगापैकी ते एक तीर्थस्थान आहे. नाशिक ते त्र्यंबकेश्वर जाण्यास सदैव सर्व वाहनांची उत्तम सोय आहे. ब्रह्मगीरी हे गोदावरीचे उगमस्थान समुद्रसपाटीपासून ४४०० फूट उंच आहे. व वर चढून जाण्यास सुमारें ७२५ पायऱ्या आहेंत. गोदावरीला कुशावर्त पूर्वी म्हटलें जात होते. त्र्यंबक गावात प्रवेश करताच अत्यंत कुशल नक्षीकामाचे अतिभव्य चित्ताकर्षक मंदीर दिसते. देवळाचे पटांगणांत एक कुंड आहे. त्यास अमृतकुंड म्हणतात. याच कुंडाचे पाणी नित्य देवपूजेस वापरतात. भव्य व प्रशांत सभामंडप व नक्षीकाम हे मंदीराचें वैशिष्ठ्य आहे. तेथील शिवलिंगाच्या शाळुंकेत एक कळशीभर पाणी राहील अशी वस्तुस्थिती आहे.

ज्ञानेश्वराचे जेष्ट बंधु निवृतीनाथ यांनी जेष्ट वद्य १२ शके १२१९ मध्ये येथे समाधी घेतली. नीलांबीका देवीचें स्वयंभू आकार

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मंदीर आहें. नीलकंनेश्वर, केंदारेश्वर, त्रिसंध्देश्वर, विल्वकेश्वर, कांचनेश्वर, ज्वरेश्वर परशुराम व त्रिसंध्या, गायत्री, भुवनेश्वरी, गंगा ही देवालयें आहेत. येथे यात्रेकरू एक १८ मैलाचीं व दुसरीं ४० मैलाची अशी दोन पादयात्रा त्यांचे इच्छनुरूप भाविकतेने करतात. महाराष्ट्र सरकारचें पर्यटन विभागाचे हॉलीडें कॅंप्स बांधलेंले आहेंत व धर्मशाळाही अनेक बांधलेले आहेत.

बारा वर्षाचा सिंहस्थ मेळा नाशिक की त्र्यंबकेश्वर यापैकी कोठें करावा हा वाद आता मिटला आहे. यात्रेकरू दोनही ठिकाणी स्नान करतात. त्र्यंबकेश्वर हा स्वंतत्र तालुका व्हावा म्हणून तेथील ग्रामस्थांचे भागीरथ प्रयत्न चालू आहेत.

अतंर्क्य कालवधीपूर्वी ब्रम्हदेवाला फार गर्व आला. त्रैलोक्याधिपती देवाधिदेव महादेवाचा महिमा फक्त आपल्यालाच कळतो व इतर कोणालाही त्याचे मुळीच ज्ञान नाही असे त्याला वाटू लागलें व त्याप्रमाणें तो उघडमाथ्याने सर्व देवासमोरही बोलू लागला हा ब्रम्हदेवाचा गर्व विष्णूला मुळीच आवडलानाहीआपणअनन्यभावें महादेवाची तपश्चर्या करतो तरीं आपणास त्याची महिमा समजली नाही, समजत नाही व समजणारही नाही तेव्हा या ब्रम्हदेवाला तो कसा कळेल? असे त्यास वाटू लागले. व दोघाचे सदैव खटकाखटकी उडू लागले शेवटी असे दोघामध्ये ठरले की, ब्रम्हदेवांनें महादेवाच्या मस्तकाचा शोध लावावा व विष्णूने महादेवाच्या पदकमलाचा शोध लावावा, दोघानाही असंख्य अनंत अगणित अघटित प्रयत्न केले, पण दोघांनाही त्याचा ठावठिकाणा व पत्ता लागेना. दोघेंही हत्तबल होऊन निराश झाले. शेवटी ब्रह्मदेवाने 'आपल्याला महादेवाचे मस्तक सापडले असे खोटेच सांगण्यांसाठी एक केवड्याचे फूल व एक गाय निर्माण केली शिवलिंगावर केवड्याचे फूल पाहिलें व गायीच्या दूधाचा अभिषेक सुरू केला तेव्हा सर्व देवासह विष्णू महादेवाकडे गेले व खरे खोटे काय आहे तें पाहावे अशी प्रार्थना केली. शंकर पाहतात तो केवड्याचे फूल होकारही नाही व नकारही नाही अशा दुटप्पी भावार्थातून उड्या मारुं लागले. व गाईने तोंडाकडून होकार दर्शविला व शेंपटीनें नकार

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दर्शविला. तेव्हा शंकरानी ब्रह्मदेवाचें खोटेपण ओळखलें व ब्रह्मदेवाला शाप दिला. "या जगात तुझी कोणींही पूजा करणार नाही" केवड्याचे फुल माझ्या पुजेस चालणार नाही. गायीला तोंडाकडून कोणींही पूजा करणार नाही. तेव्हापासून आतापर्यंत या रुढी मानल्या जात आहेत. ब्रह्मदेवाने महान तपश्चर्या करुन शंकरास प्रसन्न करुन घेतले. क्षमेची याचना केली. व शंकराच्या त्रिनेंत्राची स्थापना केलीं तेव्हांपासून या लिंगाला त्र्यंबक अथवा त्र्यंबकेश्वर हे नांव मिळालें.

बहु कालावधीनंतर गौतम ऋषीच्या प्रार्थनेनुसार मानवाला जेथे महादेवाने चिरतन असे मार्गदर्शन केले ते स्थळ म्हणजे गौतमीतट अर्थात नासिक त्र्यंबकेश्वर होय. लोक तेजरहित जीवन व ज्ञानविरहीत जीवन जगत असल्यामुळे भक्तीमध्ये वैचारिक भावना नष्ट होऊन लाचारी निर्माण झाली तेव्हा गौतमऋषींनी लोकांना शक्ती उपासनेंचा मार्ग दाखवला त्यांनी यमाकडून ज्ञान मिळविले व ते ज्ञान लोकापर्यंत पोहोचवलें, ही अशक्य गोष्ट शक्य करुन दाखवलीं गौतमऋषींनी चार गोष्टीच्या आधारें खरी मनुष्यशक्ती जागृत केली. ज्ञानाचा, विचारांचा तेजरहितेचा भक्तीचा दुष्काळ काढून टाकला व समाजात खऱ्याअर्थाने शांती स्थापना केली. "शांति., शांति, शांति" असे म्हणण्याचा लोकांना अधिकार प्राप्त करुन दिला. एके दिवशीं आश्रमाजवळ शेतात गाय घुसली व उभे पीक खाऊ लागली. तिला हाकवणेंसाठी गौतम ऋषींनी दांडा फेकला व गाय पळून गेली. हें कृत्य दोघा ब्राम्हणांनी पाहिले व मोका चांगला सापडला म्हणून गौतमऋषीचे महत्व कमी करणेंसाठी एक लुळी मरायला टेकलेली गाय गौतमाच्या आश्रमाजवळ नेंऊन टाकली. थोड्याच वेळांत ती गाय गतप्राण झाली. ब्राह्मणानी सारा गावभर गौतमानी गोहत्त्या केलीं असा ढोल वाजवला. सर्वांनी गौतम ऋषीवर बहिष्कार टाकला. गौतमाचे महत्व कमी झाले. अशामध्ये काही ब्राह्मण स्त्रिया गौतम ऋषीच्या पत्नीला–अहिल्येला सहज भेटायला आल्या. कार्यरत अहिल्येच्या हातून त्यांचें यथोचित आगत स्वागत झाले नाही म्हणून त्या चिडून आपापल्या पतीराजांना भडका-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वले. आगीत तेंल ओतले गेले व सर्वंच ब्राह्मण बिथरले, भडकलें. साऱ्या लोकांवर अहंकाराचे व द्वेषाचे भूत स्वार झाले. सर्वांनी सर्वांगी गौतमाचे अवमान करुन हैराण करुन सोडले. असा प्रकार बहू दिवस चाललेमुळे त्यांना आश्रम सोडून स्थलांतर करावे लागले. दुसरें स्थानी गेले व तेथे यज्ञ करु लागले.

तेंव्हा तेथील ब्राह्मणानीही 'तू गोहत्त्या केली आहें, तुला यज्ञ करण्याचा अधिकार नाहीं' म्हणून सतावू लागले. प्रभू कार्यापासून वंचित झाले. हिमालयाने डोंगराकडे जावे त्याप्रमाणे ज्ञान, भक्ती, कर्म व तेज यांचा गूच्छ असे गौतम ऋषी व्यतीत मनाने तथाकथित सर्वश्री पं. बाळंभट, भिकंभट, रामभट, हरीभट यांचेकडे गेले व 'मी पापी असेन तर मला प्रायश्चित सांगा,मी ते घेईन व पापाचें क्षालन करीन' म्हणाले सर्वांनी हा सिंह आहे पण आपल्या सपाट्यात आला आहे त्याला जीवनभर पुरे होऊ नये म्हणून दुष्ट बुद्धीनें तीन वेळा पृथ्वी-प्रदक्षिणा करुन तीन वेळा गंगास्नान कर असे सांगितले. हे ऐकताच क्षणभर त्यांचा जीव घाबराघुबरा झाला. हताश होऊन ब्रम्हगिरीवर जाऊन हे प्रभो, मी पापच केलें नाही.तुझेच कार्य मी आयुष्यभर करीत असताना ही माझी स्थिती? माझ्या देहाचा काय उपयोग, मला येथून उचल. आताच्या आता घेऊन जा म्हणून टाहो फोडला. त्यावेळी तीन डोक्यांचा त्र्यंबकेश्वर तेथे आला. गौतमाच्या नेत्रातील अश्रू त्यांनी पुसलें गौतम म्हणाला, 'हे प्रभो, आज तू सगुण साकार होऊन यथे आलास याला कारण तेच लोक आहेत.त्याचेमुळेच आज तुझे दर्शन झाले तेव्हा आम्हा सर्वांना पावन कर व येथेच रहा. गौतमाच्या या भावपूर्ण आग्रहाने भगवंत पाझरला व गंगेसह तेथेच राहिला.तोच हा त्र्यंबकेश्वर भगवान. (गौतमाच्या मनातील खरी थोरवी कुटील कारस्थानी कार-बायाकेलेल्याब्राम्हणांना कळून ते लज्जित झालें व त्यांनी गौतमऋषीचे पाय धरले.) त्र्यंबकेंश्वर रुपाने भगवंत तेथेच राहिले.गंगारुपी गोदावरी वाहू लागली. स्वर्गातून देवांनी पुष्पवृष्टी केली.

त्र्यंबकेश्वर येथे शिवलिंगाची पिंड नसून, एका लहानशा खळ-ग्यात लहान लहान तीन लिंगे आहेत. हा खळगा सदैव पाण्याने भर-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

लेलाच असतो. ब्रम्हगीरीवर उगम पावणारी गोदावरी या ठिकाणाहून प्रवाहीत होत पुढें जाते व तीन लिंगें म्हणजे ब्रम्हा विष्णू महेश या त्रयमूर्तीची प्रतीके मानली जातात. मंदीर सन १६७७ ते १७०७ पर्यंत तीस,वर्षे बाळाजी बाजीराव पेशवे यांनी बांधले आहे.

देवळांचा सभामंडप भव्य आहे. गाभाऱ्यात समोरच श्री पार्वतीचीं मूर्ती आहे. त्र्यंबकेश्वर मंदीरासमोर संगमरवरी दगडाच्या नंदीचे स्वतंत्र देऊळ आहे. येथे शंकरास त्रिनेत्र असलेमुळे त्र्यंबकेश्वर म्हणतात. येथे महाशिवरात्रीचे दिवशी पंचमुखी रत्नजडित सोन्याच्या मुर्तींची गावांतून मिरवणूक काढली जाते. गणेशचतुर्थीं कार्तीकपौंणिमा विजयादशमी या दिवशीही उत्सव साजरे केले जातात. त्र्यंबकेश्वराची त्रिकाळ पूजा केली जाते. प्रत्येक पूजेच्या वेळी निरनिराळे पूजारी असतात.

ब्रम्हगिरीस पांच शिखरे आहेत. त्यास सद्योजात वामदेव अघोर तत्पुरुष ईशान अशी परमेश्वराच्या पांच मुखाची नांवे आहेत. सद्योजात मुखापासून ब्रम्हाला सृष्टीं उत्पात्तीचे ज्ञान झाले, वामदेवापासून वैतरणा नदीचा उगम झाला, अघोरापासून अहल्या नदीचा उगम झाला, तनूपुरुषापासून रामगंगेचा उगम झाला, इशानापासून बाणगंगा नदींचा उगम झाला आहे. याशिवाय पूर्वमूख उत्पति कार्य करते, दक्षिणमुख स्थिती कार्य करते, पश्चिम मुख लय कार्यं करते,उत्तर मुख अनुग्रह कार्य करते, उर्ध्वमुख ज्ञान कार्य करते. अठरा पुराणापैकी दहा पुराणामध्ये शिवाचेंच वर्णन संपूर्ण भरलेले आहे.

देवालय मजबूत काळ्या दगडाचें बांधले असून नक्षीकाम फारच अप्रतिम आहे. देवळाचें भोवती सुमारें अकरा फूट उंचीचा कोट चारी बाजूस पक्का बांधलेला आहे. तो आवार २७५ फूट लांब व २१८ फूट रूंद असून भितीची जाडी ४। फूट आहे. चारी दिशेंस चार दरवाजे असून दक्षिण व पश्चिम दरवाजे लहान असून पूर्व उतर दरवाजे मोठे आहेत.उत्तरेस महादरवाजाआहें तेथेनित्य चौघडा नगारखाना चालतो. हे त्र्यंबका, त्र्यंबकेश्वरा, माझ्या सद्भावी प्रणामाचा स्वीकार करा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

केदारनाथ

हे ज्योतिर्लिंग हिमालयाचे केंदार नांवाच्या पर्वत कडयाच्या माथ्यावर वसलेलें आहे. उत्तर प्रदेशांतील, चमोली जिल्ह्यातील, उषा-मठ या तालुका गांवापासून सुमारे तीस किलोमीटर वरअसूनत्याची उंची समुद्रसपाटीपासून सुमारे सत्तर हजार फूट आहे. यास केदारपुरी,केदारे-श्वर, केदारनाथ असे म्हणतात. मंदीरालगत मंदाकिनी नदी आहे व सृष्टीसौंदर्य अवर्णनीय आहे. हें मंदिर कार्तिक शुद्ध प्रतिपदेपासून वैशाख शुद्ध तृतीयेपर्यंत सहा महिने बर्फानी संपूर्ण आच्छादलेले असते म्हणून बंदच असते व दर्शनार्थं जाणारे यात्रेकरूस शासनातर्फे बंदीच केली जाते. वीरशैव धर्म संस्थापकापैकी वैराग्य सिंहसनाधिपती जगद्गुरु तथा राघल उषामठ येथेच सहा महिने राहतात व सहा महिने भक्तांकडे संचारास जातात.

प्राचीन काळी भारताची परम पवित्र पुण्यभूमी म्हणजे धवल-गिरीराज हिमालयाच्या केंदार पर्वताच्या पायथ्याशी नर व नारायण नांवाचे दोन महान शिवभक्त शंकराला प्रसन्न करून घेणेसाठी घोर तपश्चर्या करीत बसले होते. या दोघांना आपण ऋषी म्हणू शकू व या जोडीच्या तपश्चर्येमुळे या ज्योतिर्लिंगाला महत्व प्राप्त झालें. ते ब्रह्म-देवाचें मानसपुत्र होते. स्वतःच्या कर्मांचे फळ भोगायला ते आले नव्हते तर श्री शंकराचे खास प्रेषित म्हणून ते या जगात आले होते. शंकरजी याना मनापासून आवडलेले जीव म्हणजे त्यांचे मानसपुत्र नर व नारायण होय. धर्म हा भगवंताचा मानसपुत्र. धर्म व मूर्ती यांची संताने म्हणजेच नर व नारायण. मानवी जीवनाचे दोघे आदर्श होते. त्यांच्या 'अहम्' चे 'त्वम्' व 'मम' चे 'तव' मध्ये रूपांतर झाले होते जीवन विकास साधता साधता शेवटची पायरी चढल्यावर एक म्हणतो, 'मी नर आहें, मला द्वैतातील मजा सापडेल' दुसरा म्हणतो, 'मला नारायण व्हायचें आहे.' दोहोंची योग्यता एकच, कोणी जास्त कोणी कमी नाही. या दोघांनी महान तपश्चर्येतून जीवन कृतार्थ करुन घेतलें. नंतरही शांत न बसता, सतत भगवान कार्य करीत राहिलें. वैदिक तत्वज्ञानाचे उद्गान केलें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आधिभौतिक, आधिदैविक, आध्यात्मिक या तीन शांतीसाठी त्यानी स्वतःचें जीवन झिजवले. शांती मिळावी म्हणून भोग जीवनाचे महत्व समजावले, त्याबरोबर भाव जीवन,भद्र जीवन, पूर्ण जीवन याची भावना लोकजीवनात आणली.अशा प्रकारे कार्य करता करता दोघे थकून जात, कंटाळून जात. त्यावेळी हे ज्योतिर्लिंग त्याना प्रेरणा देत असे व प्रत्यक्ष बोलत असे. त्यायोगें ते गांवोगांवी फिरत पुरुषसूक्त गात.वैदिक जीवन-दृष्टी समजावीत. हे पाहून भगवंत हरखून जात असे व खळखळ वाहणाऱ्या अलकनंदा नदीतून तो ओसांडत असे.

अशा तऱ्हेने प्रभूकार्य करीत असतांना माझे सिंहासन जाते की काय अशी भीती इंद्राला वाटू लागली. या दोघांचें कार्यभंग करणेंकरता अप्सराचें टोळके पाठवले. अप्सरांनी हे दोघे लोकांचें मनातून उतरावें व या कार्यांपासून विचलित व्हावे म्हणून खूप प्रयत्न केलें व लोकांमध्ये त्यांच्या वागणुकीबद्दल संभ्रम निर्माण व्हावा अशा जवळीकीतून वागू लागल्या. नारायण यायोंगे भयंकर चिडला, 'हें नखरेल बाहुल्या-अप्सरा तुम्ही आमचें काहीच बिघडवू शकणार नाही' व पुढे त्वेषानें अभद्र बोलू लागला. इतक्यात नरानें मध्ये भाग घेऊन 'यज्ञ करायचा म्हणजे भौतिकवादाचें असुरी बाण येणारच त्याला बोथट बनवणें हें आपलें कामच आहें.' अप्सरा म्हणाल्या, 'इंद्राने पाठवले म्हणून आम्ही तुमच्या-कडे आलो नाही, तर तुमची व्यापक दृष्टीं व पवित्र बुद्धी व अजोड कार्य पाहून मनापासून तुमचेवर प्रेम करणेंकरतां आम्ही आलो आहोत' 'ठिक आहे, मला शेकडो भगिनी आहेत तशा तुम्हीही भगिनी बनून माझेंवर अंतःकरणपूर्वक प्रेम करा, 'भगिनीचे प्रेम चांगले व निर्मळ असते पण त्यात उत्कंठता नसते' 'मग आईचे प्रेम द्या. तुम्ही माता बना' 'आईच्या प्रेमात उत्कंठता असते, पण त्यात आर्तता नसते. आम्ही तुमच्या बनायला आलो आहोत, 'पण तुमचे हे असलें प्रेम मी कदापि स्विकारु शकत नाही' परंतु अप्सरा परत जाण्यास तयार नव्हत्या,त्यानी हट्टच धरिला तेव्हा नारायणानें त्यांना आश्वासन देऊन सांगितले, 'आता माझ्या स्विकृत कार्यांची हानी होईल म्हणून मी स्विकारू शकत नाही. मात्र मी परत जन्म घेईन, तेव्हा तुमची इच्छा अवश्य पूर्ण करीन

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नंतर नर-नारायणाचा दुसरा जन्म अर्जून आणि कृष्ण यांचे रुपांत झाला केदारनाथाचा त्यांना साक्षात्कार झाला बुध्दी वित्त व शक्ती या तिघांची सारखीच उपासना झाली नाही तर मानवजातीला शांती मिळणार नाही म्हणून आपल्याकडे महाकाली, महालक्ष्मी महासरस्वती यांची उपासना चालतें फक्त माळ जपून अथवा कपाळी भस्म लावून उपासन होत नाही आपणाला विचार, उच्चार, आचार या त्रीशुध्दीतून सदैव चालावें लागेल तसा केदारनाथाचा नर व नारायणच्या माध्यावर कायमचा वरदहस्त होता.

एकदा पाडवांचे हातून गोहत्येचे पाप घडले तेंव्हा त्याचें प्रायश्चित घ्यावे व पापमुक्त व्हावे म्हणून त्यानी वाराणसीला, काशीला जाऊन श्री गंगास्नान नित्य करुन विश्वनाथाची अंत:करणपूर्वक भक्ती करण्यास प्रारंभ केला तेंव्हा पांडवाच्या भक्तीचे सत्य पाहावे म्हणून काशीतून शंकर गिरीराज हिमालयावर गेले ही गोष्ट तपोबलानें पांडवानी जाणली तेंव्हा तत्क्षणी ते ही हिमालयात जाऊन वास करून भक्ती व तप करू लागले तें शंकरानी ताडले पुन्हा सत्वाची परीक्षा करू लागले शंकरजी व पांडव यांचें नाते तुटेना तेंव्हा शंकराने रेंड्याचे रुप धारण केले हे भीमाच्या ताबडतोब लक्षात आले हे जाणुन तो रेंडा धावू लागला तेंव्हा भीमही आपली गदा घेऊन त्याच्या मागे लागला शेवटी भीमाने रेड्याला गाठलेच शंकर आपल्याला दर्शन देत नाही म्हणून या महान वलवान भीमाने त्या रेडयाच्या पाठीत आपली गदा सर्व ताकदनिशी मारली त्यावेळी रेडयाचे तोंड जमिनीत घुसले व पाठीमागचा भाग बाहेर राहिला त्यावेळी भीमाने मोठ्या प्रेमाने त्या बाहेंरच्या भागाला तूप चोळले, शंकर प्रसन्न झाले पांडवाना गोहत्येच्या पापा पासून शंकरानें मुक्त केलें पांडवानी मनोभावे शंकराची पूजा केली तेंव्हा शंकर म्हणाले 'येथे रेडयाच्या राहिलेल्या या भागातच मी ज्योतिर्लिग रूपात राहिन हे लिंग केंदारनाथ या नांवानें प्रसिध्द होईल रेडयाच्या तोंडाचा भाग नेपाळात प्रकट झाला आहे मी पशुपतिनाथ या नांवाने राहिन, केदार-नाथ येथे महादेवाची पिंड नाही बारा ज्योतिर्लिगापैंकी अकरा ज्योति-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

लिंगाचे ठिकाणी जशी महादेवाचे पिंड आहे तशी केदारनाथला नाही हें लक्षात घेणेसारखे आहे नेपाळची राजधानी काठमांडू या गांवालगत पशुपतिनाथ मंदीर आहे. तेथे ही महादेवाची पिंड नसून फक्त परमेश्वर मुखाची आकृती आहे, देवालयाचे पिछाडीस बागमती नदी आहे. निसर्ग मोठा रमणीय आहे.

हे केंदारेश्वरा, केदारनाथा, पशुपतीनाथा, माझ्या भावपूर्ण नमस्काराचा स्वीकार व्हावा.

हिमालयात गढवाल जिल्हयामध्ये १) केदारनाथ २) मध्यमहेश्वर ३) तुंगनाथ ४) रुद्रनाथ ५) कल्पेश्वर असे पाच केदार मानलें जातात.

मधुगंगा व मंदाकिनी याच्या संगमामध्ये क्रौचतीर्थ आहे, क्षीरगंगा व मंदाकिनी यांच्या संगमात ब्रह्मतीर्थ आहे. याचे डावे बाजूस इंद्रपर्वत आहे. जवळच हंसतीर्थ आहे. येथील निसंगाचें वर्णन करण्यास शब्दच अपूरे पडतात.

केदारनाथ मंदीरावर वीस द्वारांची चट्टी आहें व सर्वाच्या वर सोन्याचा कळस आहे. केंदारनायाची शृंगारमूर्ती पंचमुखी आहे व सदैव वस्त्र तथा आभूषणांनी सुसज्जींत असते.

केदारनाथपासून चवदा मैल खालीं त्रियुगी नारायण येथे पर्वतराज हिमालयाची कन्या पार्वती इचा विवाह शंकराबरोबर झाला. येथे अग्नी प्रज्वलित आहे व तो आजपावेतो चालूच आहे. त्याच्याजवळ ब्रह्मकुंड, रुद्रकुंड, सरस्वती कुंड असे तीन कुंड आहेत व त्यामध्यें पिवळ्या रंगाचे साप फार आहेत. पण कोणाला चावत नाहीत हे महत्वाचें आहे यथून वाटेंत शाकंबर, सीतापूर, रामपूर, बडड्रासू, फाटा, मैखंठा, सिध्दपीठ कालीपीठ अशा व याशिवाय शेंकडो चटया आहेत.

गंगेचे पाणी कोणत्याही भांडयात कितीही दिवस घालून ठेवा पण त्यामध्ये जीवजंतू तयार होत नाही व पाणी कुजतही नाही. मोठ्यामोठ्या विद्वानांनी, पंडितानीं ज्ञान्यानी याची परिक्षेतूत खात्री करुन घेतली आहे.

केदारनाथ मंदीर घडीव चिरेबंदी बांधलेले आहे. मंदीरातील

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मूर्तीवत्रा असलेला आकार दहा फूट लांब चार फूट रुंद व तीन फूट उंच असा आहे. गाभाऱ्यांत अंधार असून रात्रंदिन तुपाचें नंदादीप जळतात. मूर्तीस आतल्या आत फेरी घासता येते. त्रिकाळ पूजा होते. पूजेनंतर लिंगास तूप लावले जाते व त्यास आपल्या छातीचा स्पर्श करुन दर्शन घेण्याची प्रथा आहे.येथे सोवळ्या ओवळ्याचा विधी निषेध नाही. सभामंडपातील भितीत तीन फूट उंचीवर पांडव द्रौपदी कुंती पार्वती लक्ष्मी इतर देवतांच्या पाषाणमूर्ती बसवले आहेत. देवळाबाहेर प्रदक्षिणा मार्गावर अष्टदिशास आठ कुंड आहेत अमृतकुंड देवकुंड उदककुंड रुद्रकुंड ऋषीकुंड हंसकुंड पाप परिहार कुंड व स्वर्गकुंड अशी त्याची नांवे आहेत. सहामहिने मंदीर बर्फ आच्छादनामुळे बद असते तेंव्हा उखीमठात उषामठातच पूजा होते. पूजारी जंगम लोक येथेच राहतात. केदारनाथ देवस्थानचें प्रधान कार्यालय येथेंच आहें.

केदारनाथ परिसरांचें रक्षण करणारा जवळच असलेला भैरवनाथ याचीही पूजा केदारनाथ बरोबरच प्रतिनित्य होते.

केदारनाथ ज्योतिर्लिंग दर्शनास जाणारें यात्रिक तीन चार मोटार मार्ग जातात. हरद्वार ऋषीकेश येथे रेल्वेमार्ग संपल्यावर बहुतांशी यात्रीक ऋषीकेशापासून लक्ष्मण झूला १७ कि. मी., व्यासी ३७, साकीनधार ५७, देवप्रयाग ७१, किर्तीनगर १०२, श्रीनगर १०७ (काश्मीरचे श्रीनगर नव्हे) कल्यासोड १२२, रुद्रप्रयाग १४२, अगस्तमुनी १५८, गुप्तकाशी १६८, फाटा १९५, सोनप्रयाग २०९, गौरीकुंड २१५, जंगलचट्टी २२१, रामवाडा २२५, गरुडचट्टी २३२, केदारनाथ २३६, कि. मी. याच मार्गाने जातात. वाटेतील ही सारी स्थळे निर्सगानी नखशीकांत नटलेंली आहेत.

हे केदारेश्वरा, केदारनाथा, पशुपतीनाथा, माझा भावपूर्ण नमस्कार स्विकार करावा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

घृष्णेश्वर

घृष्मेश्वर तथा घृष्णेश्वर हे ज्योतिर्लिग महाराष्ट्रात, मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यात वेरुळ या ग्रामी आहे. या ज्योतिर्लिगाजवळच अत्यंत प्रसिद्ध अशी कोरीव, खोदीव, घडीव भारत प्रसिद्ध लेणी आहेंत. हें पाहण्यासाठी नेहमीच लोकांची गर्दी असते. या ज्योतिर्लिग ठिकाणी महाशिवरात्र, श्रावण सोमवार, ग्रहण यावेळी येथे मोठी यात्रा भरते. व मोठ्या प्रमाणात यात्रेकरु भाविक उपस्थित असतात.

बारा ज्योतिर्लिगाच्या स्तोत्रांतील हे शेवटचे बारावे ज्योतिर्लिग होय. ही बाराही ज्योतीर्लिगे आपल्या स्थानाचें महत्व वेगवेगळा भाव जीवनाचा अतिभव्य व दिव्य इतिहास समजावतात. प्राचीनकाळापासून आत्मिक सत्ता व भौतीक सत्ता याचा संघर्ष आजपावेतो चालत आला असून त्यामध्ये भौतीक सत्तेचेच वर्चस्व नेहमीं दिसून येंते. कारण भौतींक सत्तेत आकर्षण आहे व आत्मिक सत्तेत इंद्रियें अंतमुर्ख करावे लागतात. त्या योगे ते जड वाटते. भौतीक सत्तेत सुख लवकर प्राप्त होते म्हणून इंद्रियें नैंसर्गीकरित्या त्याकडे वळतात. आत्मिक सत्तेत सुख बहुकालांतरानें भेटते अगर कदाचित भेटतही नाही म्हणून भौतीक सत्तेकडे सर्वजण खेचले जातात.

कैलास दरबारामध्यें शंकर भगवान व पार्वती भवानी आनंदी अत:करणातून सोंगट्याचा डाव खेळत होती. खेळता खेळता रंग चढला व डावामध्ये पार्वतीकडून शंकर हरलें गेले. साऱ्या जगाला ज्ञान देणारे महान संकटात हिंमत देणारे, भाविक भक्तांना फल प्रदान करणारे, शंकर माझी पत्नी पार्वतीकडून मी पराभूत झालो म्हणून कोपायमान होऊन जीवन स्वारस्थातील गोडी निघून गेली अशा भावनावस्थेस वश होऊन देवगिरी पर्वतावर निघून गेले. शंकर भगवान अतर्धान पावताच पार्वतीभवानी अत्यंत घाबरुन गेली व चितासागरात लोटली गेली. आजची स्त्री पती निघुन जाताच 'गेली तर गेलें' माझे काय नशीब घेऊन गेले, त्यांच्या नशीबातच तसे लिहिलें असेल

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

त्याला मी काय करणार ' असें पलंगावरच बसून म्हणेंल, पण ती पार्वती भवानी जगन्माता होती. तिचें शिवशंकरावर – असंख्यकोटी ब्रम्हांडनायकावर अलौकिक प्रेम होते. ती चितेमधून रडत न बसता मोठ्या हिंमतीनें व प्रेमाने शोधायला निघाली. अनेक ठिकाणी शोध घेत घेत फिरत असता शंकर भेटत नाहीत तेव्हां पार्वतीनें युक्ती शोधून काढली की माझा घाबरलेंला थत्तरबत्तर आवाज भोळ्या भगवंताच्या कानीं पडला तर करूणासागर शंकर भगवान खात्रीने प्रकट होऊन दर्शन देतीलच म्हणून तिने भिल्लिणीचे रुप धारण केले व मेघ मल्हार राग गात गात नृत्य करु लागली.अत्यंत कर्णमधूर आवाज ऐकून व अति सूंदर भिल्लिण नृत्य करींत असलेले पाहुन भोळा भगवान पघळला प्रत्यक्ष कामदेवाला जाळलेल्या या भगवंताला मुळीच राहवत नाही व कामातुर होऊन धावत जाऊन त्याने भिल्लिणीचा हात पकडला व तिच्याकडे प्रेमाची मागणी केली. पार्वतीने आपलेंरुप प्रगट केलें दोघांनीही एकमेकांची खुप मस्करी केली व आनंदसागरात प्रवेश केला. धर्म व नीती यासाठी पतीपत्नीचे रूपक आहें. धर्म पती व नीती पत्नी आहे. ज्याप्रमाणें धर्म व नीती एकमेकावर अवलंबून आहेंत त्याप्रमाणें ज्ञान आणि भोग हे देखील एकमेकावर अवलंबून आहेत. जेव्हा भोग घाबराघुबरा होतो तेव्हा तो ज्ञानाला परत बोलावतो. अशा प्रकारे ज्ञान व भोग हे एकत्र आलेले स्थळ म्हणजे वेरूळ घृष्णेश्वर होय.

प्राचीन काळी देवगिरी पर्वताच्या पायथ्याशी सुधर्मा नांवाचा एक सुखी सधन ब्राम्हण ज्योतिषी राहत होता. ज्योतिषी असलेमुळे सदैंव लोकांची ये जा असायची. त्यामुळे तो लोकप्रीय होता, त्याचे वजन चांगलें होते. व कीर्तीही उत्तम होती. त्याची सुदेहा नावाची आत्यंतिक प्रेमाची सुंदर पत्नी होती सर्व कांही ठाकठीक होते, पण त्याला संतान नव्हते. एके दिवशी सुधर्मा व सुदेहा पती पत्नी प्रेमातून बोलत बसलें असताना सुदेहाने पतीस म्हटले 'साऱ्या जगाचे ज्योतिष सांगता तसे आपलेही पहा ना. तिचे मातृहृदय संतानाची अपेक्षा करीत होते हे सुधर्माने जाणलें व प्रेमळ पत्नीच्या आग्रहाला आकर्षिला जाऊन सुदेहाची कुंडली पाहून तिला सांगितले की,तुझ्या प्रारब्धामध्यें संतान-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सुख नाही' पण सुदेहाला संतानाची महान भूक होती व आपले घर संतानाने भरलेले राखायचें होते. ती अगदी जवळ बसून प्रेमानें म्हणाली, 'तुमचे माझ्यावर मोठें प्रेम आहे हे मला माहीत आहे, पण घरचा दिवा तेवत राहिलाच पाहिजे म्हणून तुम्ही दुसरे लग्न करा.'

'काय म्हणालींस, तुझे डोकें आज ठिकाणावर दिसत नाही, शुद्धीवर बडबडतेस दिसते' 'अहो मी ठीक शुद्धीवर आहे,तूमच्यासाठीच व घरच्या वंशवृद्धीसाठीच बोलते' 'हें शक्यच नाही. तुझें हे अजोड प्रेम सोडून दुसरींचे प्रेम शोधार्थ मी का जावें? पण मला देतील का कोण मुलगी !

माझ्या-तुमच्या विवाह प्रसंगापेक्षा आता परमेश्वर कृपेने किती चांगले आहोत, कीर्ती आहे, पैसा आहे, लौंकिक मानमरातब वजन सर्व कांही आहे तुमची वधू मीच पाहते व निश्चितही करतें. मी माझ्या आई-वडिलांना सांगून माझी छोटी बहीण घुष्मा इजबरोबर तुमचा विवाह लावून देते'

सुदेहाने स्वत:च्या पतीचा स्वत:ची घुष्मा नांवाची स्वरूप सुंदर बहिणीबरोबर विवाह घडवून आणला हे आजच्या स्त्रीला जमले असते काय? याचे उत्तर न लिहिलेंलेच बरे. सुदेहा ही नावाची नव्हती तर खऱ्या अर्थांची सुदेहा होती तिचा देह शुद्ध होता, भाव शुद्ध होता म्हणून हे सुदेही व सुधर्मी कार्य घडलें. हे सुदेहाचे व सुधर्मांचें नांवा-प्रमाणें सुमंगल होय. घृष्मा ही सासरीं आली. आईसमान प्रेमळ बहिण असल्यामुळे तिला सासर व माहेर समानच वाटले. घृष्मा ही महान शिवभक्त असून सदैव शंकराचे पार्थिव लिंग बनवून पूजा करून त्या शिवलिंगाचे जवळच्या तलावात विसर्जन करी. हे सर्व पाहून सुदेहा व सुधर्मा यांना सर्व विश्वच मांगल्यमय वाटत होते. थोडया कालावधीनंतर घृष्माने एका सुंदर पुत्राला जन्म दिला.सुदेहाचा संकल्प पूर्ण झाला. घर बालकाने नटले व वंशवृद्धी झालो,म्हणून तिचा आनंद त्रैलोक्यात मावेना, पण विधीघटना अकल्पित असते. ते कोणालाही चुकत नाही. बाळाला खेळवणेकरता पुढे जाई तर बाळ तिरस्कारीनें दुर जाई. जेवविण्यास बसे तर बाळ पळून जाई, लाडाने गोंजारण्यास

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जाई तर बाळ तुच्छतेनें निघून जाई. प्रेमाने कुरवाळण्यास जाई तर ती तिरस्कृत होई. कुठल्या जन्माचे वैरत्व तो पुरा करीत होता कोणास ठाऊक! त्या बाळाच्या या कृतीने तिचे मन भंगलें व ती दुःखी झाली. मनाने भंगलेल्या व उदास झालेल्या सुदेहाची देवावरील श्रद्धा उडाली. व मांगल्यावरचा भरवसा तिचा गमवला गेला. मुलगा मोठा झाला, त्याचें लग्न ठरलें जातांना मुलाला घृष्माने प्रथम सुदेहाला नमस्कार करणेस सांगितले कारण या विश्वात जन्माला तू येण्यास सुदेहाच कारणीभूत आहे, अशी आवर्जून सूचना दिली होती, सुदेहाबरोबर पूर्वजन्मातून छत्तीशी घेऊन आलेल्या मुलाने नमस्कार न करता अत्यंत तिरस्कार बुद्धीने डोळातून पुढे निघूत गेला त्याचक्षणी तिच्या मनांत जमदग्नीने प्रवेश केला. तिच्या मनात कोठे तरी चुकूत माकून कानाकोपऱ्यात असलेली सात्विकता पार खलास झाली व मुलाबद्दल वाईटातील वाईट विचार तिच्या डोक्यात आकाश पाताळाला भिडू लागलें.

ज्याच्याकरता मी माझे सर्व सुखाचा त्याग केला, जीवन सर्वस्व वाहिले त्यानें या जगात माझी कोणत्याहीं दृष्टीने आदर, भाव, आपुलकी, प्रेम काहीच ठेवले नाही. तर मी तरी याला या जगात जिवंत का ठेवावे, याला यमसदनाला पाठवलेच पाहिजें, ही भावना तिच्या मनात ठाण मांडून बसली. मुलाच्या हत्येबद्दल निरनिराळे मार्ग ती शोधू लागली, घृष्णा शिवपूजा आटोपून तिला रोज समजावीत असे व सर्व काही शिवकृपेने ठीक होईल व मुलाच्या मनांत सद्‌बुद्धी, सद्भाव निर्माण होईल, मी जरीं त्याची जनक माता असली तरी खरी माता तूंच आहेस हे त्याला खऱ्या अर्थाने कळेल.

तुझ्या शिवाशी मी जन्मभर भक्तीभाव संबध जोडला व टिकवला. तुझ्या शिवाने माझ्यासाठी काय केलें ते मी प्रत्यक्षच पाहात आहे. तुझे पूजेबद्दल मला कसलाच प्रेमभाव राहिला नाही. ताई, सुदेहा, तू माझी प्रत्यक्ष जनक माताच आहेस, तुझा आत्मा व देह थोर आहे सप्त सागराएवढा महान थोर भरलेला आहे. तुझ्या मुखातून निर्द्वंद्व निराकार, निराभास, निर्विकार, निःसंशय. निःसंग, निष्कलंक, निष्प-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पंच; निराग, निस्तुल, निरंजन, निरुपमनिमव, नित्य शुद्ध बुद्धपरिपूर्ण सत्‌चिदानंद सदाशिवाबद्दल अभद्र बोल शोभत नाही.

अशा गोड, प्रेमळ भक्तीभावी शब्द प्रयोगाने सुदेहा शिवाकडे वळली तर नाहीच पता भडक भावना व सूड बुध्दीमध्ये उलट उग्रता वाढली व असह्यतेने तिच्या मनाचा पूर्ण कबजा घेतला. ज्याने माझ्या सद्‌गुणांना व वात्सल्याला ठोकर मारली आहे, ज्याने माझ्या सर्वस्वावर लघुशंका केली आहे, त्याला मी जगात काय म्हणून शिल्लक ठेवावे त्याला ठार मारलेंच पाहिजे, असा निग्रह करुन रात्री झोपलेल्या स्वषतीपुत्रावर, स्वभगिनी पुत्रावर, स्वमानीव पुत्रावर, आवेशात आलेल्या सुदेहाने सुरीने हल्ला करुन ठार मारले. त्याचें प्रेत घृष्मा शिवलिंग पूजा करुन ज्या जवळच्या सरोवरांत नित्य विसर्जन करते. त्या तलावात फेकून दिले. ही अचाट शक्ती तिला कोढुन मिळाली हें शिवालाच ठाऊक? कोणीच आपणास पहिले नाही. या क्षणभंगूर आनंदने ती अगदी हरखून गेली. परंतु असंख्यकोटी ब्रम्हांड नायक यास हे सर्व माहीत होतेच.

सकाळी नेहमीप्रमाणे स्नुषा पतिराजास उठवणेंसाठी गेली, तेव्हा पलंगावर तो नव्हता, रक्ताच्या थारोळचाचें गोठलेंले डाग पलंगावरील बिछ.न्यावर तिने पाहिले व आक्रोशानें टाहो फोडुन किचाळून दुःखसागरांतून ब्रम्हांड पेटवला. सर्व लोकांना निरपराध मुलाच्या हत्येंबद्दल दुःख होऊन शोकग्रस्त झालें.

घृष्मा शिवलिंगे करुन पुजा करणेंत मग्न होती कोणीतरी 'तुझा मुलगा मारला गेला' असे तिला सांगितले

चंद्रमौळीश्वर शिवलिंगाची मी पूजा करींत आहे, त्यातील स्वाद-शांती मी अनुभवीत आहें, कोणाचा मुलगा मारला गेला, हे मला सांगू नका, मला त्रास देऊ नका, माझ्या एकाग्रतेचा भंग करु नका, तुमचें काहीच मला ऐकायचे नाही.

सारे लोक 'घृष्माकडे मातेचें हृदयच दिसत नाही, देवांवरील तिची भक्ती हे दांभिकच म्हणायचे, ती वेडाने पछाडली आहे' म्हणू लागलें. 'घृष्मा तुझा मुलगा मेलेंला आहें. त्याचे तुला सुतक आहे, तुला

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शिवपुजा करणेचा अधिकार नाही. तू अपवित्र आहेस' असे ब्राह्मण म्हणू लागले.

शिवलिंग माझे हातात आहे. त्याची मी अनन्यभावे पूजा करीत आहे. तेंव्हा माझेजवळ अपवित्रता येणें शक्यच नाही व माझेकडे नुसतें पाहुही शकणार नाही. हे दयासागरा, शंकरा, शंभो या सर्व लोकांकडून माझी एकाग्रता व शांती भंग न होवो असे त्यांना समजाव, व माझा पाठलाग सोडावयास सांग '

शिवलिंग घेऊन नित्यनियमाप्रमाणें विसंजन करण्यासाठी तलावा-या घडलेल्या घटनेची कांहीच कल्पना तिच्या मुखावर उमटले नाही अशा अवस्थेत निघाली. सारें लोकांच्या तांडापिच्छा न सोडता तिचे मागे चालूच लागला, हे पाहुन लज्जीत झालेली सुदेहा मुखावर दुःखाचा आवेग आणून घराबाहेंर आली व जनसमुदायात मिसळली. घृष्मेने तलावांत शिवलिंगे विसर्जित केंली व परत घराकडे निघाली, भोळया शंकराने घृष्मेला मृत पुत्राचा शोक स्पर्शही करु शकला नाही हा तिचा अविचल भक्तीभाव पाहुन तिला झालेले खरे ज्ञान जाणलें व प्रसन्न होऊन म्हटलें ' घृष्मे, तुझा मुलगा मेलेला नाही, तु त्याला हाकमार तो येईल ' घृष्मेनें हाक मारली व मुलगा तलावातून धावत वर आला

भगवान शंकर म्हणाले ' घृष्मे तू सर्वांगी चांगली आहेस ' सुदेहा ही देखील चांगली होती, तिनें आपला जीवनाचा फार मोठा भाग सात्विकतेंमध्यें व सन्मार्गामध्ये घालविला आहे. पण थोडासा बिघाड होताच तिने सात्विकता व ईश्वर भक्ती सोडली. जीवनभर केलेले तिनें पार धुऊन टाकले. एवढेच नव्हे तर तिने पूत्र हत्तेचे महान चांडाळ कृत्य केले ते अक्षम्य आहे. मृत्यूदंड हिच तिला शिक्षा.

हाय भगवंत ? हें मी काय ऐकत आहे, देवा, शिक्षा माझ्या ताईनें कोणतेच दुष्कृत्य केंले नाही. जन्मजन्मांतरी अशी बहीण मिळणार नाही, माझी माता ही नुसती जनकमाता होती पण माझे जीवन सुसंकृत घडवणारी माझी ताई हिच माझी खरी माता आहें. माझी गुरु आहें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तिच्या शांत, संयमी, समाधानी, आनंदी मनाचा व वर्तणुकीचा माझ्या अंत:करणावर व सर्वस्वावर खोल परिणाम झालेला आहे. हे प्रभो, तुला रागावयाचे असेल, शिक्षाच देणेंची असेल, तर माझेवर राग कर, मला शिक्षा दे, माझा पुत्र परत देणेंचा असेल तर दे, नसेल तर देऊ नकोस. पण माझ्या ताईला कांहीही करू नकोस. तिनें आपले जीवन अतिशय उच्च व भव्य रितीने धांलविले आंहे, व मलाही त्याचप्रमाणें जगण्यास शिकवले आहे. हे दयाघना करुणासागरा, तू पतितोध्दारक आहेस, त्यासाठी हे प्रभो, माझ्या ताईचा उद्धार कर.

घृष्मेच्या या प्रज्ञावादी शब्द प्रयोगाने भोळा शंकर विरघळला. सुदेहाचा भगवंताने उद्धार केला, ते स्थळ म्हणजेंच वेरुळ घृष्मेश्वर ज्योतिर्लिंग होय.

हे घृष्मेश्वरा, घृष्णेश्वरा, माझ्या नम्र नमस्काराचा स्विकार व्हावा.

卐

राजकारण

आज काल अजब राजकारण हे निराकरण सांगा मज
खोटी आश्वासने जनतेला देत पुढारी समजत स्वत:ला तो
आधी कार्पोरेटर मग महापौर अर्थात मेयर न सुटे आशा
आधी आमदार मग खासदार नंतर नामदार न सुटे मोह
आधी होय मंत्री मग मुख्यमंत्री नंतर केंद्रमंत्री न सुटे आशा
रात्रदिनी यत्न पंतप्रधानाचे नंतर राष्ट्रपतीचे न सुटे मोह
मिळे अधिकार तो क्षणभंगूर सुख न लाभणार जीवनात
लोकमनी एकदा घसरला पाय पाताळासी जाय न येई वर
सकाळी पुढारी दुपारी पिंजारी संध्याकाळी बेकारीं ऐशी स्थिती
राजकारणाचा हा थोर पसारा वर्णनी अपूरा हा बसव ८

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

卐 बारा ज्योतिर्लिंग आरती 卐

कर्पूर आरती अर्पण करितो द्वादश ज्योतिर्लिंगाला
सर्प विभूषित दर्पविनाशक जगद्वंद्य शिवलिंगाला ॥ १ ॥
सृष्टिकष्ट विनाशक श्रेष्ठ श्रीयुत ज्योतिर्लिंगाला
निष्ठायुत भज सौराष्ट्राधिश सोमनाथ शिवलिंगाला ॥ २ ॥
सोन्नलाधिपती सिद्धराम नित पूजित ज्योतिर्लिंगाला
पन्नग-भूषण श्रीशैलवासी मल्लिनाथ शिवलिंगाला ॥ ३ ॥
सुजनपालकर कुजनशूलकर उज्ज्वल ज्योतिर्लिंगाला
राजसुपूजित उज्जनीश श्रीमहांकाळ शिवलिंगाला ॥ ४ ॥
भक्तांकित संकेतमुक्त जय कलिमल हारकलिंगाला
वेंकटपूजित ॐकारेश्वर अमलेंश्वर शिवलिंगाला ॥ ५ ॥
सर्वमुरार्चित गर्वविनाशित पर्वकोश सुलिंगाला
सर्वेश्वर सकलांतक परळी वैद्यनाथ शिवलिंगाला ॥ ६ ॥
सौख्यहास्यकर दुःखनाशकर सुकांत ज्योतिर्लिंगाला
भक्तीमुक्तीकर डाकिन्यान्वित भीमाशंकरलिंगाला ॥ ७ ॥
सत्यप्रियकर मिथ्यप्रलयकर उत्तम ज्योतिर्लिंगाला
नित्यसुरासुर पूजित सेतू रामेश्वर शिवलिंगाला ॥ ८ ॥
योगध्यानधर भोगभंगकर जागृत ज्योतिर्लिंगाला
जगद्भाग्य भास्कर जय औंढे नागनाथ शिवलिंगाला ॥ ९ ॥
विश्वपालका विश्वशूलका सुशील ज्योतिर्लिंगाला
विश्वमान्य विश्वार्चित काशी विश्वनाथ शिवलिंगाला ॥ १० ॥
संगलयकर भंगभयकर शंभूरूप श्रीलिंगाला
अंबप्रियकर मंगलांगधर नाशिक त्र्यंबक लिंगाला ॥ ११ ॥
रुद्ररुपधर भद्ररुपकर उदार ज्योतिर्लिंगाला
सदाशुभंकर मदनांतक केदार सुभूषण लिंगाला ॥ १२ ॥
पावनगात्रा स्तवनसुपात्रा निवांत ज्योतिर्लिंगाला
देवसुपूजित भावसमर्पित घृष्णेश्वर शिवलिंगाला ॥ १३ ॥
निशिदिनी गातो प्रशांतभावे जगद्वंद्य शिवलिंगाला
बसव विनवितो प्रसन्न होण्या द्वादश-ज्योतिर्लिंगाला ॥ १४ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

विश्व विराट काव्याचा विश्व विराट अर्थ

श्री रुद्र हें विश्वाचें विराट महाकाव्यच आहे. मानवी शक्तीतून दैवी शक्तीत उत्क्रांती करुन उत्तुंग दीपस्तंभ उभा करावयाचा असंख्यास श्री रुद्र पठण हा एकमेव मार्ग आहे. स्वत:चा स्वतावर नियंत्रण ठेवण्याइतका मनाचा विकास या रुद्र पठणांतून होतो. यज्ञापासून प्रकट होणाऱ्या अग्नीलाच रुद्र असे म्हणतात. रुद्र, एकादशरुद्र, लघुरुद्र, महारुद्र, अतिरुद्र असे पांच प्रकार असून रुद्र म्हणणाऱ्या रुद्रभक्तांनाही त्याचा महिमा मुळीच माहित नाही. मनावर ज्या विचारांचे संस्कार दृढ होतात तेच विचार पुढे कृतीरुपाने साकार होतात. हे महत्वाचे तत्व ध्यानात ठेवूनच आपल्या दैनंदिनीत रुद्र पठण करणे अत्यंत जरूर आहे वाईट कृतीपेक्षा वाईट विचार हे अधिक भयानक आहेत. मनात नेहमी शुभ विचारच असावेत, अशुभाचा स्वप्नातही स्पर्श होऊ नये. वाणींतून अपशब्द उच्चारला जाऊ नये याकरतां नित्य रुद्र पठणाची नितांत गरज आहे. रूद्रसूक्तातील विचार हे अत्यंत व्यापक स्वरुपाचें आहेत. त्या विचाराशी जस जसे समरस व्हावे तस तसे आपणही न कळत व्यापक बनत चालल्याची एक आगळीच संवेदना आपणास जाणवू लागते व त्या विचारांची भव्यता व त्याचे सामर्थ्य कळू लागते. यजुर्वेदांतील शंभर शाखांचा सारभूत हा रुद्र मानला गेला आहे. रूद्रपठणांतून सुखदुःख, लाभालाभ, जयापजय इत्यादि द्वंद्वातही अविचल राहता येते पण मनांतून व मुखातून रूद्रगंगा अखंड वाहिली पाहिजे. 'रुद्राचा जप केल्याने अमरत्वाची प्राप्ती होते' त्यातील रुद्राचा अर्थ काय, जपाचा अर्थ काय, जपाची प्रक्रीया काय, आत्मसात करणे म्हणजे काय, त्याचा निदिध्यास म्हणजें काय, अमरत्व म्हणजे काय, हे सारे खऱ्या अर्थाने मनात रूतल्यानंतरच जे अशक्य वाटते ते सर्व करणे शक्य आहे हे अनुभवानेच कळते. मृत्यू हा इहलोक दृष्टीने भयप्रद व भीषण वाटत असला तरी मृत्यूच्या कमलातून दरवळणारा सौरंभ हा अमरत्वाच्या नालदंडावर विकसित झाला आहें याची जाणीव ऋषींना झाले कारणाने अनंत रीतीने त्यांनी रूद्र महिमा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वर्णिला आहे. तारेवरची कसरत किंवा अचूक लक्षवेध या गोष्टीही कितीहीं अवघड असल्या तरी त्या पूर्णावस्थेस येण्यास मनाच्या खंबीर धोरणणेशिवाय शक्य नाहीत मनाचा हा एक विलक्षण धर्म किंवा गुण आहे. तें कितीही चंचल व ओढाळ असलें तरी युक्तीने भाविकतेने वश करुन घेण्यास रुद्रपठण हाच एक तरणोपाय आहे.या मंत्राचा जप अर्थं-भावनेतून केला तरच त्या अर्थाची धारणा सिद्ध होते. धारणा सिद्ध होत गेली की अमृतत्वाची प्राप्ती दूर नाहीं, परंतु हे सारे करीत असतांना मन हे एकाग्र व स्थिर असावयास हवे.परमात्म्याच्या विराट स्वरुपाशी एकरुप होणे करता रूद्रातील मंत्रांचा अर्थ अगोदर कळला पाहिजे. रुद्रपठण करीत असतांना ते अवघड आहे व कळत नाही असे समजून सोडू नये. पाठांतरातून निश्चित मुखोद्गत होतेच व तसेच पुढे पठण चालू ठेवण्याने व ते पूर्णावस्थेत आणण्यास धैर्य व स्थैर्य निर्माण होऊन त्यातील जाज्वल्य अशा शब्दातून एकाग्रता प्राप्त होते व त्या परमात्म्याशी आपण एकरुप होतो असा त्या रूद्राचा अगाध महिमा आहे श्री रुद्र हा अमरत्वाची प्राप्ती करून देणारा आहे. श्री रुद्र याचें नमक व चमक असे दोन विभाग असून प्रत्येक विभागात अकरा अनुवाक आहेत व प्रत्येंक अनुवाकात सुमारे बारा ते पंधरा मंत्र आहेंत. नमक विभागातील कांही मंत्राच्या प्रारंभी नमः हा शब्द असून कांही मंत्राच्या प्रारंभी व शेवटी नमः असा शब्द आहे. चमक विभागांत वारंवार 'चमे' हा शब्द उपयोग केल्यामुळे त्याना नमक व चमक म्हणण्याचा रिवाज पडला आहे. रूद्र हा ऐहिक व पारलौकिक कल्याण प्राप्त करुन देणारा आहे. परमेश्वराच्या विविध स्वरुपाला नमक विभागात नमः म्हणजे नमस्कार केला आहें. विज्ञानवाद्यानाही चकित करुन सोडणाऱ्या सिद्धांताची विराट भरारी या रुद्रसूक्तांत सापडते. वाणी शुभ असावी, मनात नेंहमी शुभ संकल्पाचे मनन करावें अशी शिकवण या रुद्राने दिली आहे समाजधारणेंसाठी व समाजाचे अनुशासन करणें-साठी आवश्यक ती गुणसंपदा संपादन करण्याची प्रेरणा या रुद्रामुळे मिळते. दुष्टांचें निग्रह व सुष्टांचे परिपालन हे रुद्राचें खरे अंग आहे.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सन्मार्गानें जाणाऱ्यास उत्तेजन देणें, त्याच्या मार्गांतील विघ्नें दूर करणें, ज्यास्तीत जास्त श्रेय मिळवून देणें, दुष्टाना शासन भोगावयास लावणें, पश्चाताप निर्माण करुन हळू हळू सन्मार्गगामी बनवणें वगैरे रुद्रपठणातून आपीआप अनुभवास येतात. देवतांचें प्रत्येंकी भिन्न भिन्न गण आहेंत. त्यांत शंकराचे गण हें अधिक प्रसिद्ध आहेत. या प्रसिद्ध गणाना रुद्राच्या नमक विभागात नमस्कार सांगितला आहें. नमक विभागातील नवव्या अनुवाकांताल किरिक, विक्षीणक, विचिन्वत्क, आनिर्हत व आमिवत्क हें मोठे उदार म्हणून प्रसिद्ध आहेत. किरिक म्हणजें भक्तांना यथेष्ट ऐश्वर्य प्रदान करणारें, विक्षीणक म्हणजे भक्तांना नाना तऱ्हेचे उपद्रव देऊन सन्मार्गी आणणारे, विचिन्वाक म्हणजे भक्तांना उपयुक्त अशा सर्व वस्तु परवगारे, आतिर्हत म्हणजे भक्तांच्या अनेंक जन्मांच्या पापराशी नाश करणारे, आमीवत्क म्हणजे अमर्याद प्राप्ती करुन देणारे या सर्वांना व परमेश्वराच्या अनंत नामाला, रुपाला, तेजाला व कार्याला भावभरित नमस्कार ननक विभागांत सांगितला आहे. यापुढें चमक विभागात नमकातीस या साऱ्या नमस्कारांतून आपणांस सर्व तऱ्हेचें फल प्राप्त होवो अशी मागणी त्या चिदघनस्वरुप परमात्मशक्तीने विलसत असलेंल्या कर्पूरगौर सांबशिवाला केली आहे. चमकात प्रार्थना करताना आपल्यातील मीपणा हा व्यक्त जगाची मर्यादा भेदून अव्यक्तात झेप घेतो. लोक लोकांतराशी आत्मीयतेंच्या अभेद्य अशा बंधनानें मीपणात एक आगळे व लोकोत्तर असे तेज संपुटित झाले आहें. या दिव्य तेजाची आल्हादक प्रभाच चमकातील अक्षरा अक्षरातून ओसंडत आहे. पांचव्या अनुवाकांतील शब्द राष्ट्राच्या भौगोलिक मर्यादाविषयी जागरूकता निर्माण करणारे आहेत. सातव्या, आठव्या व नवव्या अनुवाकांतील ग्रहांना देवतांची नांवे दिलेली आहेत. पैकी काही ग्रह प्रकृतीभूत भागामध्ये सांगितले आहेत. हे सर्व ग्रह द्रव्ये मेकल्पताम–मला सुलभ होवोत, माझ्याकडून त्यांचें अनुष्ठान होवों, असा भक्तीभावार्थ आहे. दहाव्या अनुवाकांत ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये व शरीरात नांदणारे दशविधप्राण या

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पार्थिव देहातील अपार्थिव चिच्छक्तीही यज्ञेन कल्पता–यज्ञमय होत्रो अशी प्रार्थना आहे. अकरावा अनुवाक हा चमक विभागातील कौस्तुभ-मणीच आहे. जीवनातील विद्या, दर्शने, कला, अस्तित्वाच्या दिव्य साक्षात्कार याचा यामध्ये समावेश आहे. सम आणि विषम संख्या यांचे द्योतक असणारे शब्द यामध्ये आहेत व ते सारे आपल्या शरीरातील मर्मस्थानाशी निरनिराळ्या तऱ्हेचे संबंध जोडूनच अर्थभरित शद्बप्रयोग केलेले आहेत. नमकात संग्रहाची तर चमकात संप्रदानाची कल्पना अभिप्रेत आहे. आपली मनोभूमिका शुद्ध व निःशंक करूनच या रुद्र मंत्रातील शद्बापासून निर्माण होणारा ध्वनिप्रवाह करावा.

श्री रुद्र पाठांतर, पारायण करण्याचे बावतीत या पूर्व प्रकाशनात (प्रथम पुण्यांत) ईशस्मरण, स्तवन, स्नान, आसन, दिग्बंध, संकल्प, रुद्राक्ष, अभिषेक, भस्म, गंध, अक्षता, विल्वपत्र, पुष्प धूप, दीप, कर्पूर, नैवेद्य, तांबूल, दक्षिणा, घंटा, पुष्पांजली,प्रदक्षिणा, नमस्कार, आदि सर्व वैदिक संस्कृत मंत्र व त्यांचा मराठीत अर्थ दिलेलाच आहे. म्हणून येथे त्याची पुनुरावृत्ती करीत नाही. रुद्राचें महत्व सर्वांना सहज सुलभ समजावे म्हणून पंचमुखी परमेश्वराच्या पादकमली हा प्रामाणिक प्रपंच केला आहे. तो सर्वांनी गोड करून घ्यावा ही नम्र विनंती.

बसप्पा वी. वारद

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अथ श्रीरुद्राध्याय :

(प्रथमोऽनुवाकः)

ॐ नमो भगवते रुद्राय । नमस्ते रुद्र मन्यव उतो त इषवे नमः
नमस्ते अस्तु धन्वने बाहुभ्यामुत ते नमः १

या तइषुः शिवतमा शिवं बभूव ते धनु ।
शिवा शरव्या या तव तया नो रुद्र मृडय २

या ते रुद्र शिवा तनूरघोराऽपापकाशिनी ।
तया नस्तनुवा शन्तमया गिरिशन्ताऽभिचाकशीहि ३

यामिषुंगिरिशन्त हस्ते बिभर्ष्यस्तवे ।
शिवां गिरित्र तां कुरु माहिंसीः पुरुषं जगत् ४

अर्थ :– १) हे रुद्रा, तुझ्या क्रोधाला मी नमस्कार करतो. तसेच तुझा बाण आणि तुझे धनुष्य आणि तें धारण करणारे तुझे दोन बाहु यांनाहि मी नमस्कार करतो. २) हे रुद्रा, दुःख अथवा दुःखाचे कारण दूर करणाऱ्या शंकरा,जो हा तुझा बाण व भाता अत्यंत शांत झाला आणि तुझे धनुष्य शांत झालें, त्या शांत झालेंल्या धनुर्बाणादिकांनी तू आम्हाल सुख दे. ३) हे शिवा, तुझ्या दोन मूर्ति तनु प्रसिद्ध आहेत. हिंसक मूर्ति ही घोरा तनू म्हणजे भयंकर रुप व अनुग्राहती मूर्ति ही अघोरा म्हणजे मंगलरुप, या उभयविध स्वरुपातील जी तुझी अघोरा तनू पुण्या प्रकाशिनी, पवित्र करणारी. म्हणजे कल्याण करणारी अशा या तुझ्या कल्याणकारक मूर्तीनें तू आमचे अज्ञान दूर कर. अनंत जन्माचें पाप नाहीसे करुन परशिव ब्रह्मज्ञानाला योग्य असे कर. ४) हे गिरिशंत, कैलासनिवासी सांबशिवा, जो बाण शत्रूवर प्रहार करण्यासाठी धारण केला आहेस तो बाण हे शंकरा तुझे हाती असलेले सर्व बाण आमच्याशी सर्वांशाने शांत कर. आमच्या मूलाबाळांचे, भावी संततीचें तसेच मानव जातीय संबंधित अशा सर्वांचे जगत म्हणजे आमची गुरे वासरे जमीन जुमला वगैरे स्थावर मालमत्तेचे जंगम संपत्तीचे तू रक्षण कर.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शिवेन वचसा त्वा गिरिशाच्छ वदामसि

यथा नः सर्वमिज्जगदयक्ष्मङ्‌ सुमना असत् ५

अध्यवोचदधिवक्ता प्रथमो दैव्यो भिषक् ।

अहीङ्श्च सर्वाज्जम्भयन्त्सर्वाश्च यातुधान्य : ६

असो यस्ताम्रो अरूण उत बभ्रुः सुमंगलः ।

ये चेमाङ्‌ रुद्रा अभितो दिक्षु त्रितः सहस्त्रशो वैषाङ्‌ हेड ईमहे ७

---

५) हे गिरीशा, तुझी प्राप्ती व्हावीं म्हणून स्तुतीरुपी शब्दांनी व मंगलमय वाणीने आम्ही तुझी प्रार्थना करतो. या प्रार्थनेंमुळे आम्ही व आमचे हे सर्व जग, गाई वगैरे स्थावर जंगम रोगरहित आणि चांगल्या मनाचे होईल असे कर. ६) सर्प, विंचू, चोर व्याघ्र आदि घातुक श्वापदांचा तसेच राक्षस जातीमध्ये निर्माण झालेल्या अविवेकी महा दुष्ट पशुवृत्तीचा नाश करणारा तू सर्व देवामध्यें परमोत्तम महा-देव आणि अग्रगण्य आहेस म्हणून तुला आद्यवैद्य देवादिदेव म्हणण्यांत येते. तेव्हां मी तुझाच आहे असे तू म्हण. माझ्याबद्दल तुझ्यात ममत्त्व-बुद्धि निर्माण झाली म्हणजे इतरांचीहि तशीच होईल. ७) आता-पावेतोच्या मंत्रात वर्णन केलेल्या अप्रत्यक्ष शंकराचे आता प्रत्यक्ष स्वरु-पात वर्णन करीत आहे. असो म्हणजे आकाशांत दिसणारा. ताम्र म्हणजे तांबूस वर्णाचा सूर्य हाच आदित्यरुप रुद्र उदयाच्या वेळी ताम्र उदया नंतर अरुण वर्णांचा व पिंगट वर्णाचा आणि चांगल्या रितीनें मंगल करणारा किंवा अनेक वर्णांच्या अशा या सूर्य स्वरुपामध्ये प्रत्यक्ष रुद्रच आहे. तसेच आजूबाजूच्या दाही दिशांनी व्यापून उरणारे इतर अनेंक जे रुद्र आहेत व जे सूर्याचे किरण हे सर्व जग व्यापतात म्हणून त्यांनाहि रुद्र असे म्हटले आहे. या सर्वांच्या क्रोधाला भक्तियुक्त अंतः-करणाने नमस्कार करुन त्यांचा क्रोध दूर करतो.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

असौ योवसर्पति नोलग्रीवो विलो हित: ।
उतैन गोपा अदृशं नदृशंन्नुदहार्य: । उतैनं :
विश्वा भूतानि स दृष्टो मृडयाति न: ८
नमो अस्तु नोलग्रीवाय सहस्राक्षाय मीढुषे ।
यथो ये अस्य सत्वा नोऽहं तेभ्योऽकरं नम: । ९
प्रमुञ्च धन्वनस्त्वमुभयोरात्नियोर्ज्याम्
याश्च ते हस्त इषव: परा ता भगवो वप १०
अवतत्य धनुस्त्व ङु सहस्त्राक्ष शतेषुधे ।
निशीर्य शल्यानां मुखा शिवो न: सुमनां भव ११

---

८) जो नीलकंठ रूपाचा रुद्र तोच विशेषे करुन लोहित (आरक्त) वर्णाचा गगनांगणात संचार करतो गगनांगणात, म्हणजे आकाशांत संचार करणाऱ्या सूर्यरुपी रुद्राला गुराखी आणि पाणी नेंणाऱ्या धटदासी याहि पाहू शकतात.

९) भक्तानुग्रहास्तव कालकूटविष प्राशनानें ज्याचा कंठनील झाला तोच नीलकंठ इंद्ररुप धारण केल्याने सहस्र नेत्रधारी झाला. गर्जणारे मेघरुप धारण करुन पर्जन्याने भूमीसां सुजलां करणाऱ्या शंकराला नमस्कार असो. तसेच या रुप्राचे समानस्वरुपी महिमाशाली रेणुक, दारुक, धटाकर्ण, धेंनुकर्जे, विश्वकर्ण, नंदी वृषभ इत्यादि प्रथमगण जे आहेत त्यांनाहि मी नमस्कार करतो.

१०) हे भगवान् महद्वैभवैश्चर्य संपन्न, तुझ्या धनुष्याची दोरी काढून ठेव आणि तुझ्या हाती जे बाण आहेत तेहि तू टाकून दे.

११) हे सहस्राक्ष, अगणित भाते असलेल्या हे रुद्रा, तुझ्या धनुष्याची दोरी शिथील करुन तुझ्या बाणांची टोके उलटी करुन भात्यात ठेव आणि आमच्याकडे अतिशांत दृष्टीने पहा आणि आमच्या बाबतीत तू कल्याणकारक हो.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

विज्यं धनु: कपर्दिनो विशल्यो बाणवाङ् उत ।
अनेशन्नस्येषव आभुरस्य निषंगथि : १२

या तें हेतिर्मीढुष्टम हस्ते बभूव ते धनु :
तयास्मान्विश्वतस्त्वमयक्ष्मया परिब्भुज । १३

नमस्ते अस्त्वायुधायानातताय धृष्णवे ।
उभाभ्यामुत ते नमों बाहुभ्यां तव धन्वने १४

---

१२) जटाधारी शंकराचे धनुष्य दोरी पासून अलिप्त झालेले असो. तसेच शंकराचे भाते हे बाणरहित होवोत. या शंकराचे बाण भात्यामध्ये ठेंवलेलें दुसऱ्याचा वध करण्याचे बाबतीत असमर्थ ठरोत, तसेच या शंकराचे तलवारादि खड्गांचे सामर्थ्य कमी होवो.

१३) हे भक्तवत्सला, भक्तांच्या कामना सदैव पूर्ण करणाऱ्या देवाधि देवा तुझी धनुष्यादि आयुधे शांत करुन या शांत अशा तुझ्या अनुपद्रवकारी आयुधांनी या जगांत सर्वापासून आमचे रक्षण कर.

१४) हे रुद्रा न ताणलेल्या तुझ्या धनुष्यरुप आयुधाला आणि बाणरुप आयुधाला नमस्कार असो. महान धैर्यशाली सर्वसमर्थ अशा या तुझ्या बाहूंना नमस्कार असो.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

परि ते धन्वनो हेतिरस्मान्वृणक्तु विश्वतः ।
अथो य इषुधिस्तवारे अस्मन्निधेहि तम् १५

नमस्ते अस्तु भगवन् विश्वेश्वराय महादेवाय
त्र्यंबकाय त्रिपुरघ्नाय त्रिपुरांतकाय

त्रिकाग्निकालाय कालाग्निरुद्राय नीलकंठाय
मृत्युंजयाय सर्वेश्वराय सदाशिवाय श्रीमन्महादेवाय नमः

---

१५) हे रुद्रा, तुझ्या पिनाक नामक धनुष्यरुपीं आयुधांच्या बाणरुप शल्यापासून आमचें रक्षण कर. तुझा भाता आम्हा पासून दूर ठेव.

अथ द्वितीयोऽनुवाकः

ॐ नमो हिरण्यबाहवे सेनान्ये दिशां च पतये नमो १

प्रथमावानुकांत धनुष्यवाण धारण केलेल्या श्री शंकराच्या प्रधान तनूचीच प्रामुख्याने स्तुती केली आहे यापुढील आठहीं अनुवाकांत श्री शंकराचे सर्वातर्व्यापित्व व सर्वगामित्व प्रामुख्याने वर्णन करावयाचे आहे. पुढील अनुवाकामधींल सर्व मंत्र यजुःस्वरुप व यजुर्वेदांतर्गत आहेत. त्यापैकी अनुवाक दुसरा, तिसरा व चौथा यामधील मंत्र आद्यंत नमस्कारपदयुक्त आहेंत. व त्यापुढील म्हणजे पांचवा, सहावा, सातवा, आठवा व नववा या अनुवाकातून मंत्र केवळ आद्य नमस्कारपदयुक्त आहेत.

अर्थ– १) सुवर्णनिर्मित आभरण बाहुमध्ये धारण केलेले आहेत अशा व युद्धामध्ये सेना संचलन व नियमन करणारा जो सेनापती त्याचें स्वरुप धारण करणाऱ्या आणि दिशांचा जो स्वामी आहे अशा शंकराला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमो वृक्षेभ्यो हरिकेशेभ्यः पशूनांपतये नमो २

नम सस्पिञ्जराय त्विषीमते पथीनां पतये नमो ३

नमो बभ्लुशाय विव्याधिनेऽन्नानां पतये नमो ४

नमो हरिकेशायोपवीतिने पुष्टानां पतये नमो ५

नमो भवस्य हेत्यै जगतां पतये नमो ६

नमो रुद्रायाततताविनें क्षेत्राणां पतये नमो ७

---

२) ज्या वृक्षांची पानें हिरवीगार आहेत त्या वृक्षस्वरुप शंकराला नमस्कार आणि पशूंचा म्हणजे साऱ्या प्राण सृष्टीचा पालनकर्ता असलेल्या शंकराला नमस्कार

३) कोवळचा गवताप्रमाणें पिवळा, लाल अशा अनेक वर्णाच्या दिव्य कांती धारण करणाऱ्या लौकिक आणि वैदिक अशा उभयविध मार्गाचा प्रवर्तक असलेल्या शंकराला नमस्कार.

४) वृपभावर जो बसतो त्याला म्हणजे वृषभारुढ शंकराला व शत्रूंचा विशेषेकरुन विध्वंस करणाऱ्या रुद्राला आणि अन्नाचा अधिपतिं असलेल्या शंकराला नमस्कार.

५) ज्याचा केशसंभार सदैव काळचा रंगाचा आहे अशा शंकराला नमस्कार आणि लोककल्याणार्थ म्हणून उपवीत (सूत्र) धारण करणाऱ्या रुद्राला नमस्कार. तसेच सर्व परिपूर्ण गुण जवळ असलेल्या रक्षण कर्ता जो शंकर त्याला नमस्कार.

६) भवं म्हणजेच संसार व त्याचा नाश करणाऱ्या आणि जगाचे पालन करणाऱ्या शंकराला नमस्कार.

७) महान् धैर्यशाली पवित्र्यानिशी आकृष्ट धनुष्यानें रक्षण-करतो तो "आततावी" अशा सज्य धनुष्य असलेल्या शंकराला नमस्कार आणि सज्जनांच्या शरीरांचे पालन करणाऱ्या किंवा काशी, केदार, श्रीशैल, इत्यादि क्षेत्रांचा अधिपती असलेल्या शंकराला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नम इंद्रजटाकलापिनां पतये नमो

नमा वृषाललतायिनां पतये नमो

नमो ललाटवृकायिनां पतये नमो

नमो ललाललतायिनां पतये नमो

नमो वनाननतायिनां पतये नमो

नमो मनाननतायिनां पतये नमो

नमः ननाननतायिनां पतये नमो

नमः सूतायाहन्त्याय वनानां पतये नमो ८

नमो रोहिताय स्थपतये वृक्षाणां पतये नमो ९

नमो मंत्रिणे वाणिजाप कक्षाणां पतये नमो १०

---

८) जगद्रुप रथाचा (नियामक) सारथी आणि कसल्याहि शत्रूकडून ज्याची केव्हांहि हिंसा होऊ शकत नाही अथवा मी म्हणजेच सर्व जगत अशी भावना असणारा आणि वनांचा पालन करणारा जो शंकर त्याला नमस्कार.

९) लाल (गौर) वर्णाचा जो स्थापीत म्हणजे महान प्रभु शिव त्याला आणि वृक्षांचे व वेलींचे पालन करणाऱ्या शंकराला नमस्कार.

१०) सद्योजातादि पंचब्रम्ह मंत्राचा आधार भूत अथवा राज-सभेमध्ये प्रसंगोचित असा चतुर व कुशल सल्ला देणाऱ्या आणि व्यापार करणाऱ्यांचा अधिपति असणाऱ्या तसेच घनदाट अरण्याचे रक्षण कर-णाऱ्या शंकराला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमो भुवंतये वारिवस्कृतायोषधीनां पतये नमो ११

नम उच्चैर्घो षायाक्रन्दयते पत्तीनां पतये नमो १२

नमः कृत्स्नवीताय धावते सत्वानां पतये नमः १३

---

११) चतुर्दश भुवनें निर्माण करणाऱ्या आणि धन निर्माण करणाऱ्या व अरण्याचे रक्षण करणाऱ्या शंकराला नमस्कार.

१२) युद्धकाळी गगनभेदी ज्याचा ध्वनी होतो व समरांगणात शत्रूना रडविणाऱ्या आणि पादचारी योद्धे म्हणजे एक रथ, एक हत्ती, पांच पादचारी, तीन घोडे यांचा अधिपति असणाऱ्या शंकराला नमस्कार.

१३) संपूर्ण सैन्य ज्याने वेढलेले आहे तो व सैन्यांचा अधिपती असणाऱ्या आणि युद्धात पलायन करणाऱ्या शत्रूसैन्याचा पाठलाग करणाऱ्या आणि शरणांगताना अभयदान करुन रक्षण करणाऱ्या अशा शंकराला नमस्कार.

अथ तृतीयोऽनुवाकः

ॐ नमः सहमानाय निव्याधिन आव्याधिनींनां पतये नमो १

अर्थ- १) शत्रूंचा पराभव करण्यामध्यें समर्थ असलेल्या अथवा भक्तांच्या अपराधांना क्षमा करणाऱ्या आणि शत्रूंचा निश्चयाने नि:पात करणाऱ्या सांबशिवाला नमस्कार असो. आपल्या आवाक्यांतील तसेच आजूबाजूस दूर असणाऱ्या सर्व शत्रूंचा नि:पात करू शकणाऱ्या शूर सेनेंचा सेनापति असलेल्या सांबशिवाला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमः ककुभाय निषङ्गिणे स्तेनानां पतये नमो । २

नमो निषङ्गिण इषुधिमते तस्कराणां पतये नमो । ३

नमो वञ्चते परिवञ्चतेस्तायूनां पतये नमो । ४

---

२) प्रधानभूतशा अथवा वृषभाच्या पाठीवर शोभणाऱ्या सांबशिवाला नमस्कार तसेच गुप्तपणे दुसऱ्यांचे धन लुबाडणाऱ्या चोरांचा अधिपति असलेल्या, हाती खड्ग धारण केलेल्या सांबशिवाला नमस्कार.

३) निषङ्ग म्हणजे धनुष्यांवर शरसंधान करण्यासाठी हातात बाण घेतलेला इषुधि म्हणजें बाण ठेवण्यासाठी पाठीवर भाता बांधलेला, ज्याच्या पाठीवर बाणांचा भाता आहे व ज्याने हातात बाण घेतलेला आहे अशा श्री रुद्राला नमस्कार, पांथस्थांचे धन द्रव्य वगैरे अपहार करण्याकरता अरण्यात प्रगट रुपाने राहणारे तस्कर (चोर) अशांचा अधिपति असलेल्या सांबशिवाला नमस्कार.

४) स्वतःबद्दल प्रथम विश्वास निर्माण करून बुद्धीच्या आधारे चोरी करणारा (वंचक)चोर. कोणाचाही कोठेही चोरी करणारा (परिवंचक) भुरटा चोर, अशा उभयविध स्वरुपांत असणाऱ्या शंकराला नमस्कार आता स्तायू म्हणजे गुप्तचोर. हे दोन प्रकारचे. गुप्त वेषाने रात्रीच्या वेळी घर फोडून जे चोरी करतात ते स्तेन आणि मी तुमच्यातील आहे असे भासवून जें चोरी करतात ते स्तायू स्तेन. आणि स्तायू या उभयविध स्वरुपांत असणाऱ्या व त्यांचे रक्षण करणाऱ्या श्री सांबशिवाला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमो निचेरवे परिचरायारण्यानां पतये नमो । ५

नमः सृकाविभ्यो जिघाङ्सद्भ्यो मुष्णतां पतये नमो । ६

नमो ऽसिमद्भ्यो नक्तं चरभ्द्यः प्रकृन्तानां पतये नमो । ७

नम उष्णीषिणे गिरिचराय कुलुञ्चानां पतये नमो । ८

---

५) निचेरव म्हणजे धन्याच्या घरातच चोरी करण्याची सुवर्ण संधि साधण्याच्या विचाराने घरांत वावरणारा चोर. परिचर म्हणजे बाजारात व इतर सार्वजनिक ठिकाणी चोरी करण्याच्या बुद्धीनें हिंडणारा चोर आणि अरण्यांत एकटचा दुकटचा वाटसरुला गांठून त्याचे सर्वस्व अपहरण करणारे ते अरण्यचोर. अशा त्रिविध चोरांचे पालन करणाऱ्या श्री सांबशिवाला नमस्कार.

६) सृक हा शद्व वज्रवाची आहे. सृकावि म्हणजे शस्त्रधारी चोर. जिघांसक म्हणजे ठार मारुन चोरी करणारे चोर. मुष्णतः म्हणजे शेतीचा धंदा करून आणि प्रसंगानुसार मालकाचे धान्य चोरणारे चोर. या सर्वांचा अधिपति असणाऱ्या श्री सांबशिवाला नमस्कार.

७) नेहमी खड्ग धारण करणारे चोर आणि रात्री गावात हिंडून चोरी करणारे चोर यां दोघांचा अधिपती असलेंल्या सांबशिवाला नमस्कार व ठार मारुन चोरी करणारे प्रकृन्त चोर, त्यांचाही पालक असलेल्या श्री सांबशिवाला नमस्कार.

८) मुंडासे बांधलेंल्या खेडवळा प्रमाणे स्वतः मुंडासे बांधून त्यांच्यात फिरणाऱ्या आणि लाकुडफाटा आणण्यासाठी डोंगरात गेंलेल्या लोकांचे वस्त्र अपहरण करण्यासाठी त्यांच्यात संचार करणाऱ्या सांबशिवाला नमस्कार. तसेच धरे शेतीवाडी वगैरे हरण करणाऱ्या चोरांचा अधिपति असलेल्या श्रीं सांबशिवाला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नम इषुमद्‌भ्यो धन्वाविभ्यश्च वो नमो । ९

नम आतन्वानेभ्यः प्रतिदधानेभ्यश्च वो नमो । १०

नम आयच्छद्‌भ्यो विसृजभ्द्यश्च वो नमो । ११

नमोऽस्यद्‌भ्यो विद्यद्‌भ्यश्च वो नमो । १२

नम आसीनेभ्यः शयानेभ्यश्च वो नमो । १३

नमः स्वपद्‌भ्यो जाग्रद्‌भ्यश्च वो नमो । १४

नमस्तिष्ठद्‌भ्यो धावद्‌भ्यश्च वो नमो । १५

---

९) शत्रूला भिवविण्यासाठी हाती बाण धारण करणाऱ्या आणि शत्रूना पळविण्यासाठी हाती धनुष्य धारण करणाऱ्या हे रुद्रांनो तुम्हाला नमस्कार.

१०) धनुष्यावर दोरी चढविणाऱ्या आणि शरसंधान करणाऱ्या हे रुद्रांनो तुम्हाला नमस्कार.

११) धनुष्याची दोरी कानापर्यंत ओढणारे (ताणणारे) ते आयच्छंत रुद्र आणि बाण सोडणारे ते विसृजन्त रुद्र अशा तुम्हांला नमस्कार.

१२) शत्रूंच्या शरीरापर्यंत बाण सोडणाऱ्या आणि शरीरापर्यंत गेलेल्या बाणाला हृदयांत घुसवणाऱ्या अशा उभयविध स्वरुपांतील श्री रुद्रानो तुम्हाला नमस्कार

१३) बसलेल्या आणि झोपलेंल्या अशा उभय स्थितीत असणाऱ्या हे रुद्रांनो तुम्हांला नमस्कार.

१४) झोपी गेलेल्या व जागृतावस्थेत असलेल्या अशा उभय स्थितीत असणाऱ्या हे रुद्रानो तुम्हाला नमस्कार.

१५) उभे असणाऱ्या आणि पळणाऱ्या हे रुद्रानो तुम्हाला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमः सभाभ्य। सभापतिभ्यश्च वो नमो । १६

नमो अश्वेभ्योऽश्वपतिभ्यश्च वो नमो । १७

---

१६) एकत्र येऊन संघशः बसलेल्या आणि त्यांचे अधिपती असलेल्या हे रुद्रांनो तुम्हांला नमस्कार.

१७) घोडचाचे शरीर असणाऱ्या आणि त्याचे अधिपति असणाऱ्या हे रुद्रांनो तुम्हाला नमस्कार.

अथ चतुर्थोऽनुवाकः

ॐनम आव्याधिनीभ्यो विविध्यन्तीभ्यश्च वो नमो । १

नम उसणाभ्यस्तृंङुहत्तीभ्यश्च वो नमो । २

नमो गृत्सेभ्यो गृत्सपतिभ्यश्च वो नमो । ३

अर्थ–१ आसमंतात असणाऱ्या शत्रूंचा नाश करण्यास समर्थ असलेल्या इतकेच नव्हे तर खडतर रितीनें शत्रूंची हिंसा करण्यास असलेल्या शक्तिरुप धारण केलेल्या हे रुद्रानो तुम्हाला नमस्कार.

२) उत्कृष्ट गण म्हणून गणलेले सप्तमातृका वगैरे सौम्य स्त्रीदेवतारुप असलेल्या अशा दुर्गा, भैरवी. चामुंडचा आदि उग्रता अशा उभयविध स्वरुपातील हे रुद्रानों तुम्हांला नमस्कार.

३) बुद्धिमंत म्हणजे बुद्धीबलावर वावरणारे व त्यांचा अधिपतिरुप असलेल्या, किंवा विषयलंपट आणि त्यांचा अधिपति रुप असलेल्या रुद्रांनो तुम्हांला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमो व्रातपतिभ्यश्च वो नमो । ४

नमो गणेभ्यो गणपतिभ्यश्च वो नमो । ५

नमो विरूपेभ्यो विश्वरूपेभ्यश्च वो नमो । ६

नमो महद्‌भ्यः क्षुल्लकेभ्यश्च वो नमो । ७

नमो रथिभ्यो रथेभ्यश्च वो नमो । ८

नमो रथेभ्यो रथपतिभ्यश्च वो नमो । ९

---

४) नाना प्रकारच्या वृत्ति धारण करणाऱ्यांचे समूह म्हणजे व्रात त्यांना आणि त्यांचे जे आधिपति अशा उभयविध स्वरुपांत असलेल्या रुद्रानो तुम्हांला नमस्कार.

५) रुद्रदेवाचे सेवक अशा भूतविशेषांचा समूह व त्याचा अधिपति अशा उभयविध स्वरुपी रुद्रांनों तुम्हांला नमस्कार.

६) विकृतरुप धारण करणाऱ्या नग्न मुंडादि भृत्य आणि तुरंग गज वक्त्रादि नाना तऱ्हेचीं रुपे धारण करणारे म्हणजे भृत्यांची स्वरुपे धारण करणाऱ्या रुद्रांनो तुम्हांला नमस्कार.

७) अणिमाहि अष्टसिद्धिमुळें संपादलेले ऐश्वर्य ज्याच्याजवळ आहे ते व असे ऐंश्वर्य नसल्यामुळे कनिष्ट स्वरुप धारण केलेले अशा उभयविध स्वरुपांतील रुद्रांनो तुम्हाला नमस्कार.

८) रथारुढ असणाऱ्या आणि रथविरहित असणाऱ्या अशा रुद्रांनो तुम्हाला नमस्कार.

९) रथस्वरुप असणाऱ्या आणि रथावयवभूत असणाऱ्या रुद्राला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमः सेनाभ्यः सेनाभिभ्यश्च वो नमो । १०
नमः क्षत्तृभ्यः संग्रहीतृभ्यश्च वो नमो । ११
नमस्तक्षभ्यो रथकारेभ्यश्च वो नमो । १२
नमः कुलालेभ्यः कर्मारेभ्यश्च वो नमो । १३
नमः पुञ्जिष्टेभ्यो निषादेभ्यश्च वो नमो । १४
नम इषुकृद्भ्यो धन्वकृद्भ्योश्च वो नमो । १५
नमो मृगयुभ्मः श्वनिभ्यश्च वो नमो । १६

---

१०) लीलार्थ (विनोदार्थ) गज अश्वादि चतुरंग सेनास्वरुप रूद्रांला नमस्कार आणि सेनाधिपती रूप धारण केलेल्या रुद्रांनो तुम्हांला नमस्कार.

११) रथावर कसें आरोहण करावे वगैरे शिक्षण देणाऱ्या आणि रथ कसे चालवावेत याचे शिक्षण देणाऱ्या रुद्राला नमस्कार.

१२) तक्षक म्हणजे रंधा मारणारे सुतार. तक्षणकुशल आणि रथकार म्हणजे रथ निर्माण करणारे अशा उभयविध स्वरूपांतील रुद्रानो तुम्हांला नमस्कार.

१३) मातीचे घट निर्माण करणारे कुंभार आणि लोहकार म्हणजे लोहार अशा उभयविध स्वरूपांतील रूद्रानो तुम्हाला नमस्कार.

१४) पक्षि समुदायांना जाळयांत पकडून वध करणारे पारधी व निषाद म्हणजे मासे मारणारे कोळी अशा उभयविध स्वरूपातील रुद्रानो तुम्हांला नमस्कार.

१५) चांगले बाण करणाऱ्या आणि चांगली धनुष्ये करणाऱ्या अशा उभयविध स्वरुपांतील रूद्रांनो तुम्हांला नमस्कार

१६) ठार मारण्याच्या अपेक्षेने हरिणांचा पाठलाग करणारे शिकार करणारे आणि श्वनिभ्यः म्हणजे शिकारी करितां कुत्र्यांच्या गळयांत दोरी बांधून पाळणारे अशा उभयविध स्वरूपांतील रुद्रांनो तुम्हांला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमः श्वभ्य श्वपतिभ्यश्च वो नमः । १७

१७) कुम्याचे रुप धारण करणाऱ्या आणि त्यांचा अधिपति असणाऱ्या अशा उभयविध स्वरुपातील रुद्रांनो तुम्हांला नमस्कार.

अथ पंचमोऽनुवाकः

ॐनमो भवाय च रुद्राय च । १

नमः शर्वाय च पशुपतये च । २

नमो नीलग्रीवाय च शितिकण्ठाय च । ३

नमः कपर्दिने च व्युप्तकेशाय च । ४

नमः सहस्राक्षाय च शतधन्वने च । ५

अर्थ—१) सर्वजीवमात्र आणि जंगमाजंगम विश्व ज्याच्यापासून निर्माण झाले तो भव अथवा सदैव व सर्वत्र वावरणाऱ्या शंकराला आणि रोदनकारक दुःख नाश करणाऱ्या रुद्राला नमस्कार.

२) प्रलयकाली सर्व जीवात्म्यांचा लोप करणाऱ्या आणि ब्रह्मादि जीवांचे स्वामी असणाऱ्या रुद्राला नमस्कार.

३) क्षीरसागर मंथनकाली उद्भवलेल्या कालकूट विष प्राशनाने ज्याच्या कंठाचा अत्यल्प भाग नीलवर्णाचा झाला आहे तो नीलकंठ त्याला नमस्कार आणि उरलेला सर्व भाग गौर वर्णाचा ज्याचा कंठ आहे अशा रुद्राला नमस्कार.

४) जटाजूटधारीं शंकराला नमस्कार व मुंडन केलेल्या शंकराला नमस्कार.

५) इंद्ररुपाने हजार डोळे असलेल्या आणि अगणित धनुष्ये धारण केलेल्या शंकराला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमो गिरिशाय च शिपिविष्टाय च । ६

नमो मीढुष्ट माय चेषु यते च । ७

नमो ह्रस्वाय च वामनाय च । ८

नमो बृहते च वर्षी यचे च । ९

नमो वृद्धाय च संवृध्वने च । १०

नमो अग्रियाय च प्रथमाय च । ११

नम्न आशवे चाजिराय च । १२

---

६) सदैव कैलासावर वास करणाऱ्या अथवा पंडितप्रवर शंकराला नमस्कार आणि विष्णु (व्यापक) स्वरुप असलेल्या महेश्वराला म्हणजे रुद्राला नमस्कार.

७) मेघाचे रूप धारण करुन अतिशय वर्षाव करणारा, पाऊस पाडणारा त्याला आणि बहुवाण धारण करणाऱ्या अतिशूर शंकराला नमस्कार.

८) शरिराकृतिमध्यें अति लहान असलेल्या शंकराला नमस्कार आणि हातपाय इत्यादि अवयव ज्याचे अल्प आहेत त्यालाही नमस्कार.

९) आकाराने मोठा म्हणजे परब्रह्म झालेल्या आणि ज्ञानादि गुणांनी संवृद्ध असलेल्या शंकराला नमस्कार.

१०) वयाने वृद्ध असलेल्या आणि ज्ञानानेहीं सर्वात अत्यंत वृद्ध असलेल्या आणि सर्वांच्या स्तुति नमस्कारांस सदैव पात्र असलेंल्या शंकराला नमस्कार.

११) जगाच्या उत्पत्तीपुर्वी असणाऱ्या आणि हिरण्यगर्भ ब्रम्हादिपेक्षा प्रथम असलेल्या शंकराला नमस्कार.

१२) शीघ्रतीनें व्यापक होणाऱ्या व गमनामध्यें अतिनिपुण असे रूप धारण करणाऱ्या शंकराला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमः शीघ्रियाय च शीभ्याय च। १३

नम ऊर्म्याय चावस्वन्यया च। १४

नमः स्रोतस्याय च द्वीप्याय च॥ १५

---

१३) सर्वत्र तीव्रगमनशील आणि जलप्रवाहामध्ये असणारा अशा शंकराला नमस्कार.

१४) तरंगामध्ये असणाऱ्या आणि निस्तरंगामध्ये असणाऱ्या शंकराला नमस्कार.

१५) जलप्रवाहात असलेंल्या आणि जलमध्यवर्ति उन्नत प्रदेशावर असलेल्या शंकराला नमस्कार.

अथ षष्ठोऽनुवाकः

ॐनमो ज्येष्ठाय च कनिष्ठाय च। १

नमः पूर्वजाय चापरजाय च। २

नमो मध्यमाय चापगल्भाय च। ३

अर्थ– १) वय विद्या आणि ऐश्वर्य इत्यादींनी युक्त असलेल्या तो ज्येष्ठ म्हणजे श्रेष्ठ आणि यांनी कमी असलेंला तो कनिष्ठ अशा उभयविध स्वरुपांतील श्री शंकराला नमस्कार.

२) जगाच्या उत्पत्तीपूर्वी जन्मलेल्या हिरण्यगर्भ ब्रह्मस्वरूप धारण केलेल्या आणि जगाच्या उत्पत्तीनंतर जगाच्या प्रलयकाली कालाग्नि स्वरुप धारण केलेल्या रुद्राला नमस्कार.

३) जटाच्या मधल्या कालखंडात सुर, असुर, नर इत्यादि स्वरुपांनी निर्माण झालेल्या आणि ज्याच्या अवयवांचा विकास झालेला नाही अशा कोवळ्या बालस्वरुपी शंकराला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमो जघन्याय च बुध्नियाय च । ४

नमः सोभ्याय च प्रतिसर्याय च । ५

नमो याम्याय च क्षेम्याय च । ६

नम उर्वर्याय च खल्याय च । ७

नमः श्लोक्याय चावसान्याय च । ८

नमो वन्याय च कक्ष्याय च । ९

---

४) विराटरुपी शिवाच्या मांडीतूत निर्माण झालेला वैश्य-स्वरुप धारण केलेला आणि विराटरुपी रुद्राच्या पादमुळांतून निर्माण झालेला, सत् शूद्ररुप धारण केलेला अशा उभयविध स्वरुपातील शंकराला नमस्कार.

५) या लोकामध्ये जन्मलेल्या, मानवादि रुप धारण केलेल्या आणि विवाहादि मंगलसमयी हातांत कंकणसूत्रास पात्र अशा स्वरुपात असलेल्या शंकराला नमस्कार.

६) यम लोकांमध्ये पापी लोकांना शिक्षा करणाऱ्या स्वरुपांत असलेल्या यमस्वरुप रुद्राला नमस्कार आणि मोक्ष प्राप्तीस योग्य अशा पुरुष स्वरुपाने असणाऱ्या शंकराला नमस्कार.

७) सर्व तऱ्हेचे धान्य समृद्ध करण्यास योग्य अशा भूमिकेतून निर्माण होणाऱ्या पीक स्वरुपात असलेल्या शंकराला नमस्कार. आणि धान्य गोळा करण्यांकरता केलेंल्या खळचांतील मेटीखांब, मध्यखांव स्वरुपात असणाऱ्या शंकराला नमस्कार.

८) निगमागम प्रतिपाद्य अशा शंकराला नमस्कार. आणि वेदागमात प्रतिपाद्य अशा शंकराला नमस्कार. आगमोपनिषदात वर्णन केलेल्या शक्तिविशिष्ठाद्वैतस्वरुप शंकराला नमस्कार.

९) अरण्यातील वृक्ष इत्यादि रुपाने असलेल्या आणि गवत वेली इत्यादि स्वरुपाने असणाऱ्या शंकराला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमः श्रवाय च प्रतिश्रवाय च । १०

नम आशुषेणाय चाशुरथाय च । ११

नमः शूराय चावभिन्दते च । १२

नमो वर्मिणे च वरूथिने च । १३

नमो बिल्मिने च कवचिने च । १४

नमः श्रुताय च श्रुतसेनाय च । १५

---

१०) ध्वनिस्वरुपाने असणाऱ्या आणि प्रतिध्वनिस्वरुपाने असणाऱ्या अशा उभयविध स्वरुपातील शंकराला नमस्कार.

११) शीघ्रगामी सेना असलेल्या आणि शीघ्रगामी रथही असलेल्या स्वरुप असणाऱ्या शंकराला नमस्कार.

१२) युद्धामध्ये धैर्य व शौर्य गाजविणाऱ्या स्वरुपात असलेल्या आणि शत्रूंना दे माय धरणी ठाय करुन सोडणाऱ्यांच्या स्वरुपात असलेल्या रुद्राला नमस्कार.

१३) चिलखत घातलेल्या स्वरुपात असलेल्या आणि गुप्तस्थान लसलेल्या योधाग्रगण्यस्वरुपी रुद्राला नमस्कार.

१४) सच्छिद्र शिरोवेष्टनाने युक्त अशा स्वरुपात असलेल्या आणि पायापर्यंत शरीर रक्षण करणारे चिलखत धारण करणाऱ्या स्वरुपात असलेल्या श्री रुद्राला नमस्कार.

१५) वेदागम प्रसिद्ध असलेल्या आणि निगमागम प्रसिद्ध सेना असलेल्या स्वरुपातील रुद्राला नमस्कार

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अथ सप्तमोऽनुवाकः

ॐ नमो दुन्दुभ्याय चाहनन्याय च । १

नमो घृष्णवे च प्रमृशाय च । २

नमो दूताय च प्रहिताय च । ३

नमो निषङ्गिणे चेषुधिमते च । ४

नमस्तीक्ष्णेष वे चायुधिने च । ५

नमः स्वायुधाय च सुधन्वने च । ६

नमः स्त्रुत्याय च पथ्याय च । ७

अर्थ–१) दुन्दुभी म्हणजे नगारा भेरी यामध्ये ध्वनिरुपाने असणाऱ्या आणि आहनन्य म्हणजे भेरी अथवा नगारा वाजविण्यासाठी घेतला जाणारा दंड, टिपरी यामधून उत्पन्न होणाऱ्या स्वरुपांत असणाऱ्या शंकराला नमस्कार.

२) युद्धामध्ये पाठ न फिरवण्यात अत्यंत दृढ स्वरुपात असलेल्या आणि शत्रूंकडील अतिसूक्ष्म इंगित काढण्यात कुशल, चतुर अशा असलेल्या श्री शंकराला नमस्कार.

३) वृत्तांत सांगण्यात चतुर असलेल्या आणि पाठवलेल्या दूताची चिंता वाहणाऱ्या श्री शंकराला नमस्कार.

४) स्वभक्त रक्षणार्थ हातात खड्ग आणि पाठीशी बाणभरित भाता धारण करणाऱ्या स्वरुपात असलेल्या श्री रुद्राला नमस्कार.

५) तीक्ष्ण बाण असलेल्या आणि असख्य शस्त्रास्त्रे धारण केलेल्या स्वरुपात असलेल्या रुद्राला नमस्कार.

६) सर्वत्र अकुंठित अशा त्रिशूळ आदि आयुधे असलेल्या आणि अप्रतित असे पिनाक धनुष्य असलेल्या श्री रुद्राला नमस्कार.

७) भक्त परिपालनार्थ लहानसा पाऊल वाटेवर संचरित असणाऱ्या आणि राजमार्गावरही संचरित असणाऱ्या श्री शंकराला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमः काट्याय च नीप्याय च । ८

नमः सूद्याय च सरस्याच च । ९

नमो नाद्याय च वेशन्ताय च । १०

नमः कूप्याय च वट्याय च । ११

नमो वर्ष्याय चावर्ष्याय च । १२

नमो मेघ्याय च विद्युत्याय च । १३

नम ईध्रियाय चातप्याय च । १४

नमो वात्याय च रे ष्मियाय च । १५

---

८) पाण्याच्या लहानशा डबक्यांत संचरित कोळी स्वरुपांत असणाऱ्या आणि पर्वतावरुन पाण्याचा प्रवाह पडतो त्या स्वरुपात असणाऱ्या श्री शंकराला नमस्कार.

९) चिखलाच्या प्रदेशात पाण्याच्या स्वरुपाने असणाऱ्या आणि सरोवराच्या जलरुपाने असणाऱ्या शंकराला नमस्कार.

१०) नदीत जलरुपाने असणाऱ्या आणि लहानशा तलावात पाणीरुपाने असणाऱ्या शंकराला नमस्कार.

११) खोल आडातल्या पाण्यात असणाऱ्या आणि लहानशा खड्डयात जलरुपाने असणाऱ्या शंकराला नमस्कार.

१२) पावसाच्या पाण्यात असणाऱ्या आणि पावसाशिवाय समुद्रातल्या पाण्यात असणाऱ्या शंकराला नमस्कार.

१३) मेघामध्ये असलेल्या आणि विजेमध्ये संचरित अशा उभयविध स्वरुपात असलेल्या शंकराला नमस्कार.

१४) निर्मल अशा शरदातील मेघामध्ये राहणाऱ्या आणि सूर्यापासून उत्पन्न होणाऱ्या उष्णतेमध्ये असणाऱ्या अशा उभयविध स्वरुपातील श्री शंकराला नमस्कार.

१५) वावटळीमध्ये असणाऱ्या आणि प्रलयकाली निर्माण होणाऱ्या झंझावातामध्ये असणाऱ्या श्री शंकराला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमो वास्तव्याय च वास्तुपाय च । १६

१६) नाना तऱ्हेच्या पदार्थात वास्तव्य करणारा आणि पदार्थ जेथे ठेवले जातात त्या वास्तूचे पालन करणारा अशा उभयविध स्वरूपात असलेल्या शंकराला नमस्कार.

अथ अष्टमोऽनुवाकः

ॐनमः सोमाय च रुद्राय च । १

नमस्ताम्राय चारुणाय च २ ।

नमः शङगाय च पशुयतये च । ३

नम उग्राय च भीमाय च । ४

नमो अग्रेवधाय च दूरेवधाय च । ५

नमो हन्त्रे च हनी यसे च ६ ।

अर्थ–१) उमारूपी शक्ती समवेत असणाऱ्या आणि दुःख निवारण करणाऱ्या शंकराला नमस्कार.

२) सूर्यरूपाने उदयकालीं अत्यंत आरक्त वर्णाच्या असणाऱ्या आणि उदयानंतर अरुणवर्णाच्या असणाऱ्या शंकराला नमस्कार.

३) सुख प्राप्त करून देणारा तो शंग आणि पशूंचें जीवांचे पालन करणारा तो पशुपति अशा उभयविध स्वरुपातील शंकराला नमस्कार.

४) शत्रूंचा नाश करण्यात उग्र असलेल्या आणि ज्याला पाहताच शत्रू भयभीत होतात अशा रुद्राला नमस्कार.

५) समरांगणात प्रवेश केलेल्या आपल्या भक्तांच्या अग्रभागी उभे राहून भक्तांच्या शत्रूंचा वध करणाऱ्या आणि आपल्या दूर असलेल्या भक्ताच्या शत्रूंचा वध करणाऱ्या श्री रुद्राला नमस्कार.

६) जो कोणी ज्याचा वध करील त्या वध करणाऱ्या स्वरुपात असणाऱ्या आणि त्याच्या स्वरुपांत राहून प्रलयकाली सर्व प्राण्यांचा संहार करणाऱ्या रुद्राला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमो वृक्षेभ्यो हरिकेशेभ्यो । ७

नमस्ताराय च तारकाय च । ८

नमः शम्भवे च मयोभवे च । ९

नमः शङ्करायच मयस्कराय च । १०

नमः शिवाय च शिवतराय च । ११

नमस्तीर्थ्याय च कूल्याय च । १२

नमः पार्याय चावार्याय च । १३

---

७) हिरवीगार पाने ज्याची आहेत असे जे कल्पवृक्ष त्यांच्या स्वरुपात असलेल्या शंकराला नमस्कार.

८) प्रणवपीठ प्रसिद्ध तारक ब्रह्मस्वरुप असणाऱ्या आणि आपल्या उपासकाना संसारसागरांतून पैलतीरी पोहोचविणाऱ्या अशा शंकराला नमस्कार.

९) इहलोकांत व परलोकात निजसुख देणाऱ्या शंभूला आणि मोक्षरूपीं नित्यसुख ज्याच्या पासून मिळते त्या मयोभव म्हणजे शंकराला नमस्कार.

१०) भक्तांना विषयसुख व मोक्षसुख देणाऱ्या शंकराला नमस्कार.

११) सत्वादि त्रिगुण नसल्यामुळे कल्मषरहित म्हणूनच कल्याण-गुणगणस्वरूप असलेल्या शिवाला नमस्कार. आणि लोकांमध्यें अथवा वेदांमध्ये असणाऱ्या सर्व शिवंकरापेक्षा श्रेष्ठ शिवंकर म्हणजे सर्वांशानें महन्मंगल करणाऱ्या अशा शिवाला नमस्कार.

१२) काशी मणिकर्णिका आदि तीर्थामध्मे असलेल्या आणि गंगा आदि नदीतीरावर यथाविधी स्थापन केलेल्या लिंगरूपाने असलेल्या श्री शंभूला नमस्कार.

१३) संसारसमुद्राच्या पैलतीरावर आणि संसारसमुद्राच्या ऐलतीरावर संसारी लोकांना कामित फल प्रदान करीत लिंगरुपाने असणाऱ्या शंकराला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमः प्रतरणाय चोत्तरणाय च । १४

नम आतार्याय चालाद्याय । च १५

नमः शष्प्याय च फेन्याय च । १६

नमः सिकत्याय च प्रवाह्या च । १७

---

१४) मत्र जपाने पापांतून तरून जाण्याला कारणीभूत असणारा तो प्रत्तरण. तत्वज्ञानाने मोक्षप्राप्ती होण्याला कारणीभूत होणारा तो उत्तरण अशा उभयविध स्वरूपात असलेल्या श्री शंकराला नमस्कार.

१५) या संसारसागरांत पुनः पुनः जन्म मरण वाहणाऱ्या जीवांच्या स्वरूपात अनुग्राहक रुपाने असणाऱ्या आणि प्रत्यक्ष भोग घेणाऱ्या जीवात्म्याला प्रेरक स्वरूपात असणाऱ्या श्री शंकराला नमस्कार.

१६) गंगादि नदीतीरावर निर्माण होणारे बालतृण म्हणजे दर्भ, हरळी याच्या स्वरूपात असणाऱ्या आणि नदीतील पाण्यावरील फेसाच्या स्वरूपात असण ऱ्या शंकराला नमस्कार

१७) नदीच्या पाण्यापासून निर्माण होणाऱ्या, वाळूत असणाऱ्या आणि प्रवाहरूपाने असणाऱ्या अशा श्री सांबशिवाला नमस्कार.

अथ नवमोऽनुवाकः

ॐनम इरिण्याय च प्रपथ्याय च । १

अर्थ–१) इरिण म्हणजे ऊषर म्हणजे पडीक अथवा नापीक जमीन, तिथे असणाऱ्या व राजमार्गावर असणाऱ्या अशा उभयविध स्वरुपातील शंकराला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमः किंशिलाय च क्षयणाय च । २

नमः कपर्दिने च पुलस्तये च । ३

नमो गोष्ठ्याय च गृह्याय च । ४

नमस्तल्प्याय च गेह्याय च । ५

नमः काट्याय च गव्हारेष्ठाय च । ६

नमो हृदय्याय च विवेष्प्याय च । ७

नमः पांसव्याय च रजस्याय च । ८

---

२) अति लहान दगडांचा म्हणजे खड्यांचा अर्थात वालुकामय प्रदेश रुपाने असणाऱ्या आणि निवासयोग्य प्रदेश रुपांत असणाऱ्या शंकराला नमस्कार.

३) जटाजूटधारी शंकराला नमस्कार आणि सदैव श्रद्धावंत भक्तांच्या समोर असणाऱ्या शंकराला नमस्कार.

४) गायीच्या गोठात तद्रुपाने असणाऱ्या आणि घरात तदरुपाने असणाऱ्या अशा उभयविध स्वरुपातील शंकराला नमस्कार.

५) खाट पलंग आदि शयनावर झोपणारांच्या स्वरुपत असणाऱ्या आणि राजप्रासादात देवालयात लिंगमूर्ति स्वरुपाने असणाऱ्या शंकराला नगस्कार.

६) प्रथमपासून शेवटपर्यंत काटाकुटांनी प्रवेश करण्यास अशक्य अशा कठीण प्रदेश स्वरुपानें असणाऱ्या आणि भयंकर-अशा गिरिगव्हरांमध्ये तद्रुपाने असणाऱ्या रुद्राला नमस्कार.

७) गंभीर अशा मोठमोठ्या डोहामध्ये असणाऱ्या आणि निवेष्प म्हणजे बर्फरुपी पाण्यामध्ये तद्रुपाने असणाऱ्या शंकराला नमस्कार

८) अतिसूक्ष्म परमाणूमध्ये तद्रुपाने असणाऱ्या आणि दृष्टि-गोचर अशा धुळीच्या कणांमध्ये तद्रुपाने असणाऱ्या शंकराला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमो नंदिकाय च कूष्मांडाय च नमः पराय च परतपाय च
नमः परमात्मनाय च धूमाय च नभो हाराय च ताराय च
नमो वामनाय च हिरण्याय च नमः शिवाय च हरिकेशाय च
नमः शुष्क्याय च हरित्याय च । ९
नमो लोप्याय चोलप्याय च १०
नम ऊर्व्याय च सूर्म्याय च । ११
नमः पर्ण्याय च पर्णशद्याय च । १२
नमोऽपगुरमणाम चाभिघ्नते च । १३
नम आक्खिदते च प्रक्दिते च । १४

---

९) वाळलेल्या निरस पदार्थामध्ये तद्‌रुपाने असणाऱ्या आणि जीवनरसानें रसरसलेल्या पदार्थांमध्ये तद्‌रुपाने असणाऱ्या अशा उभयविध स्वरुपी श्री शंकराला नमस्कार.

१०) लोप म्हणजे गवत सुद्धा उगवू शकत नाही असा कठिण प्रदेश तिथे असणारा तो लोप्य आणि उलप म्हणजे लहान लहान गवत. त्यामध्यें असणारा तो उलप्य. लोप्य आणि उलप्य अशा उभयविध स्वरुपी शंकराला नमस्कार.

११) पृथ्वीपासून वर असलेल्या सर्व वस्तूंच्या स्वरुपात असणाऱ्या आणि उत्तम तरंगानी युक्त अशा नदीच्या स्वरुपांत असणाऱ्या शंकराला नमस्कार.

१२) पानांमध्ये असणारा आणि वाळलेल्या पाचोळ्यामध्ये असणारा अशा उभयस्वरुपी शंकराला नमस्कार.

१३) जगत्‌कंटक व दुष्ट यांना शिक्षा देण्याकरता हाती खड्‌ग उगारलेल्या आणि समोरील मदोन्मत्त दुष्टांचा संहार करणाऱ्या रुद्राला नमस्कार.

१४) अपराधानुसार शिक्षा देणाऱ्या आणि त्याचप्रमाणें आत्यंतिक शिक्षा देणाऱ्या रुद्राला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमो वः किरिकेभ्यो देवानाङ्हृदयेभ्यो । १५

नमो विक्षीणकेभ्यो देवानाङ्हृदयेभ्यो । १६

नमो विचिन्वत्केभ्यो देवानाङ्हृदयेभ्यो । १७

नम आनिर्हतेभ्यो देवानाङ्हृदयेभ्यो । १८

नम आमीवत्केभ्यः देवानाङ्हृदयेभ्यः । १९

---

१५) भक्तांना धान्य ऐश्वर्य देणारे हे किरिक म्हणजे रुद्रावतार म्हणून प्रसिद्ध आहेत. हे सर्व देवांना अत्यंत प्रिय असल्यामुळे यांना देवांचे हृदय असे म्हटलेले आहे. सर्व देवप्रीय आणि उदार असणाऱ्या हे रुद्रांनो तुम्हांला नमस्कार.

१६) विक्षीणक म्हणजे अक्षीण अर्थात ज्यांची केव्हाही क्षीण-दशा होत नाही, असत नाही ते आणि गर्व देवांना अत्यंत प्रिय असल्यामुळे देवाचे हृदय म्हटले गेलेले ते अशा उभयविध स्वरूपातील हे रुद्रांनो तुम्हांला नमस्कार.

१७) शिक्षा देण्यासाठी दुष्ट अशा दुर्जनास व अनुग्रह कर-ण्यासाठी पुण्यवंत अशा सज्जनास संशोधन करणाऱ्या आणि सर्व देवांना अत्यंत प्रिय असल्यामुळे देवांचे हृदय म्हटले गेलेले ते अशा उभयविध स्वरुपांतील हे रुद्रांनो तुम्हांला नमस्कार.

१८) शरणांगत भक्तांचे पाप निःशेष रितीने नाहीसे करणाऱ्या आणि सर्व देवांना अत्यंत प्रिय असल्यामुळे देवाचे हृदय म्हटलें गेलेले ते अशा उभयविध स्वरुपांतील हे रुद्रानो तुम्हांला नमस्कार.

१९) सर्व पदार्थांची भक्तांना समृद्धि प्राप्त करुन देणाऱ्या आणि सर्व देवांता अत्यत प्रिय असल्यामुळे देवांचे हृदय म्हटलें गेलेले ते अशा उभयविध स्वरुपातील रुद्रानो तुम्हांला नमस्कार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अथ दशमोऽनुवाकः

ॐ द्रापे अन्धसस्पते दरिद्रन्नीललोहित एषां पुरुषाणामेषां पशूनां मा
भेर्माऽरो मो एषां किंचनाममत् । १

या ते रुद्र शिवा तनूः शिवा विश्वाहभेषजी
शिवा रुद्रस्य भेषजी तया नो मृड जीवसे । २

अर्थ–१) दुष्टांना दुर्गति प्राप्त करुन देणाऱ्या व पुण्यवत अशा भक्तांमध्ये अन्नादि गोष्ट समृद्ध ठेवून त्यांचे पालन करणाऱ्या समृद्ध अन्न देण्यांत अधिपति असूनही आशारहित राहणाऱ्या अर्थात स्वत:साठी संग्रह न करणाऱ्या आणि कंठ नीलवर्ण आणि इतरत्र आरक्तवर्ण असणाऱ्या हे देवाधिदेवा महादेवा ह्या आमच्या पुत्रपौत्रादिक सकल संबंधितांना आणि गाई–महिषी इत्यादि आमच्या श्वापदींना तू भीति दाखवू नकोस आणि या माझ्या सकल संपत्तीपैकी एकही वस्तू नाहीशी होऊ देऊ नकोस. तसेच यांच्यापैकी कोणालाही कसलाही रोग विकार पीडीत तूं होऊ देऊ नकोस.

२) हे रुद्रा, तुझ्या घोरा आणि अघोरा अशा दोन तनूपैकी अधोरा म्हणजे कल्याणकारक आणि शांत अशा तनूने तू आम्हांस सुख दे. तुझी तनू विश्वाहभेषजी आहे. विश्वः म्हणजे सर्व दिवसामध्ये आणि भेषजी म्हणजे रोग दारिद्रय आदिंना नाहीसे करण्यामध्य औषधाप्रमाणे उपयुक्त असल्यामुळे शांतिदायक व मंगलकारक आहे अशा तुझ्या या परमकल्याणप्रद तनूने तू आम्हाला निरंतर सुख निर्माण कर.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

इमाङ्रुद्राय तवसे कर्पादिने क्षयद्वीराय प्रभरामहे मतिम् यथा नः
शमसद्द्विपदे चतुष्पदे विश्वं पुष्टं ग्रामे अस्मिन्ननातुरम् । ३

मृडा नो रुद्रो तनो मयक्कृधि क्षयद्वीराय, नमसा विधेम ते यच्छ
च योश्च मनूरायजे पिता तदश्याम तव रुद्र प्रणीतौ । ४

मा नो महान्तमुत मा नो अर्भकं मा न उक्षन्तमुत मा न उक्षितम् ।
मा नो वधीः पितरं मोत मातरं प्रिया मा नस्तनुवो रुद्र रीरिषः । ५

---

३) उपासकांचे मनोरथ पूर्ण करण्यास सदैव सामर्थ्यसंपन्न असलेल्या, गंगामृत धारण केलेल्या जटाजूटधारी व रणांगणात समोर येणाऱ्या शत्रूंचा टिकाव लागू शकत नाही म्हणजे शत्रू सर्वांशानें नाश पावतात अशा रुद्राविषयी पूजाध्यानविषयक बुद्धि आम्ही धारण करतो. ज्यास्तव आमच्या द्विपदसंवधीत पुत्रपौत्रादि मानव संततीस ब चतुष्पाद गोमहिषादि पशूरुप संपत्तीस सुख होईल, इतकेच नव्हे तर आमच्या गावातील सर्व प्राणिवर्ग सुखसंपन्न आणि रोग दारिद्रचादि उपद्रवरहित होईल असें कर.

४) दुःख नाश करणाऱ्या हे रुद्रा, आम्हांला इहलोकामध्ये पुत्रपौत्र धनधान्यादिंच्या समृद्धीने सुखी कर आणि परलोकामध्येही सुखी कर. रणांगणात तुझ्यासमोर वीरपुरुष येऊन नाश होतात अशा तुझी नमस्काराने आम्ही सेवा करु. पिताशिवाने ब्रह्मस्वरुपी रुद्रानें सुख आणि दुःख जे काही आमच्यासाठी निर्माण केले ती तुझी आमच्यावर कृपा झाली असतां आम्ही आनंदानें ग्रहण करु.

५) हे रुद्रा, आमच्यांतील ज्ञानाने वयाने तपस्याने वृद्ध अशा पुरुषांना तूं पीडू नकोस आणि आमच्या औरस मुलाबाळांना तू त्रास देऊ नकोस. तसेच आमच्यांतील संततिउत्पादनसमर्थ अशा पुरुषाना तू मारू नकोस आणि गर्भस्थ जीवानाही तू त्रास देऊ नकोस तसेच आमच्या पूज्य पित्यांना तू मारु नकोस आणि आमच्या पूज्य मातांनाही तू मारु नकोस तसेच आमच्या प्रियतम अशा शरीरांनाही तू इजा पोहोचू देऊ नकोस.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मा नस्तोके तनये मान आयुषि मानो गोषु मा नो अश्वेषु रीरिषः ।
वीरान्मा नो रुद्र भामितो वधीर्हविष्मंतों नमसा विधेम ते ।। ६
आरात्ते गोघ्न उत पूरुषघ्ने क्षयद्वीराय सुम्नमस्मे ते अस्तु ।
रक्षा च नो अधि च देव ब्रूह्यधा च नः शर्म यच्छ द्विबर्हाः ।। ७
स्तुहि श्रुतं गर्तसदं युवानं मृगं न भीममुपहत्नुमुग्रम् ।
मृडा जरित्रे रुद्र स्तवानो अन्यं ते अस्मन्निवपन्तु सेनः ।। ८

---

६) दुःखनाशक हे रूद्रा, आमच्या लहान लेकरांना आणि औरस पुत्रांना त्रास देऊ नकोस. आमचा जीवनकाल विनासंकट जावो. आमच्या पाळलेल्या गायी आदि उपयुक्त पशूंच्या बाबतीत तू त्रास देऊ नकोस तसेच आमच्या घोडे आणि हत्ती आदि पशुंना तू त्रास देऊ नकोस. आणि आमच्या हातून नकळत झालेल्या चुकीमुळे तू रागाच्या भरात आमच्या वीर पुरुषांना त्रास देऊ नकोस हविर्द्रव्यांनी आणि नमस्काराने आम्ही तुझी सेवा करू.

७) गोवध आणि पुरुषवध करणाऱ्या तसेच सर्व वीर पुरुष नाहीसे करणाऱ्या हे रुद्रा तुझे अत्यंत भयानक व उग्र असे रुप आम्हांपासून दूर राहू दे. आणि तुझे सुखकर हितकारक जे रुप आहे ते आमच्याजवळ राहूदे तुझ्या दोन शरीरांपैकी घोर म्हणजे भयंकर शरीर हे दूर राहू दे व अघोर म्हणजे कल्याणकारक असे शरीर आमच्या समोर येऊ दे. हे देवाधिदेवा, इतर यजमानापेक्षाहीं आमच्याविषयी इतर देवांकडे तू अधिक शिफारस कर आणि इहपरलोकामध्ये आमचे कल्याण कर.

८) मुमुक्षु भक्त आपल्या मनाला अत्यंत भक्तिभावाने उद्देशून म्हणतो हे मना, तूं विश्वप्रसिद्ध अशा त्या रुद्राची स्तुती कर. हृदयकमलामध्ये सदैव लिंगरुपाने ज्याचा निवास आहे आणि सदाकाल जो तरुण आहे आणि प्रलयकाली हत्तीच्या गंडस्थलावर झडप घालणाऱ्या सिंहाप्रमाणे उग्र असणारा असा तो शिव श्री रुद्र त्याची स्तुती कर. जीवित कालापर्यंत व जीवनकालानंतर मोक्ष प्राप्तीचे चिरंतन सुख देणाऱ्या गुणांनी युक्त असलेल्या रुद्रा क्षणाक्षणाला नाश पावणाऱ्या आमच्या शरिरांना तू सुख दे आणि तुझ्या सेना, आमच्या विरोधकांचा निःपात करू दे.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

परिणो रुद्रस्य हेतिर्वृणक्तु परि त्वेषस्य दुर्मतिरघायोः ।
अव स्थिरा मघवद्भ्यस्तनुष्व मीढवस्तोकाय तनयाय मृडय ॥ ९

मीढुष्टम शिवतम शिवो नः सुमना भव ।
परमे वृक्ष आयुधं निधाय कृत्तिं वसान आचर पिनाकं बिभ्रदागहि ॥ १०

विकिरिद विलोहित नमस्ते अस्तु भगवः ।
यास्ते सहस्रङ्हेतयोऽन्यमस्मन्निवपन्तु ताः ॥ ११

---

९) हे रुद्रा तुझ्या आयुधापासून आम्हांला व पुत्रपौत्रादिकांना कोणताही त्रास होऊ नये. रागाने तप्त झालेल्या आणि प्रहार करू इच्छिणाऱ्या तुझी जी उग्र बुद्धि आहे तिच्यापासून आणि शत्रुंचा नाश करण्याची जी तुझी निश्चयात्मक बुद्धि आहे तिच्यापासूनहि आम्हांला दूर ठेव. हविर्लक्षण असे जे अन्न त्यांनी युक्त असलेल्या यजमानांचे रक्षण कर आणि भक्तांच्या कामना पुऱ्या करणाऱ्या हे देवा सदाशिव, आमच्या पुत्रांना आणि पौत्रांना तू सुख दे.

१०) भक्तमनोरथ पूर्ण करणाऱ्या रुद्रा, शांत व मंगल स्वरुप असणाऱ्या रुद्रा, तू पुत्रपौत्रादि आमच्याहि बाबतीत तसाच कल्याण-कारक व प्रेमभरित अंतःकरणाचा हो, आणि तुझी त्रिशूळ वगैरे आयुधे ही अत्यंत उंच व मोठ्या अशा एखाद्या वडाच्या झाडावर अथवा पिंपळाच्या झाडावर ठेव. आम्हांस दिसणार नाहीत अशी ठेव. आणि नंतर केवळ व्याघ्रचर्म परिधान करुन दोरी विरहित धनुष्य धारण करून आमच्याजवळ ये. बाण वगैरे बाजूला ठेव. केवळ शोभा म्हणूनच धनु-र्धारी बनून तू आम्हांला दर्शन दे.

११) भक्तांना इष्टानुसार धनधान्य आदि संपत्ती देणाऱ्या आणि अर्धभाग नीलवर्ण व अर्धभाग गौरवर्ण असणाऱ्या आणि षड्गुणैश्वर्य-संपन्न असणाऱ्या हे भगवता. रुद्रा, तुला आमचा नमस्कार असो तुझी जी असंख्य आयुधे आहेत ती आम्हांस सोडून आमच्या विरोधकांवर जाऊन प्रहार करू देत.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सहस्त्नणि सहस्त्रधा बाहुंवोस्तव हेतयः ।
तासामीशानो भगवः पराचीना मुखा कृधि ।। १२

१२) हे रुद्रा, तुझ्या हातात धनुष्य खड्ग त्रिशूळ आदि जी अगणित आयुधे आहेंत त्यापैकी प्रत्येक आयुध हजार प्रकारचे आहे अशी असंख्य आयुधे तुझ्या ह तात आहेंत. हे षड्गुणैश्वर्य संपन्न अशा भगवंता, तू समर्थ असल्यामुळे त्या आयुधांची टोके आमच्यापासून दूर कर, आमच्यापासून तुझी सर्व आयुधे तू पराङमुख कर.

अथ ऐकादशोऽनुवाकः

ॐ सहस्त्राणि सहस्त्रशो ये रुद्रा अधि भूम्याम् ।
तेषाङुसहस्त्रयोजनेऽव धन्वनि तन्मसि ।। १
अस्मिन्महत्यर्णवेऽन्तरिक्षे भवा अधि तेषाँ ० ।। २
नीलग्रीवाा शितिकण्ठाः शर्वा अधःक्षभाचराः तेषां । ३

अर्थ १) या पृथ्वी तलावर जे हजारो अनंत रेणुक, दारुक, घंटाकर्ण धेनूकर्ण, विश्वकर्ण, वीर नंदी भृंगी, वृषभ, स्कंद शैलाद इत्यादि विविध जातीचे सर्वसमर्थ रुद्रगण आहेत. रुद्रस्वरुपाने वावरणारे श्री सांबसदाशिवाचे सृष्टिनियमनाकरितां जे अज्ञाधारक त्यांची असंख्य अपरिमित धनुष्ये आहेत. ती आमच्यापासून हजारो योजने दूर ठेव व धनुष्याच्या दोऱ्या काढून ठेव अशी आम्ही स्तुती नमस्कारांनी प्रार्थना करतो.

२) या महान् समुद्रामध्ये आणि समुद्रसदृश आकाशांत असणारे जे अधीश्वर रुद्र आहेत त्या रुद्रांची धनुष्गे आमच्यापासून हजारो योजने दूर ठेव व धनुष्याच्या दोऱ्या काढून ठेव अशी आम्ही स्तुती नमस्कारांनी प्रार्थना करतो.

३) नीलग्रीवाः म्हणजे नीलकंठ व शितिकंठाः म्हणजे गौरवर्णाचे असे पाताळांत संचार करणारे जे रुद्र आहेत त्यांची धनुष्ये आमच्या पासून हजारो योजने दूर ठेव व धनुष्याच्या दोऱ्या काढून ठेव अशी आम्ही स्तुती नमस्कारांनी प्रार्थना करतो.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नीलग्रीवाः शितिकण्ठा दिवङ्रुद्रा उपश्रिताः । तेषां । ४
ये वृक्षेषु सस्पिञ्जरा नीलग्रीवा विलोहिताः । तेषा० । ५
ये भूतानामधिपतयो विशिखासः कपर्दिनः । तेषा० । ६
ये अन्नेषु विविध्यन्दि पात्रेषु पिबतो जनान् । तेषा० । ७

---

४) नीलकंठ आणि गौर वर्णाचे जे रुद्र इंद्रादि देवतांच्या आमत्रणावरुन स्वर्गात राहतात त्यांची धनुष्ये आमच्यापासून हजारो योजने दूर ठेव व धनुष्याची दोरी काढून ठेव अशी आम्ही स्तुती नमस्कारांनी प्रार्थना करतो.

५) ज्याप्रमाणें पृथ्वीतलावर, आकाशात, पाताळात आणि स्वर्गात इत्यादि सर्व लोकामध्ये कांही रुद्र राहतात तसेच कांही रुद्र वृक्षावरही राहतात त्यातील जे कांही रुद्र कोवळ्या गवताप्रमाणे पिंगट वर्णाचे आणि नीलकंठाचे व गौरवर्णाचे आहेत त्यांची धनुष्ये आमच्यापासून हजारो योजने दूर ठेव व धनुष्याच्या दोऱ्या काढून ठेव अशी आम्ही स्तुती नमस्कारांनी प्रार्थना करतो.

६) प्राणिमात्रांच्या शरिरातून अनिसूक्ष्म रुपाने प्रवेश करून जे जंतु त्यांना उपद्रव देतात त्यांचा निःपात करून सर्वांना सुख देऊन कल्याण करणारे अधिपती असे जे रुद्र आहेत त्याच्यामध्ये जे कांही लीलामात्राने मुंडितकेश तर कांही जटाजूटधारी आहेत अशा रुद्रांची धनुष्ये आमच्यापासून हजारो योजने दूर ठेव आणि धनुष्याच्या दोऱ्या काढून ठेव अशी आम्ही स्तुती नमस्कारांनी प्रार्थना करतो.

७) जे रुद्र खाद्यादि सर्व भोज्य पदार्थामध्ये गूढ रुपाने राहून आहाराचा न्यूनातिरेक झाला असताना अस्वास्थ्य निर्माण करून शैल्य वातादि विविध रोग निर्माण करतात व अशा रीतीने अत्याहाराचे प्रायश्चित लोकांना देतात आणि असावधपणे कसे तरी दूध, जल इत्यादि द्रव पदार्थ पितात त्यांनाही याच स्वरुपानें प्रायश्चित देणारे जे रुद्र आहेत त्यांची धनुष्ये आमच्यापासून हजारो योजनें दूर ठेव आणि धनुष्याच्या दोऱ्या काढून ठेव अशी आम्ही स्तुती नमस्कारांनी प्रार्थना करतो.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ये पथां पथि रक्षय ऐलवृदा यव्युधः । तेषा० । ८

ये तीर्थानि प्रचरन्ति सृकावन्तो निषङ्गिणः । तेषा० । ९

ये वनान्युपसर्पंति तेभ्यो वृष्टिरुदायते । तेषा० ।

ये ग्राम्यानुपसर्पंति तेभ्यो व्युष्टिमुपासते । तेषा० ।

ये एतावन्तश्च भूयाङ्सश्च दिशो रुद्रा वितस्थिरे । तेषा० । १०

---

८) वैदिक तांत्रिक, वैदिक तांत्रिक, तांत्रिक वैदिक आणि लौकिक जे निरनिराळे मार्ग आहेत त्यांचे म्हणजे त्या मार्गाने जाणाऱ्या लोकांचे रक्षण करणारे रुद्र आणि ऐलवृदरुद्र म्हणजे सन्मार्गवर्ती अशा भक्तांच्या रक्षणार्थ अन्न प्रदान करणारे रुद्र व यव्युध म्हणजे सद्-भक्तांची भीती नाहीशी करून भक्तरक्षणार्थ शत्रुंचा नाश करणारे असे जे रूद्र आहेत त्यांची धनुष्ये आमच्यापासून हजारो योजने दूर ठेव व धनुष्याच्या दोऱ्या काढूण ठेव अशी आम्ही स्तुती नमस्कारांनी प्रार्थना करतो

९) जे रुद्र काशी केदार श्रीशैल रामेश्वर इत्यादि तीर्थ क्षेत्री पवित्र स्नान करणाऱ्या भक्तांचे रक्षण करण्याकरतां त्या त्या क्षेत्रांत संचार करतात व हातात खड्ग, नंगी तलवार धारण करून जे संचार करतात अशा रुद्रांची धनुष्ये आमच्यापासून हजारो योजने दूर ठेव व धनुष्याच्या दोऱ्या काढून ठेव अशी आम्ही स्तुती नमस्कारांनी प्रार्थना करतो.

१०) आतापर्यंत अनेक मंत्रानी वर्णन केलेले विविध प्रकारचे जे रुद्र आहेत आणि दशदिशामध्ये वास्तव्य करुन राहिलेले अगणित अपरिमित व असंख्य असे जे रुद्र आहेत त्या सर्वांची धनुष्ये आमच्यापासून हजारो योजने दूर ठेव आणि धनुष्याच्या दोऱ्या काढून टेंव अशी आम्ही स्तुती नमस्कारांनी प्रार्थना करतो.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमो रुद्रेभ्यो ये पृथिव्या येषामन्नं मिषवस्तेभ्यो ।

दश प्राचीर्दश दक्षिणा दश प्रतीची र्दशोदीचोर्दशोर्ध्वास्तेभ्यो ।

नयस्ते नो गृडयन्तु तेयं द्विष्मो यन्च नो द्वेष्टि तं वो जम्भे दधामि । ११

---

११) अनंतकोटी ब्रम्हांडे आहेत, पैकी पृथ्वी, अंतराळ, स्वर्ग या तीन विभागांच्या तीन प्रकारामुळे तीन यजुर्मंत्र यात आहेत. नमो रुद्रेभ्यो ये पृथिव्याम् येषाम् मूअन्न इषवः हा एक मंत्र. ये अंतरिक्षे येषम् वात इषवः हा दुसरा मंत्र. ये दिवि येषम् वर्षमिषवः हा तिसरा मंत्र. अशा या तिन्ही मंत्राशी मिळून दश प्राचीः हा पुढील मंत्र संबंधित होतो. जे रुद्र पृथ्वीतलावर राहून अन्नरुपी बाणाने वाजवीपेक्षा जास्त कमी अन्न खाणारे किंवा अन्नाकरिता चोरी करणारे व त्यासाठो प्रसंग-विशेषी दुसऱ्यांचा खून देखील करणारे असे जे लोक आहेत त्यांना या अन्नरुपी बाणाने शुद्धीवर ताळ्यावर आणणारे व जे रुद्र अंतराळात राहून वायुरुप बाणाने प्राणीमात्रामध्ये नाना प्रकारचे रोग निर्माण करून त्यांना शिक्षा करणारे, तसेच जे रुद्र स्वर्गात राहून पर्जन्यरूप बाणानें दुराचारी लोकांना केव्हां पर्जन्यातिरेकाने तर केव्हा पर्जन्या-भावाने शासन करणारे असे हे तीन प्रकारचे रुद्र आहेत. अन्नेषु रुद्र, वातेषु रुद्र आणि वर्षेषु रुद्र अशा या त्रिविध रुद्रांना आम्ही दश प्राचीः म्हणजे पूर्वेला दोन्ही हात जोडून दहा अंगुली सरळ करून नमस्कार करतो. त्याचप्रमाणे दश दक्षिणा दक्षिणेलाही तसाच नमस्कार करतो. दश प्रतीचीः पश्चिमेलाही तसाच आणि उत्तरेलाही तसाच नम-स्कार करतो. पुर्वेला दोन्ही हातांची अंजली केली म्हणजे दोन्ही हातांची मिळून दहा बोट हा पूर्वाग्र होतात. त्याप्रमाणे दक्षिण, पश्चिम उत्तर समजावी. अशा विशिष्ठ पद्धतीने वरील सांगितलेल्या तीन प्रकारच्या रुद्रांना आमचा नमस्कार असो. आमच्या नमस्काराने प्रसन्न झालेले रुद्र आम्हांला सुख देवोत आणि जे अकारण आमचे विरोधक आहेत त्यांचा आम्ही मनापासून द्वेश करतो. आणि जे आम्ही कांहीही केले नसताना सुद्धां आम चा मनापासून द्वेश करतात त्या विरोधकांना, शत्रूंना हे रुद्रांनो, तुमच्या जंभ म्हणजे पसरलेल्या जबड्यात ठेवून देतो.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमो रुद्रेभ्यो येऽन्तरिक्षे येषां वात इषवस्तेभ्यो दश प्राचीर्दश
नमो रुद्रेभ्यो ये दिवि येषां वर्षमिषवस्तेभ्यो । दश प्राचीर्दश
नमो रुद्रेभ्यो ये पृथिव्यां येऽन्तरिक्षे ये दिवि येषामन्नं
वातो वर्षमिषवस्तेभ्यो । दश प्रचीर्दश ।

दक्षिणा दश प्रतीची देशोदीची देशोर्ध्वोस्तेभ्यो नमस्ते नो मृडयन्तु ते यं द्विष्मो यश्च नो व्देष्टि तं वो जम्भे दधामि ॥

सर्वो वै रुद्रः सन्महो नमो नमः । विश्वं भूतं भुवनं चित्रं बहुधा जातं जायमानं च यत् । सर्वो ह्येष रुद्राय नमो अस्तु ।

कद्रुद्राय प्रचेतसे मीढुष्टमाय तव्यसे । वो चेम शंतमङ्ग्हृदे सर्वो ह्येष रुद्रस्तस्मै रुद्राय नमो अस्तु । नमो हिरण्यबाहवे हिरण्य-वर्णायहिरण्यरूपाय हिरण्यपतयेऽबिकापतय उमापतये पशुपतये नमो नमः ॥

ॐ सद्यो जातं प्रपद्यामि सद्यो जाताय वै नमो नमः ।
भवे भवे नातिभवे भवस्त मां भवोभ्दवाय नमः ॥

ॐ वामदेवाय नमो ज्येष्ठाय नमः श्रेष्ठाय नमो रुद्राय नमः कालाय नमः कलविकरणाय नमो बलाय नमो बलविकरणाय नमो बलप्रमथनाय नमः सर्वभूतदमनाय नमो मनोन्मनाय नमः ॥

ॐ अघोरेभ्योऽथ घोरेभ्यो घोरघोरतरेभ्यः । सर्वेभ्यः सर्वशर्वेभ्यो नमस्ते अस्तु रुद्ररूपेभ्यः ॥

ॐ तत्पुरुषाय विद्महे महादेवाय धीमहि तन्नो रुद्रः प्रचोदयात् ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ॐ ईशानः सर्वविद्यानामीश्वरः सर्व भूतानां ब्रह्माधिपतिर्ब्रह्मणो-
धिपतिब्रह्मा शिवो मे अस्तु सदाशिवोम् ॥

ॐ त्र्यंबकं यजामहे सुगंधि पुष्टिवर्धनं । उ-र्वा-रु-कमि-व बंधनान्मृत्योर्मुक्षीय मा मृतात् ॥ ऋतङ्सत्यं परं ब्रह्म पुरुषं कृष्णपिंगलं । ऊर्ध्वरे तं विरूपाक्षं विश्वरूपाय वै नमो नमः ॥ यो रुद्रो अग्नौ यो अप्सु य ओषधीषु यो रुद्रो विश्वा भुवनानि विवेश तस्मै रुद्राय नमो अस्तु । एष ते रुद्र भागस्तं जुषस्व तेनावसेन परो मू जवतोतीह्यवततधन्वा पिनाकहस्तः कृत्तिवासाः ॥ तमुष्टुहि यः स्विषुः सुधन्वा यो विश्वस्य क्षयति भेषजस्य । यक्ष्वामहे सौमनसाय रुद्रं नमो भिर्देवमसुरं दुवस्य ॥

॥ ॐ शांतिः शांतिः शातिः ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

— चमक विभागः —

अथ प्रथमोऽनुवाकः

ॐ अग्नाविष्णू सजोषसेमा वर्धन्तु वां गिरः । द्युम्नैर्वाजे भिरागतस् । वाजश्च मे प्रसवश्च मे प्रयतिश्च मे प्रसितिश्च मे धीतिश्च मे क्रतुश्च मे स्वरश्च मे श्लोकश्च मे श्रावश्च मे श्रुतिश्च मे ज्योतिश्च मे सुवश्च मे प्राणश्च मेऽपानश्च मे व्यानश्च मेऽसुश्च मे चित्तं च म आधीतं च मे वाक्च मे मनश्च मे चक्षुश्च मे श्रोत्रं च मे दक्षश्च मे बलं चम ओजश्च मे सहश्च म आयुश्च मे जरा च म आत्मा च मे तनूश्च मे शर्म च मे वर्म च मेऽङ्गानि च मेऽस्थानि च मे परुꣳषि च मे शरीराणि च मे ॥ १ ॥

चमक विभाग

रुद्राध्यायातील 'नमक' विभागाचे (अकरा अनुवाकांचे महत्वाचे) विवेचन आतापावेतो केलेले आहे आता चमक विभागाचे विवेचन सुरू होणार असून त्यामधील अकरा अनुवाक मिळून एक मंत्र होतो. या व पुढील अनुवाकामध्ये जो 'चकार' आलेला आहे तो समूदायवाचक म्हणून आला आहें व 'मे' या शद्बाचा अन्वय दहाव्या अनुवाकामध्ये आलेल्या 'कल्पताम्' या पदाशी आहे. मे कल्पताम् म्हणजे मला प्राप्त होवो असा भावार्थ आहें.

हे अनलपद्मनाभ म्हणजे अग्नाविष्णू, तुम्ही दोघे परस्पर प्रितियुक्त व्हा. तुमचे परस्परावर प्रेम राहो. आम्ही करीत असलेल्या तुमच्या स्तुतीनें आमची वाणी समृद्ध होवो आमच्या वाणींना पावित्र्य आणि मांगल्य प्राप्त होवो. आपण दोघे धनधान्यादि समृद्धीसह सुवर्णदिसंपत्तीयुक्त असे होऊन येथे या.

अनुवाद पहिला

वाजः म्हणजे अन्न. प्रसव म्हणजे अनुज्ञा. प्रयति म्हणजे अन्नशुद्धी. प्रसितिः म्हणजे अन्नाविषयी उत्सुकता. धीति म्हणजे अन्न पचविण्याची

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शक्ति, ऋतु म्हणजे अन्नाला कारणीभूत असणारा होम. स्वर म्हणजे मंत्रगत–उदात्त–अनुदात्तस्वर. श्लोक म्हणजे कीर्ति. श्राव: म्हणजे ऐकण्याची शक्ति. श्रुति: म्हणजे ऐकण्याची शक्ति. ज्योति: म्हणजे तेज. सुव: म्हणजे स्वर्गसुख. प्राण म्हणजे हृदयात असणारा वायू. अपान म्हणजे गुदवृत्ती वायू. व्यान म्हणजे शरिरांतील सर्वभागी असणारा वायू. असु: म्हणजे मनोजन्य ज्ञान. चित्तं म्हणजे अंतरिंद्रिय. आधीतं म्हणजे ज्ञानविषयक पदार्थसमूह. वाक् म्हणजे शद्ब व्यवहारास कारणीभूत कर्मेंद्रिय. मन: म्हणजे अंतर्यामातील प्रशस्थपणा. चक्षु: म्हणजे रुपग्राहक ज्ञानेंद्रिय म्हणजे डोळा. श्रोत्रं म्हणजे शद्बग्राहक म्हणजे कान. दक्ष म्हणजे ज्ञानेंद्रियामधील निपुणता. बल म्हणजे कर्मेंद्रियाचे सामर्थ्यं. ओज म्हणजे सामर्थ्याचा मुख्य आधारस्तंभ. सह: म्हणजे क्षमाशक्ति अथवा संयमनसामर्थ्य. आयु: म्हणजे जीवितकाल. जरा म्हणजे दीर्घायुष्य. आत्मा म्हणजे ज्ञानाधार अथवा ज्ञानस्वरुप आत्मा. तनु: म्हणजे आत्म्याला आधार असलेला सुख दु:ख भोगण्यास साधन असलेला, रेखीव अवयवाने बांधाशुद्ध असलेला, आणि लावण्याचे वैभव असलेला देह. शर्म म्हणजे सुख. वर्म म्हणजे शरिराचे रक्षण करणारे कवच. अंगानि म्हणजे हातपादादि संपूण अवयव. अस्थानि म्हणजे त्या त्या स्थानात यथासुंदर असणारी हाडे. परुंषि म्हणजे बोटांची पेरे. शरिराणी म्हणजे शरिरातील सर्व अवयव. हे सर्व–मे कल्पताम्– तुझ्या कृपेने मला यथास्थित प्राप्त होवोत.

अथ द्वितीयोऽनुवाक:

ॐ ज्यैष्ठ्यं च म आधिपत्यं च मे मन्युश्च मे भामश्च मेऽमश्च मेऽम्भश्च मे जेमा च मे महिमा च मे वरिमा च मे प्रथिमाच मे वर्ष्मा च मे द्राघुयामे च वृद्धं च मे वृद्धिश्च मे सत्यं च मे श्रद्धा च मे जगच्च मे धनं च मे वशश्च मे त्विषिश्च मे क्रीडा च मे मोदश्च मे जातं च मे जनिष्यमणं च मे सुक्तं च मे सुकृतं च मे वित्तं च वेद्यं च मे भूतं च मे भविष्यच्च मे सुगं च मे सुपथ च म ऋद्धं च मे ऋद्धिश्च मे क्लृप्तं च मे क्लृप्तिश्च मे मतिश्च मे सुमतिश्च मे ॥ २ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अनुवाद दुसरा

अर्थ–ज्येष्ठ म्हणजे श्रेष्ठता. आधिपत्य म्हणजे स्व मित्व. मन्यु म्हणजे मन. भामः म्हणजे दुराचाराविषयी क्रोध. अमः म्हणजे गणना करण्याला अशक्य अशा धनराशी. अंभः म्हणजे शैत्य आणि माधुर्ययुक्त निर्मल व पवित्र असे पाणी. जेमा म्हणजे जिंकण्याचे सामर्थ्य. महिमा म्हणजे शत्रूंना जिंकून आणलेली कीर्ति व संपत्ति. वरिमा म्हणजे पूज्यत्व. प्रथिमा म्हणजे घर शेती इत्यादि संपत्तिचा विस्तार. वर्ष्मा म्हणजे आरोग्यविशिष्ठ असे शरीर. द्राघुया म्हणजे जीवितकालाचे दीर्घत्व. वृद्धम् म्हणजे अन्न आणि धन यांची वृद्धि. वृद्धि म्हणजे विद्यादि गुणांनी होणारा उत्कर्ष. सत्य म्हणजे यथार्थ भाषा. श्रद्धा म्हणजे परलोक आहे अशी आस्तिक बुद्धी. जगत् म्हणजे स्थावर जंगम संपत्ति. धनम् म्हणजे सुवर्णादि. वशः म्हणजे सर्वस्वाधीनत्व. त्विषिः म्हणजे शरीरकांती. क्रीडा म्हणजे सोंगटे, जुगार, फांसे वगैरे. मोह म्हणजे त्या खेळापासून निर्माण होणारा आनंद. जातम् म्हणजे प्रथम झालेली संतति. जनिष्य-माणं म्हणजे त्यानंतर होणारी संतत्ति. सूक्तं म्हणजे वेदांतील ऋचांचा समूह. सूक्तं म्हणजे अपूर्व पुण्य. वित्तं म्हणजे पूर्वी संपादन केलेले द्रव्य. वेद्यम् म्हणजे भविष्य काळांत मिळविले जाणारे द्रव्य. भूतं म्हणजे वडिलार्जित किंवा स्वतःच्या पूर्व पुण्याईने मिळालेले ऐश्वर्य. भविष्यत् म्हणजे भविष्य काळात मिळविले जाणारे ऐश्वर्य. सुगं म्हणजे सुखाने वावरण्यास योग्य असे स्नेही सोबती, बंधुजन स्थान. सुपथं म्हणजे निष्कंटक आणि चोरांची भीति नसणारा मार्ग, ऋद्धं म्हणज्रे अनुष्ठित समृद्ध कर्माचे फल. ऋद्धि म्हणजे पुढे अनुष्ठान केल्या जाणाऱ्या पूजाचे फलाधिक्य. क्लृप्तं म्हणजे आपले कार्य पूर्ण करण्यास आवश्यक असे धन. क्लृप्तिः म्हणजे स्वतःचे शक्तीसासर्थ्य. मतिः म्हणजे अर्थ निर्धाराने ओळखण्याचे सामर्थ्य, सुमति म्हणजे अत्यंत दुर्घट अशी कार्ये पूर्ण करण्याची शक्ती. हे सर्व–मे कल्पताम् तुझ्या कृपेने मला यथास्थित प्राप्त होवोत.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अथ तृतीयोऽनुवाकः

ॐ शं च मे मयश्च मे प्रिय च मेऽनुकामश्च मे कामश्च मे सौम नसश्च मे भद्रं च मे श्रेयश्च वस्यश्च मे यशश्च मे भगश्च मे द्रविणं च मे यन्ता च मे धर्ता च मे क्षेमश्च मे धृतिश्च मे विश्वं च मे महश्च मे संविच्च मे ज्ञात्रं च मे सूश्च मे प्रसूश्च मे सीरं च मे लयश्च म ऋतं च मेऽमृत च मे यक्ष्मं च मेऽनामयच्च मे जीवातुश्च मे दीर्घायुत्वं च मेऽनमित्रं च मेऽभवं च मे सुगं च मे शयन च मे सूषा च मे सुदिनं च मे ॥ ३ ॥

अनुवाक तिसरा

अर्थ– शाम् म्हणजे ऐहिक सुख. मयः म्हणजे स्वर्गादि परलोक सुख. प्रिय म्हणजे हर्षाला करणीभूत होणारी वस्तु. अनुकाम म्हणजे म्हणजे अनुकूल असा अपेक्षिला जाणारा पदार्थ. काम म्हणजे स्वर्गात मिळणारे फल. सौमनसः म्हणजे मनाला स्वास्थ देणारा हितचिंतक व प्रिय असा बंधूवर्ग. भद्रं म्हणजे ऐहिक कल्याण. श्रेयः म्हणजे पारलौकिक कल्याण. वस्य म्हणजे वसतियोग्य झोपडी घर प्रासाद वगैरे. यशः म्हणजे कीर्ति. भगः म्हणजे ऐश्वर्य, द्रविणम् म्हणजे धन. यता म्हणजे नियामक शिक्षक आचार्य उपाध्याय वगैरे. धर्ता म्हणजे पालन करणारे पिता वगैरे. क्षेमः म्हणजे आपल्या संपत्तीचे रक्षण करण्याची शक्ति, कुशलता धृतिः म्हणजे संकटकालातही न सुटणारे धैर्य. विश्वं म्हणजे सर्व लोकांची अनुकूलता. महः म्हणजे पूजामहोत्सव. संवित् म्हणजे निगमागम रहस्यज्ञान ज्ञात्र म्हणजे दुसऱ्याला समजावून देण्याची शक्ति. सूः म्हणजे पुत्रपौत्रादिकांना प्रसंगोचित प्रेरणा देण्याचे सामर्थ्य. प्रसु म्हणजे सेवक व नौकरादि लोकांकडून काम करून घेण्याचे सामर्थ्य. सीरम् म्हणजे शेतीची साधने नांगर इत्यादि. लयः म्हणजे शेती करीत असताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याचे सामर्थ्य. ऋतं म्हणजे अमृतम् म्हणजे परब्रह्मरुप शिवलिंग पूजादि क्रिया त्या क्रियेचे फल अर्थात् मोक्ष. अयक्ष्मम् म्हणजे क्षयादि रोगराहित्य. अनामयत् म्हणजे ज्वरादि सामान्य रोगराहित्य. जीवातुः म्हणजे जीवनोपयुक्त औषध.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दीर्घायुत्वम् म्हणजे भय दीर्घायुष्याचा लाभ. अनमित्रम् म्हणजे शत्रू नसणे. अभयम् म्हणजे भय नसणे. सुगम् म्हणजे सर्व सज्जनांकडून अनुकरण केले जावे असे. शयनम् म्हणजे पलंग, खाट, गाद्यागिरद्या वगैरे झोपण्याची समृद्ध साधने. सूषा म्हणजे स्नान शिवपुजा इत्यादि नित्यकृत्यादि शुभ कर्मांनी सुरु होणारा रमणीय प्रभात काल. सुदिनम् म्हणजे शिवपूजादि पंचयज्ञ विशिष्ठ अशा शिवयोगी आदि सज्जनांच्या भोजन दानादि मंगलकार्यविशिष्ठ असा संपूर्ण दिवस हे सर्व कल्पताम्– तुझ्या कृपेनें मला यथास्थित प्राप्त होवोत.

अथ चतुर्थोऽनुवाकः

ॐ ऊर्क्वं च मे सूनृता च मे पयश्च मे रसश्च मे घृतं च में मधु च मे सग्धिश्च मे सपीतिश्च मे कृषिश्च मे वृष्टिश्च मे जैत्रं च म औभ्दिद्यं च मे रयिश्च मे रायश्च मे पुष्टं च मे पुष्टिश्च मे विभु च मे प्रभु च मे बहु च मे भूयश्च मे पूर्ण च मे पूर्णतरं च मेऽक्षितिश्च मे कूयवाश्च मेऽन्नं च मेऽक्षुच्च मे व्रीह यश्च मे यवाश्च मे माषाश्च मे तिलाश्च मे मुग्दाश्च मे खल्वाश्च मे गोधूमाश्च मे मसुराश्च मे प्रिमङगवश्च मेऽणवश्च मे श्यामाकाश्च मे नीवाराश्च मे ॥ ४ ॥

अनुवाक चौथा

ऊर्क म्हणजे सामान्य अन्न. सूनृता म्हणजे हितोक्ति. पयः म्हणजे दूध. रसः म्हणजे दुधांतील सार, लोणी घृतं म्हणजे तूप. मधु म्हणजे मध. सग्धिः म्हणजे आप्तेष्ट बंधू मित्र इत्यादिसह भोजन. सपीतिः म्हणजे आप्तेष्ट बंधू मित्र इत्यादिसह पान. कृषि म्हणजे शेती. वृष्टि म्हणजे पाऊस. जैत्रं म्हणजे पेरलेले धान्य वगैरे चांगल्या रितीने फल देणारी सुभूमि. औद्भिद्यम् म्हणजे भूमि फांकून उत्पन्न होणारे वृक्षलता आदिंचा समूह. रयिः म्हणजे सुवर्ण आदि सर्व तऱ्हेची खनिज संपत्ति. रायः म्हणजे मणि रत्नादि संपत्ति. पुष्टं म्हणजे सुवर्णादि तेजस पदार्थांची समृद्धि. पुष्टिः म्हणजे पुष्टिकर देहारोग्य संपत्ति. विभु प्रभु बहु भूयः

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पूर्णम् पूर्णतरम् क्षित: म्हणजे उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणांतील धान्याची वृद्धि. कूयवा म्हणजे हलके जवधान्य जाणण्याची दृष्टि. अन्नम् म्हणजे क्षुधा तृप्तीकारक साधन. अक्षुत् म्हणजे क्षुधा परिहारक साधन. व्रीहि: म्हणजे साळी, भात. यवा: म्हणजे जव, सातू. माषा: म्हणजे उडीद. तिल: म्हणजे तीळ. मुद्‌ग: म्हणजे मूग. खल्वा: म्हणजे हरभरे. गोधूमा: म्हणजे गहू. मसूरा: म्हणजे मसूर. प्रियंगव: म्हणजे राळे. अणव: म्हणजे बारीक तांदळाची साळी. शामक म्हणजे सावा. नीवार म्हणजें अरण्यात होणारी तृण धान्यविशेषे. ही सर्व धनधान्ये माझ्या घरी विपुल प्रमाणांत निरंतर–मे कल्पताम्–तुझ्या कृपेने मला यथास्थित प्राप्त होवोत.

अथ पंचमोऽनुवाक:

ॐ अश्मा च मे मृत्तिका च मे गिरयश्च मे पर्वताश्च मे सिकताश्च मे वनस्पतयश्च मे हिरण्यं च मेऽयश्च मे सीसं च मे त्रपुश्च मे श्यामं च मे लोहं च मेऽग्निश्च मे आपश्च मे वीरुधश्च मे ओषधयश्च मेऽकृष्टपच्यं च मे ग्राम्याश्च मे पशव आरण्याश्च यज्ञेन कल्पन्तां वित्तं च मे वित्तिश्च मे भूतं च मे भूतिश्च मे वसु च मे वसतिश्च मे कर्म च मे शक्तिश्च मेऽर्थश्च मे एमश्च मे इतिश्च मे गतिश्च मे ॥ ५ ॥

अनुवाक पांचवा

अश्मा म्हणजे घर, देवालय, मूर्ती इत्यादिकरता उपयुक्त दगड. मृत्तिका म्हणजे त्यास उपयुक्त अशी माती. गिरय: म्हणजे सामान्य डोंगर. पर्वत: म्हणजे मोठे उंच डोंगर. सिकता: म्हणजे नदीतीरी असणारी वाळू. वनस्पतय: म्हणजे पुष्पाशिवाय फल देणारे उंबर आदि वृक्षें. हिरण्यं म्हणजे देवतास व सत्पात्रांना दान देण्यास योग्य असे सुवर्ण. अय: म्हणजे सामान्य लोखंड सीसम् म्हणजे शिसे. त्रपु: म्हणजे कथील. शामक म्हणजे काळे लोखंड. लोहम् म्हणजे तांबे, कासे. अग्नि: म्हणजे शैवाग्नि. आप: म्हणजे मधुर निर्मल व पवित्र असे पाणी. वीरुध: म्हणजे पेरे नसलेल्या वेलो. ओषधय: म्हणजे ज्योतिर्लता. कृष्टपच्यं

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

म्हणजे नांगरादि उपकरणांनी स्वच्छ केल्यानंतर पिकणारी भूमी. ग्राम्या: म्हणजे गावात जन्मलेलें पशु. आरण्या: म्हणज अरण्यांत जन्मलेले पशु. यज्ञेन कल्पताम् म्हणजे यज्ञाच्या निमित्ताने समर्थ असे. वित्तम् म्हणजे पूर्वप्राप्तऐश्वर्य. वित्ति: म्हणजे पुढे प्राप्त होणारे ऐश्वर्य भूतम् म्हणजे संपतशाली पुत्रपौत्रादि संतान. भूति: म्हणजे स्वत:चे ऐश्वर्य. वसु म्हणजे उपभोगसाधन गायी इत्यादि धन. वसति: म्हणजे निवास योग्य घर वगैरे. कर्म म्हणजे निरपेक्ष बुद्धीने केले जाणारे शिवपूजादि शक्ति: म्हणजे शिवपूजादि कर्म करण्याची शक्ति अर्थ: म्हणजे फलविशेष एम: म्हणजे पुढे लाभणारे सुख. इति: इष्ट प्राप्तीचा उपाय गति: म्हणजे इष्टप्राप्ती. हे सर्व–मे कल्पताम् तुझ्या कृपेने मला यथास्थित प्राप्त होवोत.

अथ षष्ठोऽनुवाक:

ॐ अग्निश्च मे इन्द्रश्च मे सोमश्च म इन्द्रश्च मे सविता च म इन्द्रश्च मे सरस्वती च म इन्द्रश्च मे पूषा च म इन्द्रश्च मे बृहस्पतिश्च म इन्द्रश्च मे मित्रश्च म इन्द्रश्च मे वरुणश्च म इन्द्रश्च मे त्वष्टा च म इन्द्रश्च मे धाता च म इन्द्रश्च मे विष्णुश्च म इन्द्रश्च मेऽश्विनौ च म इन्द्रश्च मे मरुतश्च म इन्द्रश्च मे विश्वे च मे देवा इन्द्रश्च मे पृथिवी च म इन्द्रश्च मेऽन्तरिक्षं च म इन्द्रश्च मे द्यौश्च म इन्द्रश्च मे दिशश्च म इन्द्रश्च मे मूर्धा च म इन्द्रश्च मे प्रजापतिश्च म इन्द्रश्च मे ॥ ६

अनुवाक सहावा

अग्नि: म्हणजे अग्निदेव. सोम: म्हणजे चंद्र. (सोमदेव) सविता म्हणजे सूर्य. सरस्वती म्हणजे वाङमयाचा अधिदेवता, अर्थात् विद्यादेवी पूषा म्हणजे एक प्रकारचा सूर्य विशेष. बृहस्पति:गुरु. मित्र: एक प्रकारचा सूर्य विशेष. वरुण: जलाधिपति. त्वष्टदेवसुतार. धाता - पितामह

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

विष्णू:– विश्वंभर. अश्विनौ - देवधन्वंतरी. मरुत: वायुअधिदेवता. विश्वे-गणदेवता. देव - सर्व देवता पृथिवी - भूदेवता. अंतरिक्षं - आकाशादि दैवत. द्यौ:- स्वर्गीय देवता. दिश:- दिशाधिपती (पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर.) मूर्धा - उर्ध्वदिशा (वरील दिशा). प्रजापति:- सृष्टिकर्ता सृष्टिकर्ता (ब्रह्म) अग्निसोम इत्यादि देवता लोकप्रसिद्ध आहेंतच. यांच्याबरोबर त्रिविध ऐश्वर्याचे प्रतिक म्हणून श्रेष्ठ मानल्या गेलेल्या इंद्रदेवाने यज्ञामध्यें भाग समान भाग धारण केलेमुळे या अनुवाकात इंद्राच्या प्रत्येक देवतेशी संबंध जोडलेला आहे. तसेच दिश: या शद्बानें या अनुवाकांत पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर या दिशा दाखवल्या जातात. मूर्धा या शद्बाने उर्ध्वदिशा म्हणजे सर्व दिशामध्ये प्रमुख मानले गेलेमुळे पृथक दाखवले आहे. या सर्व दिशांचा अधिपती असलेल्या देवांचे य इंद्रदेवतेसह वरील समस्त देवांची अनुकूलता हे सर्व मे कल्पताम्–तुझ्या कृपेने मला यथास्थित प्राप्त होवोत.

अथ सप्तमोऽनुवाक:

ॐ अङ्शुश्च मे रश्मिश्च मेऽदाभ्यश्च मेऽधिपतिश्च म उपाङ्शुश्च मेऽन्तर्यामश्च म ऐन्द्रवायवश्च मे मैत्रावरुणश्च म आश्विनश्च मे प्रतिप्रस्थानश्च मे शुक्रश्च मे मन्थी च म आग्रयणश्च मे वैश्वदेवश्च मे ध्रुवश्च मे वैश्वानरश्च म ऋतुग्रहाश्च मेऽतिग्राह्याश्च म ऐन्द्राग्नश्च मे वैश्वदेवश्च मे मरुत्वतीयाश्च मे माहेन्द्रश्च म आदित्यश्च मे सावित्रश्च मे सारस्वश्च मे पौष्णश्च मे पात्नीवतश्च मे हारियोजनश्च मे ॥ ७

अनुवाक सातवा

अर्थ– अं शु: रश्मि: अदाभ्य:– अंशु आदि देवता सोमग्रह विशेष असून हे सोमप्रकरणांमध्ये प्रसिद्ध आहेत. अधिपति या शद्बानेसुद्धा दधिग्रह असे सांगण्यांत येते. त्याला सर्व ग्रहामध्यें श्रेष्ठत्व असल्यामुळे अधिपती हा शद्ब युक्त आहे. " ज्येष्ठोवा एष ग्रहाणाम् " हे वेदवाक्य यास प्रमाण आहे. उप्पं शु: अंतर्याम: ऐंद्रवायव: मैत्रावरु: आश्विन:

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आदि देवता त्या त्या प्रकरणामध्ये प्रसिद्ध आहेत. प्रतिप्रस्थान या शद्वाने द्विदैवत्य ग्रहाबरोबर त्यांचा प्रतिनिधीही विवाक्षित (सांगण्यास इष्ट असा) आहे. शुक्र. मन्थी आग्रयण: वैश्वदेव: ध्रुव: वैश्वनर: ऋतुग्रहा: अतिग्राह्या: ऐंद्राग्न: वैश्वदेव: आदि देवता त्या त्या प्रकरणामध्यें प्रसिद्ध आहेत. पैकीं ध्रुवग्रहदेवतेच्या अवनभन दशेमध्ये वैश्वानरसूक्ताचा पाठ असल्यामुळे वैश्नार शद्वानें त्यांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. येथें पहिला वैश्वदेव हा शद्व प्रात:काली करण्यांत येणाऱ्या शिवपूजेतील आहे, व दुसरा वैश्वदेव हा शद्व सायंकाळी करण्यांत येणाऱ्या शिवपूजेतील आहे. मरुत्वतिया: महेंद्र: आदित्य: सावित्र: आदि देवता त्या त्या प्रकरणामध्यें प्रसिद्ध आहेत सारस्वत:- सारस्वत ग्रहदेवता अभिषेचनीच नांवाच्या विकृतीमध्यें प्रसिद्ध आहे. पौष्ण:— पौष्णग्रह देवता सुद्धा विकृती मध्येंच प्रसिद्ध आहे. पात्नीवत: हारियोजन: आदि सकल देवतांची अनुकुलता – मे कल्पताम् तुझ्या कृपेने मला यथास्थित प्राप्त होवोत.

अथ अष्टमोऽनुवाक:

ॐ इध्मश्च मे बर्हिश्च मे वेदिश्च मे धिष्णियाश्च मे स्रुचश्च मे चमसाश्च मे ग्रावाणश्च मे स्वरवश्च म उपरवाश्च मेऽधिषवणे च मे द्रोणकलशश्च मे वायव्यानि च मे पूतभृच्च म आधवनीयश्च म आग्नीध्रं च मे हविर्धानं च मे गृहाश्च मे सदश्च मे पुरोडाशाश्च मे पचतश्च मेऽवभृथश्च मे स्वगाकारश्च ॥ ८

अनुवाक आठवा

यज्ञाची अंगभूत द्रव्यें–यज्ञसाधने या अनुवाकात सांगितलेली असून ती यज्ञप्रकरणांत सुप्रसिद्धिच आहेत. इध्म: बर्हि: वेदि: धिष्णिया: स्रुच: चमसा: ग्रावाण: स्वरव: उपरवा: अधिशवणे द्रोणकलश: व्यानव्वानि पूतभृत् आधवनीय: आग्नींध्रं हविधानं इत्यादि यज्ञांगभूत द्रव्यदेवता त्या त्या प्रकरणामध्ये प्रसिद्ध आहेत. गृहा: म्हणजे पत्नी मेहुणा वगैरे.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सदः पुरोडाशाः पचतः म्हणजे शामित्र वगैरे. अवभृथ म्हणजे यज्ञांगक्रीया समाप्तीनंतर शांतीप्रीत्यर्थं केले जाणारे स्नान. हे सर्वत्र प्रसिद्ध आहे. स्वगाकारः म्हणजे शंयुवाकदेवता, त्या त्या देवतांना आज्यादि हविर्भाग पोहोचविण्याचे हे साधन आहे म्हणून यास शंयुवाक म्हटले गेले आहे. तरी अशा वरील सर्व देवतांच्या अनुकूलता—मे कल्पताम्—तुझ्या कृपेनें मला यथास्थित प्राप्त होवोत.

अथ नवमोऽनुवाकः

ॐ अग्निश्च मे धर्मश्च मेऽर्कश्च मे सूर्यश्च मे प्राणश्च मेऽश्व-मेधश्च मे पृथिवी च मेऽदितिश्च मे दितिश्च मे द्यौश्च मे शक्करीरङ्गुलयो दिशश्च मे यज्ञेन कल्पन्तामृक्च मे सामच मे स्तोमश्च मे यजुश्च मे दीक्षा च मे तपश्च म ऋतुश्च मे व्रतं च मेऽहोरात्रयो र्वृष्टचा बृहद्रथन्तरे मे यज्ञेन कल्पेताम् ॥ ९

अनुवाक नववा

अग्निः म्हणजे आज्यादि हविर्द्रव्यांनी चयनसंस्कार केला गेलेला वन्हि. घर्मः म्हणजे प्रवर्ग्य हा शब्द पारिभाषिक आहे, यज्ञ प्रकरणामध्ये याचा संपूर्ण व प्रसिद्ध असा खुलासा आहे. अर्कः या शद्बाचा अर्थ 'इज्ञायर्कवते पुरोडाशम्' या वाक्याने सांगितलेला जो याग तो अर्कयाग सूर्यः म्हणजे 'सोर्यचरु' या वाक्याने केला जाणारा याग तो सूर्ययाग. प्राणः म्हणजे 'प्राणाय स्वाहा' म्हणून आज्यादि हविर्द्रव्यांनी केला जाणारा होम. अश्वमेधः म्हणजे लोकप्रसिद्ध असा क्षात्रयज्ञ. पृथिवी आदितिः दितिः द्यौः हे देवता विशेष आहेत. शक्वरीः अंगुलयः म्हणजे विराट पुरुषाचे अंगुलीसारखे अवयव विशेष. दिशः म्हणजे प्रसिद्ध अशा दाही दिशाः ते म्हणजे माझ्या संबंधी करीत असलेल्या विशेष यज्ञाने त्या त्या दिशादेवता आपापल्या कार्यामध्ये समर्थ होवो व त्या सर्व देवतांची अनुकूलता तुझ्या कृपेने मला यथास्थित प्राप्त होवी. ऋक् म्हणजे ऋग्वेदीयमंत्रविशेष. साम म्हणजे सामवेदीयमंत्रविशेष स्तोमः म्हणजे सामवेदीय आवृत्तीरूप स्तोत्रः यजुः म्हणजे यजुर्वेदीय मंत्रविशेष

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

या सर्व देवता तुझ्या कृपेने मला सदैव अनुकूल होवोत. दीक्षा म्हणजे यज्ञ प्रारंभ होण्यापूर्वी यजमानावर केला जाणारा एक पवित्र असा धार्मिक संस्कार विशेष. तपः म्हणजे पाप नाश होण्यासाठी केली जाणारी अनशन कृच्छादि नियम. ऋतुः म्हणजे यज्ञांगभूत असा काल. व्रतम् म्हणजे आत्मशुद्धीसाठी विशिष्ट नियम मनोनिग्रहानें पालन करणें. अहोरात्रयोः वृष्टया म्हणजे दिवस आणि रात्र यांशी संबंधित असा जो पाऊस व त्याने माझी पिके पुष्पफलादिकांनी समृद्ध होवो. बृहत आणि रथंतर म्हणजे सामवेदीय मंत्रविशेष अर्थात् मंत्रदेवता मी करीत असलेल्यः यज्ञाने–कल्पताम्–म्हणजे तुझ्या कृपेने आपापल्या व्यवहारामध्यें एकरूप होऊन मला अनुकूल होवोत.

अथ दशमोऽनुवाक

ॐ गर्भाश्च मे वत्साश्च मे त्र्यविश्च मे त्र्यवी च मे दित्यवाट् च मे दित्यौही च मे पञ्चाविश्च मे पञ्चावी च मे त्रिवत्सश्च मे त्रिवत्सा च मे तुर्यवाट् च मे तुर्यौही च मे पष्ठवाच्च मे पष्ठौही च म उक्षा च मे वशा च म ऋषभश्च मे वेहश्च मेऽनड्वाञ्च मे धेनुश्च म आयुर्यज्ञेन कल्पतां प्राणो यज्ञेन कल्पतामपानो यज्ञेन कल्पतां व्यानो यज्ञेन कल्पतां चक्षुर्यज्ञेन कल्पताङ् श्रोतं यज्ञेन कल्पतां मनो यज्ञेन कल्पतां वाग्यज्ञेन कल्पतामात्मा यज्ञेन कल्पतां यज्ञो यज्ञेन कल्पताम् १० ॥

अनुवाक दहावा

(गाय व त्याची संतती ही यज्ञांगाची प्रमुख साधनसंपत्ति असल्याकारणाने या अनुवाकामध्यें वेदपुरुषांनी तत्संबंधी विवरण विशेष रुपाने गर्भाः या शद्वापासून केले आहे.) गर्भाः म्हणजे गर्भस्थ (पोटातील) वासरू वत्साः म्हणजे एक वर्षांच्या आंतील कालवड अगर खोड. त्र्यविः म्हणजे दीड वर्षाचा खोंड त्र्यवीं म्हणजे दीड वर्षाची कालवड. दित्यवाट् म्हणजे दोन वर्षाचा खोंड. दित्यौही म्हणजे दोन वर्षाचौ कालवड. पंचाविः म्हणजे अडीच वर्षाचा खोंड. पंचावी म्हणजे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अडीच वर्षाची कालवड. त्रिवत्स म्हणजे तीन वर्षाचा खोंड. त्रिवत्सा म्हणजे तीन वर्षाची कालवड. तुर्यवाट् म्हणजे साडेतीन वर्षाचा खोंड. तुर्यौही म्हणजे साडेतीन वर्षाची कालवड. पष्टवाट म्हणजे चार वर्षांचा बैल. पष्ठौही म्हणजे चार वर्षाची गाय. उक्षा म्हणजे गायीपासून उत्तम संतती निर्माण करण्याकरता पाळलेला वळू. वशा म्हणजे निष्फळ (वांझ) गाय. वृषभः म्हणजे वळूपेक्षा जास्त वयाचा बैल. वेहल् म्हणजे आगांतुक न कळय गर्भाचा घात करणारी गाय. अवनड्न म्हणजे गाडीस जुंपण्यास योग्य असा बैल. धेनुः म्हणजे नवप्रसूता गाय. आयुः म्हणजे जीवित काल. प्राणः म्हणजे प्राणवायू. अपानः म्हणजे गुदस्थ वायु. व्यानः म्हणजे शरीरांतील सर्व भागी व्यापलेला वायू. चक्षूः म्हणजे डोळा. श्रोत्रं म्हणजे कान. मनः म्हणजे मानस वाक् म्हणजे बोलणे. आत्मा म्हणजे शरीरसूत्रधार. यज्ञा म्हणजे शिवरात्र आदि पर्वकाळी अथवा विशेष प्रसंगी केला जाणारा शिवपूजादि यज्ञ. हे सर्व सध्या मी करीत असलेल्या नित्यविधीरूप शिवपूजादि यज्ञानें ते एकः रूपाने स्वकार्यक्षम होऊन मे-कल्पताम्-तुझ्या कृपेने यथास्थित प्राप्त होवोत.

अथ येकादशोऽनुवाकः

ॐ एकाच मे तिस्रश्च मे पञ्च म सप्त च मे नव च म एकादश च मे त्रयो दश च मे पञ्चदश च मे सप्तदश च मे नवदश च म एकविङ् शतिश्च मे त्रयोविङ् शतिश्च मे पञ्चविङ्शतिश्च मे सप्तविङ् शतिश्च मे नवविङ् शतिश्च म एकत्रिङ्शच्च मे यत्रस्त्रिङ्शच्च मे चनस्रश्च मेऽष्टौ च मे द्वादश च मे षोडश च मे विङ्शतिश्च मे चतुर्विङ्शतिश्च मेऽष्टाविङ्शतिश्च मे द्वात्रिङ्शच्च मे षट्त्रिङ्शच्च मे चत्वारिङ्शच्च मे चतुश्चत्वारिङ्शच्च मेऽटाचत्वारिङ्शच्च मे वाजश्च प्रसवश्चापिजश्च मे क्रतुश्च सुवश्च मूर्धा च व्यश्नियश्चान्त्यायनश्चान्त्यश्च भौवनश्च भुवश्च भुवनश्चाधिपतिश्च ॥ ११ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अनुवाक अकरावा

अर्थ– या अनुवाकांत कांही विषम संख्यावाचक व कांही सम संख्यावाचक शद्ब आहेत. एका म्हणजे प्रथम संख्या. तिस्त्रः म्हणजे तीन. पंच म्हणजे पांच. सप्त म्हणजे सात नव म्हणजे नऊ. एकादश म्हणजे अकरा. त्रयोदश म्हणजे तेरा. पंचदश म्हणजे पंधरा. सप्तदश म्हणजे सतरा. नवदश म्हणजे एकोणवीस. एकविंशतीः म्हणजें एकवीस. त्रयोविंशतिः म्हणजे तेवीस. पंचविंशतिः म्हणजे पचवीस. सप्तविंशति म्हणजे सत्तावीस. नवविंशतिः म्हणजे एकूणतीस. एकत्रिंशत् म्हणजे एकतीस. त्रयस्त्रिंशत् म्हणजे तेहतीस. चतस्राः म्हणजे चार, अष्ठौ म्हणजे आठः. द्वादश म्हणजे बारा. षोडश म्हणजे सोळा. विंशतिः म्हणजे वीस. चतुर्विंशतिः म्हणजे चौवीस. अष्टविंशति म्हणजे अठ्ठावीस. द्वात्रिंशत् म्हणजे बत्तीस. षट्‌त्रिंशत् म्हणजे छत्तीस. चत्वारिंशत् म्हणजे चाळीस. चतुश्चत्वारिंशत् म्हणजे चव्वेचाळीस. अष्टाचत्वरिंशत् म्हणजे अठ्ठेचाळीस. या विषम व सम असा संख्यावर अधिदेवता आणि वाजः म्हणजे अन्न. प्रसवः म्हणजे अन्नाची उत्पत्ति. अपिजः म्हणजे त्याच अन्नाची पुनः पुन्हा उत्पत्ति. ॠतू म्हणजे भोगविषयक संकल्प अथवा यज्ञ. सुवः म्हणजे यज्ञाच्या उत्पत्तिविषयी कारणीभूत असलेला आदित्य मूर्धा म्हणजे आकाश. व्यश्नियः म्हणजं अत्यंत व्यापनशील अशा आकाशादिमध्ये असणारा, आंत्यायन। म्हणजे शेवटी झालेला. अंत्यः प्रलयकाळी राहणारा, भौवन म्हणजे सर्व भुवनांत व्यापून असणारा भुवन म्हणजे भूवनस्वरूपामध्ये असणारा. अधिपती म्हणजे भुवनाचा अधीश्वर होऊन सर्व प्राण्यांचे परिपालन करणारा आचार्य अथवा राजा असे या सर्व अनुवाकामध्ये आलेले पदार्थं व त्यांच्या अधिदेवतांना उद्देशून सांगितलेले चकार हे समुच्चयार्थक आहेत. तरी हे सर्वाधार रुद्रा, तुझ्या अपारकृपेनें या चमकाध्यायामध्ये विवरण केलेल्या सर्व पदार्थांचीं व देवतांची अनुकूलता–मे–कल्पताम् सदासर्वदा मला यथास्थित प्राप्त होवो.

JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No. ......3481......
CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गोड गुलाल !

बहु बिरुदभूषित श्री. बसप्पाअण्णा वारद यांची पंचाहत्तरी ओलांडली तरी पंचवीसीला मागे टाकणारे–लाजवणारे त्यांचे सत्यमार्गी व एकतत्वी अमोल कार्य अबोलपणे अखंड चालूच असते. त्यानी कित्येक सहस्रगणती धार्मिक व सांस्कृतिक गद्य पद्य सुमने लिहून धर्मतूल्य प्रकाशित केली. मनातील उन्माद उसळून लेखणीत उतरला तर लेखक त्याला आवरू शकत नाही व बाहेर पडलेल्या शद्बगंधावर ग्रहण करणारांचा हक्क निर्माण होतो. त्यानुसार बसप्पा अण्णांनी हुंकारलेला ललकार अर्थात लावलेला ज्ञातदीप समस्त भाविकांच्या भक्तीचा आधारस्तंभ ठरून हृदयकमलात मुक्ती मंदीराचे उंबरठ्यात प्रवेशासाठी सदैव प्रकाश देत राहील यात आम्हाला बिलकुल संदेह नाही.

स्वत:चे काम स्वत: करण्याचा त्यांचा स्वभाव असून सत्याकरता व सत्कार्याकरता सर्वांगी झीज सोसण्याची त्यांची सवय आहे. नियमितपणा हा त्यांचा मंत्र आहे. वाचनामुळे व धर्मकार्याच्या अभ्यासामुळे त्यांना सर्वांगी माहिती आहे. स्वभाव शांत, मनमिळावू, मितभाषी, सयमी आहे. धर्मकार्यांमुळे व सद्वर्तनामुळेच विश्वाला शांती लाभणार आहे अशी त्यांची विचारधारा आहे प्रामाणिक, कलावंत. गुणी, व्यायामी यांना पाहिल्यावर त्यांना प्रेम व समाधान वाटते. पांचही जगद्‌गुरुंचे त्यांचेवर नितांत असे प्रेम आहे.

श्री. चंद्रकांत चपने (उस्मानाबाद) यांच्या उदार देणगीबद्दल धन्यवाद. श्री. वारद व श्री. चपने यांना दीर्घायुरारोग्य लाभून अशाच प्रकारचा गोड गुलाल समाजावर सतत उधळत याहीपेक्षा जास्त जनसेवा अर्थात मानवसेवा त्यांचे हातून घडो अशी परमेश्वराकडे प्रार्थना

डॉ. प्रा राजेंद्र बोडकर एम. ए. पी. एच. डी.	एम जी. किणीकर समाज सेवाभावी	वाय. बी. राजमाने रि. डे. कलेक्टर

धर्मण्णप्पा पाटील ज्योतिर्विद	आर. एम हिरजे प्राध्यापक

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

—: ग्रंथ प्राप्तीस्थान

चंद्रकांत स. चपने

प्रोप्रायटर

भाग्यलक्ष्मी लॉजिंग व बोर्डिंग

एस्. टी. स्टँडजवळ, उस्मानाबाद.

दूर ध्वनी : २५७, ४२६

ग्रंथ प्राप्तीस्थान :—

बसप्पा बी. वारद

पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३ ००२,

दूर ध्वनी : ३६७२, ७२३६, ६०७९

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY.
Jangamwadi Math, VARANASI,
Acc. No. ....
3481

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्री. बसप्पा वी. वारद सोलापूर यांनी हे पुस्तक विनायक प्रिंटर्स
सोलापूर येथें छापून क्षेत्र कपीलधार (जि. बीड) येथे प्रकाशन केले.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri